


# जनमाध्यम

Epaper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय





✦ अमरावती, गुरुवार १५ ऑक्टोबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०


# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी पाच हजारांची मदत

## दुष्काळामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा

## मुख्यमंत्र्यांची घोषणा; दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या २६५ वरून ३०५

**मुंबई/ प्रतिनिधी- दुष्काळामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या हातात दिवाळीपूर्वी पैसे मिळावेत, यासाठी राज्य सरकार प्रत्येक शेतकऱ्याच्या खात्यात पाच हजार रुपये अग्रीम मदत म्हणून जमा करणार आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत बुधवारी हा निर्णय घेण्यात आला असून, त्याची अंमलबजावणी तातडीने करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. केंद्र सरकारकडून दुष्काळी मदत मिळवण्यासाठी आवश्यक असलेली प्रक्रिया दिवाळीपूर्वी पूर्ण होणे कठीण असल्याने राज्य सरकारने हा पर्यायी निर्णय घेतल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. याशिवाय राज्यातील दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या २६५ वरून ३०५ करण्यात आली असून, दुष्काळ निवारणासाठीच्या १२ सवलती लागू करण्यात आल्या आहेत.**

मंत्रिमंडळ बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना फडणवीस यांनी दुष्काळी परिस्थितीचा आढावा आणि सरकारने घेतलेल्या निर्णयांची माहिती दिली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील सर्व मंत्री उपस्थित होते. यापूर्वी राज्यात २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला होता. मात्र, काही तालुक्यांमधून आलेल्या तक्रारींची दखल घेत 'ट्रिगर-१' आणि 'ट्रिगर-२' या दोन्ही निकषांचा पुन्हा आढावा घेण्यात आला. त्यानंतर आणखी ४० तालुक्यांचा समावेश करून एकूण ३०५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. दुष्काळामुळे बाधित झालेल्या भागांतील शेतकऱ्यांना १२ सवलतींचा लाभ देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

गेल्या २५ वर्षांच्या नोंदी पाहिल्यास राज्यात साधारणपणे नोव्हेंबरच्या अखेरीस दुष्काळ जाहीर केला जात असे आणि त्यानंतर डिसेंबरमध्ये मदत दिली जात असे. यंदा मात्र परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन दुष्काळ आधीच जाहीर करण्यात आला आणि त्यासंबंधीचा शासन निर्णय ऑक्टोबरमध्ये काढण्यात आला. बुधवारी पूरक शासन निर्णयही काढण्यात आला. मात्र, केंद्र सरकारकडून मदत मिळवण्यासाठी कायद्यानुसार ठरवलेले टप्पे आणि कालमर्यादा पूर्ण करावी लागते. त्यामुळे ही प्रक्रिया दिवाळीपूर्वी पूर्ण होणे कठीण आहे. या पार्श्वभूमीवर दोन्ही उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा करून मंत्रिमंडळाने शेतकऱ्यांना तातडीने पाच हजार रुपये देण्याचा निर्णय घेतल्याचे फडणवीस यांनी सांगितले. दिवाळीपूर्वी ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचा सरकारचा प्रयत्न राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**साडेतीन लाख शेतकऱ्यांची कर्जमाफीची यादी प्रमाणित**

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची प्रक्रिया थांबलेली नसून, पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा करण्याचे काम सुरू आहे. नव्याने आणखी साडेतीन लाख शेतकऱ्यांची यादी प्रमाणित करण्यात आली असून, या यादीतील शेतकऱ्यांनाही लवकरच पैसे देण्यास सुरुवात होईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. दिवाळीपूर्वी पाच हजार रुपयांची अग्रीम मदत देण्याचा निर्णय हा कर्जमाफीच्या प्रक्रियेपासून स्वतंत्र असून, सध्याच्या परिस्थितीत शेतकऱ्यांना तातडीचा आर्थिक आधार देणे हा त्यामागील उद्देश आहे.

**टँकरचा 'जीपीएस'द्वारे मागोवा-** दुष्काळग्रस्त भागांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई वाढत असल्याने टँकरची संख्या वाढवण्यात येत आहे. मराठवाड्यातील बहुतांश भागांमध्ये निरीक्षण विहिरींमधील पाण्याची पातळी जमिनीपासून तीन मीटरपेक्षा खाली गेली आहे. अशा परिस्थितीत ऑक्टोबर-नोव्हेंबरपासूनच टँकर सुरू करावे लागतात. त्यामुळे आवश्यकतेनुसार टँकर उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्यांचे जीपीएसच्या मदतीने मागोवा घेण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.पिण्यासाठी पाणी राखून ठेवता यावे, यासाठी पाणीपुरवठा व्यवस्थेतून



पाणी घेतल्या जाणाऱ्या सुमारे १६ हजार अवैध जोडण्या तोडण्यात आल्या आहेत. यापुढेही कोणी अवैधरीत्या पाणी उपसा केल्यास त्याची जोडणी तोडण्यात येईल. हा निर्णय कठोर वाटू शकतो; मात्र दुष्काळी परिस्थितीत नागरिकांसाठी पिण्याचे पाणी उपलब्ध ठेवणे आवश्यक असल्याने तो घेण्यात आल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

**सरसकट शैक्षणिक शुल्कमाफी लागू-** शैक्षणिक शुल्कमाफीसंदर्भात यापूर्वी काढलेल्या शासन निर्णयात १९९२ पासूनच्या काही अटींचा समावेश असल्याने सर्व पात्र लाभार्थ्यांना त्याचा फायदा मिळत नसल्याचे सरकारच्या निदर्शनास आले होते. मंत्रिमंडळाने या अटी काढून टाकण्याचा निर्णय घेतला असून, शुल्कमाफीचा निर्णय आता सरसकट लागू करण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**चारा लागवड केल्यास सरकार हमीभावाने खरेदी करणार-** दुष्काळी भागांमध्ये जनावरांच्या चाऱ्याची उपलब्धता वाढवण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. मंत्रिमंडळाने चारा उपलब्धतेचा आढावा घेतला असून, काही भागांमध्ये सुमारे ९० दिवस पुरेल इतकाच चारा उपलब्ध आहे, तर काही भागांत सहा ते सात महिन्यांचा साठा आहे.

### कर्ज, वीजबिलासाठी वसुलीचा तगादा लावल्यास कारवाई

दुष्काळाच्या काळात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी शेतकऱ्यांकडे कर्जवसुलीसाठी तगादा लावू नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. काही जण अतिउत्साहाने वसुलीचा प्रयत्न करतात; असे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत, असा इशाराही फडणवीस यांनी दिला. खासगी मायक्रो फायनान्स कंपन्यांशी चर्चा करून त्यांनीही कर्जवसुलीसाठी बळजबरीचे मार्ग वापरू नयेत, यासाठी सरकार प्रयत्न करणार आहे. शेतकऱ्यांकडून वीजबिल वसुलीसाठी तगादा लावला जात नसल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले. साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषिपंपांचे वीजबिल सरकार भरत असून, मागील थकबाकीसाठीही वसुलीचा तगादा लावला जात नाही. एखाद्या ठिकाणी कोणी अतिउत्साहाने वसुलीचा प्रयत्न करत असेल, तर संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

# कोणी नागरिक आहे की नाही ठरवण्याचा अधिकार ECI ला नाही

**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था -** मुख्य निवडणूक आयुक्त आणि मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणावरून सुरू असलेल्या



## सुप्रीम कोर्टाच्या माजी न्यायमूर्तींचा निवडणूक आयोगाच्या कामावर प्रश्नचिन्ह

तीव्र राजकीय घमासानादरम्यान सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती अभय एस. ओका यांनी निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. भारताचा नागरिक कोण आहे आणि कोण नाही, हे ठरवण्याचा अधिकार निवडणूक आयोगाकडे अजिबात नाही, असे अत्यंत महत्त्वाचे वक्तव्य माजी न्यायमूर्तींनी केले आहे. लीगल न्यूज पोर्टल 'लाइव्ह लॉ'च्या अहवालानुसार, सर्वोच्च न्यायालयाने मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणाला घटनात्मकता वैध ठरवणाऱ्या आपल्या आधीच्या आदेशाचा पुन्हा पुनर्विचार केला पाहिजे, असेही माजी न्यायमूर्ती ओका यांनी स्पष्टपणे म्हटले आहे.

**विरोधी पक्ष आक्रमक-** माजी न्यायमूर्ती अभय ओका यांचे हे वक्तव्य अशा वेळी आले आहे, जेव्हा इंडिया आघाडी आणि कॉकरोच जनता पार्टीने विशेष सखोल पुनरिक्षण प्रक्रियेविरोधात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात जोरदार मोर्चा उघडला आहे. देशभरात सुरू असलेली SIR प्रक्रिया तात्काळ रद्द करण्यात यावी आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी आक्रमक मागणी विरोधी पक्षांकडून केली जात आहे. या संपूर्ण प्रकरणात लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह ➩(पान २ वर)

## भरधाव दुचाकींची समोरा-समोर धडक

# दोन मुख्याध्यापकांसह तीन ठार

**अकोला/ प्रतिनिधी-** : वाशीम शहरातील प्राथमिक शिक्षणाधिकारी कार्यालयात संचमान्यतेसाठी निघालेल्या दोन मुख्याध्यापकांवर काळाने घाला घातला. दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात दोन मुख्याध्यापकांसह तिघांचा मृत्यू झाला. वाशीम जिल्ह्याच्या शेलूबाजारजवळील तपोवन फाट्याजवळ बुधवारी दुपारी ही घटना घडली. या धक्कादायक घटनेमुळे कारंजा शहरातील शैक्षणिक क्षेत्रात शोककळा पसरली आहे.



कारंजा नगर परिषद संचालित उर्दू प्राथमिक शाळा क्रमांक १ व २ चे दोन मुख्याध्यापक आणि दुचाकी चालक अशा तिघांचा भीषण रस्ते अपघातात मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना बुधवारी दुपारी घडली. या अपघातात कारंजा नगर परिषद उर्दू प्राथमिक शाळा क्रमांक १ चे मुख्याध्यापक सैय्यद आबीद हुसैन सैय्यद रऊफ (वय ५६) आणि उर्दू प्राथमिक शाळा क्रमांक २ चे मुख्याध्यापक नाझीम मोहम्मद नूर मोहम्मद (वय ५७) यांच्या मृत्यू झाला. दुसरी दुचाकी (क्रमांक एमएच ३० बीव्ही ६३३१ ) चालक विजय गोविंदा चव्हाण (रा. पिंपळगाव) यांचाही मृत्यू झाला.मिळालेल्या माहितीनुसार, दोन्ही मुख्याध्यापक शाळेच्या संचमान्यतेच्या कामानिमित्त कारंजा येथून वाशीम येथील प्राथमिक शिक्षण विभागाच्या कार्यालयाकडे दुचाकीने निघाले होते. दरम्यान, शेलूबाजारजवळील तपोवन फाट्यावर समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या दुचाकीने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात दोन्ही मुख्याध्यापकांसह दुसऱ्या दुचाकी चालकाचाही मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.

**लोकप्रतिनिधी, शिक्षकांची घटनास्थळी धाव-** अपघाताची माहिती मिळताच कारंजा नगर परिषदेचे गटनेते बिलाल पुंजानी, उपाध्यक्ष➩(पान २ वर)

# 'एमपीएससी' सचिवपदाचा अतिरिक्त कार्यभार सौरभ कटियार यांच्याकडे

**पुणे/ प्रतिनिधी-** पेपरफुटी प्रकरणानंतर वादाच्या भोव-यात सापडलेल्या राज्य लोकसेवा आयोगाच्या सचिवदाचा अतिरिक्त कार्यभार मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. एमपीएससीचे सचिव महेंद्र हरपाळकर यांची बदली करण्यात आल्यानंतर सचिवपदाचा अतिरिक्त कार्यभार मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्याकडे देण्यात आला आहे. तर विद्यमान अध्यक्ष विवेक भीमनवार रजेवर गेल्याने अध्यपदाचा अतिरिक्त कार्यभार अन्य सदस्याकडे सोपविण्याची प्रक्रिया सुरु आहे.लोकसेवा आयोगाच्या पेपरफुटी प्रकरणाच्या चौकशीसाठी सरकारने न्या. दिलीप भोसले यांची समिती गठीत केली असून त्यांना चौकशीसाठी दोन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. राज्यपालांच्या मान्यतेनंतर चौकशी समितीची अधिसूचना निर्गमित होणार असून त्यानंतर समितीचे कामकाज सुरू होईल. समितीचा अहवाल आणि त्यावरील सरकारचा निर्णय होण्यास लागणारा कालावधी लक्षात घेऊन भीमनवार यांच्या अध्यक्षपदाचा अतिरिक्त कार्यभार अन्य सदस्याकडे सोपविण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पेपरफुटी प्रकरणात अध्यक्ष



विवेक भीमनवार यांना तूर्त रजेवर पाठवण्यात आले असून याद्वारे पुण्यातील विद्यार्थ्यांच्या आंदोलनातून निर्माण झालेली कोंडी सोडवण्यात सोमवारी राज्य सरकारला यश आले आहे. मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनंतर, चौकशी पूर्ण होईपर्यंत पदावर कार्यरत न राहता रजेवर जाण्याचा निर्णय भीमनवार यांनी जाहीर केला. आपण संपूर्ण आयुष्यात नैतिकतेला नेहमी प्राधान्य दिले असल्याचे स्पष्ट करत ते रजेवर गेले आहेत.एमपीएससी पेपरफुटी प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी राज्य सरकारने न्यायमूर्ती ➩(पान २ वर)

# अभिजीत दिपके, सीजेपीला अमेरिकेतून फंडिंग मिळते

## अमेरिकन गायिका मेरी मिलबन यांचा खळबळजनक दावा

**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था -** प्रसिद्ध अमेरिकन गायिका आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रशंसक मेरी मिलबन यांनी कॉक्रोच जनता पार्टीबाबत एक मोठा दावा केला आहे. अभिजीत दिपके आणि त्यांच्या कॉक्रोच जनता पार्टीला अमेरिकेतील देणगीदारांकडून देणगी मिळत असल्याचा दावा मिलबन यांनी केला आहे. 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विरोध करण्यासाठी हा निधी पुरवला जात आहे', असाही आरोप मेरी मिलबन यांनी केला. कॉक्रोच जनता पार्टीच्या फंडिंगवरून भाजपाकडून वारंवार प्रश्न उपस्थित करण्यात



आले होते. आता अमेरिकन गायिकाच याबाबत भाष्य करत असल्यामुळे या विषयावर नवा वाद होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मेरी मिलबन यांनी एक्सवर याबाबत सविस्तर पोस्ट टाकली आहे. त्यांनी भारतातील तरुण देशभक्तांना उद्देशून म्हटले, 'माझ्या तरुण देशभक्तांनो, तुमचे पंतप्रधान (मोदी) २५ वर्षांपासून भारताची सेवा करत आहेत. त्यात ते १२ वर्ष पंतप्रधान म्हणून सलग तीन वेळा निवडून आले. माझ्या देशातील विघटनकारी शक्तींपुढे ते झुकणार नाहीत.'

**'देणगीदारांची चाल'-** मेरी मिलबन पुढे म्हणाल्या, 'या निवडक देणगीदारांची जागतिक पातळीवर एक विशिष्ट पद्धत आहे. ते जगभरातील ➩(पान २ वर)

### कोण आहेत मेरी मिलबन?

मेरी मिलबन यांनी यापूर्वीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कौतुक करताना भारतातील विरोधकांना टोला लगावला होता.



२०२२ साली भारताच्या ७५ व्या स्वातंत्र्य दिनाच्या सोहळ्यादरम्यान त्या भारतात प्रकाशझोतात आल्या होत्या. २०२३ मध्ये त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिका दौऱ्यात भारताचे राष्ट्रगीत आणि 'ओम जय जगदीश हरे' हे गीत गायले होते. मेरी मिलबन या आफ्रिकन-अमेरिकन गायिका असून त्यांनी हॉलिवूडमधील चित्रपटांतही काम केलेले आहे.

# उद्योगपती अनिल अंबानींची २,०३२ कोटींची मालमत्ता ED कडून जप्त

## परकीय चलनाच्या FEMA कायद्यांतर्गत कारवाई

**मुंबई/ प्रतिनिधी-** देशातील नामवंत उद्योगपती अनिल अंबानी यांच्या अडचणी कमी होताना दिसून येत नाहीत. गेल्या वर्षभरापासून त्यांच्या संपत्तीवर ईडीकडून कारवाई सुरू आहे. आत्तापर्यंत ९ हजार कोटींची संपत्ती जप्त करण्यात आली आहे. त्यातच, रिलायन्स पॉवर लिमिटेडची भारतातील २,०३२.८१ कोटींची मालमत्ता ED कडून जप्त करण्यात आली आहे. परकीय चलन व्यवस्थापन कायद्याच्या (FEMA) कलम ३७A अंतर्गत ही कारवाई करण्यात आली. जप्त मालमत्तेत



रिलायन्स पॉवरच्या बँक खात्यातील रक्कम आणि सासन पॉवर लिमिटेडमधील भागीदारीचा समावेश असल्याचे सांगण्यात आले. अनिल अंबानी यांनी परदेशात बेकायदेशीररीत्या ठेवलेल्या परकीय चलनाच्या सममूल्याची मालमत्ता ईडीकडून जप्त करण्यात आली आहे. SEBI कडून मिळालेल्या माहितीनंतर ED चा अधिक तपास सुरू आहे. कंपनीच्या खात्यांमध्ये २,१०१.४६ कोटींच्या राइट-ऑफ आणि तरतुदींची नोंद केली आहे. ब्रिटिश व्हर्जिन आयलंड्स (BVI) आणि केमन आयलंड्समधील कंपन्यांतील परदेशी गुंतवणूक आणि अडव्हान्सच्या व्यवहारांची ➩(पान २ वर)

# दुष्यंत गौतम यांना राज्यपाल बनवण्याला विरोध

- ■ राहुल-प्रियंका अंकिता भंडारीच्या आई-वडिलांना भेटले
- ■ २०२२ मध्ये रिसॉर्टमध्ये झाली होती मुलीची हत्या

**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था -** राहुल गांधी बुधवारी संध्याकाळी इंडिया गेटवर धरणे देत असलेल्या अंकिता भंडारीच्या आई-वडिलांना भेटले. प्रियंकाही त्यांच्यासोबत होत्या. कुटुंबाने राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे अपील केले आहे की, सीबीआयची चौकशी पूर्ण होईपर्यंत दुष्यंत कुमार गौतम यांची सिक्कीमच्या राज्यपालपदी झालेली नियुक्ती स्थगित करावी आणि ती रद्द करावी. १२ ऑक्टोबर रोजी दुष्यंत गौतम यांची राज्यपाल म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.चौकशी पूर्ण होईपर्यंत चौकशीच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होईल अशी कोणतीही नियुक्ती होऊ नये, असे कुटुंबाचे म्हणणे आहे. त्यांनी या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून अंकिताला पूर्ण न्याय मिळवून देण्याची मागणी केली आहे.अंकिता उत्तराखंडमधील एका हॉटेलमध्ये रिसेप्शनिस्ट होती. तिथे व्हीआयपीला सेवा देण्यास नकार दिल्यामुळे २०२२ मध्ये ➩(पान २ वर)










# दसऱ्याच्या दिवशी मनपा आयुक्तांच्या पुतळ्याचे दहन करणार

## अस्वच्छतेविरोधात सर्वपक्षीय नेते आक्रमक

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील स्वच्छता व्यवस्था तात्काळ सुधारली नाही तर दसऱ्याच्या दिवशी मनपा आयुक्तांच्या पुतळ्याचे दहन करण्याचा इशारा माजी नगरसेवक मुन्ना राठोड यांनी आज बुधवार १४ ऑक्टोबर रोजी पत्रकार परिषदेमध्ये दिला आहे. त्यांनी, सांगितले की शहरात जागोजागी कचऱ्याचे ढीग आहे यामुळे डेंगू मलेरिया, चिकनगुनिया सारखे आजारांचे प्रमाण वाढलेले आहे. मच्छरांचा प्रादुर्भाव वाढत आहे तरी प्रशासन लक्ष देत नाही. या संदर्भात आयुक्तांना निवेदन देण्यात आले होते पण त्यांनी याची दखल घेतली नाही. यामुळे त्यांचे विरोधात नाराजी आहे.माजी नगरसेवकांनी आरोप केला आहे की, शहरात स्वच्छता करणाऱ्या कोणार्क कंपनीकडून साफसफाईचे काम व्यवस्थित होत नाही. तरीही कंपनीला दरमहा लाखो रुपयांची बिले अदा केली जात आहे.



मागील दोन महिन्यात कोणार्क कंपनीला कोट्यवधी रुपयांचे बिल देण्यात आले आहे, मात्र शहरात कचऱ्याचे साम्राज्य आहे. या बिलांची सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करावे. गेल्या अनेक महिन्यांपासून शहरात कचरा उचलला जात नाही. नाल्या तुंबल्या आहेत, रस्त्यावर कचऱ्याचे ढीग लागले आहेत. कोणार्क कंपनी केवळ बिले उचलण्याचे काम करत आहे. २०० पेक्षा जास्त कर्मचारी कागदावर दाखवून प्रत्यक्षात १००-१५० कर्मचारी कामावर आहेत. तरीही कंपनीला ३०० कोटींचे टेंडर देऊन त्यातल्या त्यात आजपर्यंत चार कोटी रुपयांची बिले देण्यात आली आहेत. हा जनतेच्या पैशाचा अपव्यय आहे. हायकोर्टाने कंपनीचा कंत्राट रद्द केला होता. त्या विरोधात मनपा आयुक्तांनी सुप्रीम कोर्टात धाव घेतली आणि स्थगनादेश आणला. जर दसऱ्यापर्यंत शहर स्वच्छ झाले नाही, तर रावण दहनासोबतच आयुक्तांच्या पुतळ्याचे दहन करून निषेध नोंदवू, असा इशारा पत्रकार परिषदेत देण्यात आला आहे. प्रशासनाने तात्काळ कोणार्क कंपनीला जाब विचारून शहर स्वच्छ करावे, अन्यथा येत्या काळात तीव्र आंदोलन छेडले जाईल. पत्रकार परिषदेत मुन्ना राठोड यांच्यासह माजी नगरसेवक सलीम बेग, प्रकाश बनसोड, मंगेश खोंडे, समीर जवंजाळ, प्रदीप बाजाड, नगरसेवक धीरज हिवसे, मनीष बजाज, चंदू खेडकर,राहुल माटोडे, समीर जवंजाळ आदि उपस्थित होते.

# कर्जमाफीचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज द्या

## -जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचे निर्देश

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्य शासनाच्या कर्जमुक्ती योजनेअंतर्गत तिसरी यादी जाहीर करण्यात आली आहे. यात सुमारे १२ हजार शेतकऱ्यांचा समावेश आहे. सहकार विभागाने या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळवून द्यावा. तसेच त्यांना पुन्हा कर्ज उपलब्ध होईल, यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात दुष्काळ निवारणासंदर्भात चांदुर रेल्वे, धामणगाव रेल्वे आणि नांदगाव खंडेश्वर तालुक्यांचा आज (दि.१४) आढावा घेण्यात आला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांच्यासह जिल्हास्तरीय अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येरेकर म्हणाले, राज्य शासनाने दिलेल्या कर्जमाफीची अंमलबजावणी योग्य प्रकारे करण्यात येत आहे. मात्र कर्जमुक्ती मिळालेल्या शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज मिळण्यास अडचणी येत आहे. जिल्ह्यात केवळ ३५ टक्के शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळाल्यानंतर पुन्हा कर्ज उपलब्ध झालेले आहे. असंख्य शेतकऱ्यांना पुन्हा कर्ज मिळालेले



नसल्याने सहकार विभागाने त्यांना परत कर्ज मिळावे, यासाठी शेतकऱ्यांशी संपर्क साधावा. तसेच बँकांना भेटी देऊन त्यांना शेतकऱ्यांना संपर्क करण्यासंदर्भात सांगण्यात यावे, अशा सूचना केल्या.

जिल्ह्यात पाणीटंचाई जाणवू नये, यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यामुळे सध्या उपलब्ध असलेला पाणीसाठा लक्षात घेऊन त्याचे योग्य नियोजन करावे. प्रामुख्याने सार्वजनिक विहिरीमध्ये जल पुनर्भरण होण्यासाठी प्रयत्न करण्यात यावे. ज्या शहरांमध्ये पाणीपुरवठा योजनेद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो त्या ठिकाणी वैयक्तिक बोरवेल घेण्यासाठी कोणतीही अडचण येणार नाही. मात्र या बोरवेलमुळे पाणी पातळीवर परिणाम होऊ नये याची काळजी घ्यावी. तसेच जुन्या बोरवेलमधील पाणी बांधकामासाठीही वापरता येईल. मात्र याचा प्रतिकूल परिणाम झाल्यास बोरवेलच्या पाण्याच्या वापरावर बंदी घालण्यात यावी. सध्या अस्तित्वात असलेले पाण्याचे स्त्रोत बळकट करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावे. तसेच टँकरने पाणीपुरवठा करण्याची वेळ येणार नाही यासाठी प्रयत्न करण्यात यावेत.

येत्या काळात जिल्ह्यात चाऱ्याचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी गाळपेर जमीनीसोबतच मंदिर, संस्थानाच्या जमिनी चारा लागवडीसाठी उपलब्ध करून घेण्यात याव्यात. चारा उत्पादनासाठी पशुसंवर्धन विभागातर्फे मदत करण्यात येत आहे. याबाबत राज्य शासनाने अटीशर्ती शिथिल केल्या आहेत. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांकडे जागा उपलब्ध आहे त्यांना चारा लागवडीसाठी मदत करावी, तसेच ज्या ठिकाणी रब्बीच्या पिकासाठी पाण्याची उपलब्ध होऊ शकेल अशा ठिकाणी कमी पाणी लागणाऱ्या पिकांचे उत्पादन घेण्यासाठी मार्गदर्शन कृषी विभागाने करावे.

# १ व १० वरिल उर्वरित

### दुष्यंत गौतम यांना राज्यपाल

तिची हत्या करण्यात आली होती. व्हीआयपीचे नाव कधीही समोर आले नाही, मात्र कुटुंब दुष्यंत कुमार गौतम यांच्यावर सातत्याने प्रश्न उपस्थित करत आले आहे. अंकिताची आई सोनी देवी यांनी झालेल्या संवादात सांगितले की, दुष्यंत गौतम यांची सिक्कीमच्या राज्यपालपदी नियुक्ती झाल्यानंतर त्यांची चिंता आणखी वाढली आहे. त्यांनी सांगितले की, मुलीच्या हत्येप्रकरणी ज्या व्हीआयपीबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत, त्यांना राज्यपाल बनवण्यात आले आहे. अशा परिस्थितीत न्यायासाठी कोणाकडे जावे, हे कुटुंबाला समजत नाही. त्यांनी सांगितले की कुटुंब उत्तराखंडहून दिल्लीला आले आहे आणि इंडिया गेटवर आपला आवाज उठवू इच्छित आहे. आईने सांगितले की स्थानिक पातळीवर त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले नाही, मात्र सर्वसामान्य जनतेने नेहमीच त्यांना साथ दिली आहे. जनतेच्या मदतीमुळेच हे प्रकरण इथपर्यंत पोहोचले आहे. देशातील लोक यापुढेही त्यांना साथ देतील आणि मुलीला न्याय मिळवून देण्यासाठी मदत करतील, अशी त्यांनी आशा व्यक्त केली.

### अभिजीत दिपके, सीजेपीला

पुराणमतवादी नेत्यांना लक्ष्य करतात. यासाठी ते अमेरिकेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना हेरतात. त्यांना कट्टरपंथी बनवतात आणि पुन्हा त्यांच्या देशात पाठवतात. त्यांच्या देशात अनागोंदी निर्माण करण्यासाठी या विद्यार्थ्यांना निधी पुरवला जातो. यापैकी आजवर कुणीही यशस्वी झालेले नाही. मात्र त्यांनी देशाच्या विकासाच्या प्रयत्नांवर परिणाम केला आहे.'

### उद्योगपती अनिल अंबानींची

चौकशी. तसेच, २००६ मध्ये रिलायन्स नॅचरल रिसोर्सेस लिमिटेडने परकीय चलन परिवर्तनीय रोख्यांद्वारे ३०० दशलक्ष डॉलर उभारले आहेत. त्यापैकी २७५ दशलक्ष डॉलर सिंगापूरस्थित उपकंपनीत गुंतवण्यात आल्याचा आरोप आहे. या निधीच्या आधारे BVI मधील कंपन्यांना कर्ज देण्यात आले. या कंपन्यांचे नियंत्रण भारतातून रिलायन्सच्या अनिल अंबानी समूहाकडून होत असल्याचा आरोप असल्याने ED कडून तपास सुरू आहे. दरम्यान,मॉरिशसमधील परदेशी संस्थांमार्फत निधी भारतात तात्पुरता परत आणल्याचा आणि उर्वरित निधी परदेशात ठेवल्याचा आरोप करण्यात आला असून कर्जाची परतफेड न झाल्यानंतर व्यवहार वैध व्यावसायिक असल्याचे भासवण्यासाठी मागील तारखेची कागदपत्रेही त्यांनी तयार केल्याचे तपासात उघडकीस आले.

### कोणी नागरिक आहे की नाही

विरोधी पक्षातील इतर १२ प्रमुख नेत्यांनी सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली आहे. याशिवाय एमआयएमचे प्रमुख असदुद्दीन ओवैसी यांनीही सर्वोच्च न्यायालयाचे दार ठोठावले आहे. ओवैसींचे वकील निजाम पाशा यांनी सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जोयमाल्या बागची यांच्या खंडपीठाकडे आपली याचिकाही गुरुवारी सुनावणीस येणाऱ्या इतर मुख्य याचिकांसोबत सूचीबद्ध करण्याची विनंती केली आहे.

**गुरुवारी सुनावणीची शक्यता-**निवडणूक आयोगाच्या या एकतर्फी निर्णयाविरोधात दाखल करण्यात आलेल्या सर्व याचिकांवर गुरुवारी (१५ ऑक्टोबर) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होण्याची दाट शक्यता आहे. सुप्रीम कोर्टाच्या अधिकृत संकेतस्थळावरील अपडेटनुसार, १२ ऑक्टोबर रोजी दाखल आणि १३ ऑक्टोबर रोजी रजिस्टर झालेल्या या याचिकेची संभाव्य सुनावणीची तारीख १५ ऑक्टोबर दाखवली जात आहे. या याचिकेत निवडणूक आयोगाने राबवलेल्या 'स्पेशल इंटेंसिव्ह रिव्हिजन' च्या पद्धतीला, मतदारयादीतून नावे वगळण्याच्या प्रक्रियेला आणि निवडणूक आयोगाच्या अंतर्गत निर्णय घेण्याच्या पद्धतीला थेट आव्हान देण्यात आले आहे.

### दोन मुख्याध्यापकांसह तीन

फिरोज शेकुवाले, शिक्षण सभापती जाकीर शेख आणि नियोजन सभापती नदीम राज यांच्यासह मृतांच्या नातेवाइकांनी व शिक्षकांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला. उत्तरीय तपासणीसाठी मृतदेह मंगरूळपीर ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले.

**शिक्षक वर्गात हळहळ-** दोन्ही मुख्याध्यापक हे कारंजा नगर परिषदेच्या शिक्षण विभागात कार्यरत असल्याने त्यांच्या निधनाने शिक्षक वर्गात हळहळ व्यक्त होत आहे. शालेय कामानिमित्त प्रवास करत असताना घडलेल्या या दुर्दैवी घटनेमुळे कारंजा नगर परिषद आणि शैक्षणिक क्षेत्रावर दुःखाचा डोंगर कोसळला.

**ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार ठार-** अकोला जिल्ह्यातील बोरगाव मंजू पोलीस ठाण्याच्या हद्दीत बोरगाव मंजू नवीन वळण मार्गावर भरधाव ट्रकने दुचाकीला धडक दिल्याने भीषण अपघात झाल्याची घटना बुधवारी दुपारी घडली. या अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. शुभम दिवनाले असे अपघातातील मृत दुचाकीस्वाराचे नाव असल्याची माहिती आहे.

### 'एमपीएससी' सचिवपदाचा अतिरिक्त

दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत केली असून त्यांना चौकशीसाठी दोन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. या न्यायालयीन चौकशी समितीच्या स्थापनेची घोषणा करण्यात आली असून, त्याबाबतचा प्रस्ताव मंजुरीसाठी राज्यपालांकडे पाठविण्यात आला आहे. राज्यपालांच्या मान्यतेनंतर या चौकशी समितीची अधिसूचना निर्गमित केली जाईल आणि त्यानंतर समितीचे अधिकृत कामकाज सुरू होईल. समितीचा अहवाल आणि त्यावर सरकारकडून निर्णय येण्यास लागणारा कालावधी लक्षात घेता, विवेक भीमनवार यांच्या अध्यक्षपदाचा अतिरिक्त कार्यभार आयोगाच्या अन्य सदस्याकडे सोपविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

### अमरावती शासकीय वैद्यकीय

सरकारी कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. या पाहणीदरम्यान प्रतिनिधींनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल बत्रा यांची भेट घेऊन प्रकल्पासंदर्भात चर्चा केली. जागेची पाहणी आणि कागदपत्रांची तपासणी ही प्रकल्पाच्या पुढील प्रक्रियेतील महत्त्वाची बाब मानली जात आहे. राज्य शासनाने ४७६.९७ कोटींच्या प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. महाराष्ट्र राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीने या बांधकामासाठी अंदाज पत्रकीय तरतूद मंजूर केल्याची माहिती आहे. या प्रकल्पाच्या अंमल बजावणीसाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट म्हणून राइट्स या संस्थेची निवड करण्यात आली आहे. राइट्सकडून बांधकामासाठी निविदा मागविण्यात आल्या असून, त्यांना पाच निविदा प्राप्त झाल्या आहेत. या निविदांची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पात्र कंत्राटदाराची नियुक्ती केली जाणार आहे. निवड झालेल्या कंत्राटदाराला बांधकाम पूर्ण करण्यासाठी २७ महिन्यांची मुदत देण्यात येणार आहे. त्यामुळे निविदा प्रक्रिया पूर्ण होणे, कंत्राटदाराची नियुक्ती आणि प्रत्यक्ष बांधकाम सुरू होणे हे पुढील महत्त्वाचे टप्पे असतील. आलियाबाद येथील ११.२९ हेक्टर जागेवर हे मेडिकल कॉलेज बनणार आहे. कॉलेज निर्मीतीच्या प्रक्रियेला आता गती मिळाली आहे.महाविद्यालयासाठी जागा निश्चित करण्याचा निर्णय तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील समितीने घेतला होता. त्यानुसार अमरावती जिल्ह्यातील आलियाबाद येथील सर्व्हे क्रमांक ९/१ मधील ११.२९ हेक्टर जागेचा अंतिम ताबा वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाला देण्यात आला आहे. सदर जागा महाराष्ट्र शासनाच्या ई-क्लास जमिनीच्या स्वरूपातील आहे. या प्रकल्पात १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे वैद्यकीय महाविद्यालय आणि ४३० खाटांचे रुग्णालय प्रस्तावित आहे.

### निंभी फाट्याजवळ मजीप्राची मुख्य

अधिकारी आणि कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी तातडीने पाणीपुरवठा बंद करून दुरुस्तीच्या कामाला सुरुवात केली आहे. मात्र, पाईप लाईनचा आकार मोठा असल्याने आणि गळती मोठी असल्याने दुरुस्तीला वेळ लागत आहे.मजीप्राच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम सुरू आहे. लवकरात लवकर पाईपलाईन दुरुस्त करून पाणीपुरवठा सुरळीत करण्याचा प्रयत्न सुरू आहे. या बिघाडामुळे बुधवारी अमरावती आणि बडनेरा शहराचा संपूर्ण पाणीपुरवठा बंद ठेवण्यात आला होता. शहरातील अनेक भागात नागरिकांना पाण्यासाठी भटकावे लागले. दुरुस्तीचे काम गुरुवारी सकाळपर्यंत चालण्याची शक्यता आहे. त्यामुळे गुरुवारीही पाणीपुरवठा कमी दाबाने किंवा विस्कळीत स्वरूपात होण्याची शक्यता आहे. नागरिकांनी पाण्याचा जपून वापर करावा, असे आवाहन मजीप्रा प्रशासनाने केले आहे.

### पाच हजार रुपयांची दुष्काळी

आहे. दुष्काळामुळे झालेल्या प्रत्यक्ष नुकसानीची भरपाई न करता केवळ पाच हजार रुपये देणे म्हणजे शेतकऱ्यांच्या संकटाची थट्टा आहे.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेतून पात्र शेतकऱ्यांना वर्षाला रुपये ६ हजार रू तर महाराष्ट्राच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेतून आणखी रुपये ६ हजार मिळतात. शेतकऱ्यांना नमो शेतकरी योजनेचा आठवा हप्ता २५ मार्च २०२६ रोजी वितरित करण्यात आला. त्या वेळी ८९लाख ७५ हजार २९८ शेतकरी कुटुंबांच्या खात्यांवर रुपये १हजार ७९८.७८ कोटी जमा करण्यात आले होते. त्यानंतर दुष्काळ असूनही अद्याप पुढील हप्ते देण्यात आलेले नाहीत. हे पैसे शेतकऱ्यांना का दिलेले नाहीत, याबाबत सरकार बोलायला तयार नाही. नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचे नववे आणि दहावे हप्ते रखडल्यामुळे पात्र शेतकऱ्यांना प्रत्येकी रुपये ४,००० मिळणे बाकी आहे. एकीकडे ४००० रुपये थकवायचे व दुसरे ५००० देऊन श्रेय घ्यायचे हे बरोबर नाही. दुष्काळ, कर्जमाफी, पीक विमा, वनहक्क, देवस्थान, गायरान आणि इतर शेतकरी प्रश्नांवर अखिल भारतीय किसान सभेने या पार्श्वभूमीवर राज्यव्यापी आंदोलनाची घोषणा केली जाणार आहे.जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या आंदोलनात सहभागी होण्यासाठी तयार राहावे असे आव्हान अ. भा. किसान सभेने केले आहे.

### अवैध शस्त्र बाळगणाऱ्यासह गांजाचे

असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून अंदाजे एक हजार रुपये किमतीचा लोखंडी चाकू जप्त करण्यात आला. याप्रकरणी राजापेठ पोलीस ठाण्यात भारतीय शस्त्र अधिनियमाचे कलम ४ व २५ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम १४२ व १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मोसिकॉल जिन परिसरात शुभम दीपक कंगाले (वय २६, रा. बोराळा, ता. चांदूर बाजार, जि. अमरावती) हा सार्वजनिक ठिकाणी गांजाचे सेवन करताना आढळून आला. त्याच्याविरुद्ध गाडगेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

याच पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रामलक्ष्मण संकुल परिसरात मोहन ऊर्फ विक्की कुंगुमल भोजवानी (वय ३२, रा. रामपुरी कॅम्प, अमरावती) हा गांजाचे सेवन करताना आढळला. त्याच्याविरुद्धही कलम २७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, सिटी कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जुम्मन शाहबाबा दर्गा परिसरात मोहम्मद समीर मोहम्मद सादिक (वय ३०, मूळ रा. परतवाडा, ता. अचलपूर, जि. अमरावती; ह.मु. अपना बेकरी जवळ, अमरावती) हा सार्वजनिक ठिकाणी गांजाचे सेवन करताना आढळून आला. त्याच्याविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, श्याम घुगे, प्रांजली सोनवणे तसेच सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) निलेश ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनात ही कारवाई करण्यात आली. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर आणि पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलीस निरीक्षक महेश इंगोले, पोलीस उपनिरीक्षक गजानन सोनुने यांच्यासह पोलीस अंमलदार आणि चालक संदीप खंडारे, राहुल दुधे यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

### अंजनगाव सुर्जीत दुष्काळात

वारंवार कर्ज भरण्याच्या नोटिसा येत होत्या. यामुळे शेतकरी कमालीचे त्रस्त झाले होते. आंदोलनादरम्यान गोपाल पाटील अरबट यांनी बँक अधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दात सुनावले की, 'महाराष्ट्रात सध्या भयंकर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांचे कोणतेही पीक हाती आलेले नाही, त्यामुळे शेतकऱ्यांकडे सध्या कोणतेही उत्पन्न नाही. अशा अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत बँकेने शेतकऱ्यांना कर्ज भरण्याचा तगादा लावू नये, तसेच वारंवार फोन करून शेतकऱ्यांना मानसिक त्रास देणे त्वरित थांबवावे. कर्जवसुलीच्या या सततच्या तगाद्यामुळे आणि मानसिक तणावामुळे एखाद्या शेतकऱ्याने आपल्या जिवाचे बरेवाईट केल्यास, त्याला सर्वस्वी बँक प्रशासनच जबाबदार राहील, अशी संतप्त तंबी अरबट यांनी बँक अधिकाऱ्यांना दिली.

बँकेच्या या मनमानी कारभाराची दखल घेत गोपाल पाटील अरबट यांनी थेट तहसीलदारांशी फोनवरून संपर्क साधला. वारंवार शेतकऱ्यांना कर्ज भरण्याच्या नोटिसा पाठवून त्रास दिला जात असल्याने, तहसीलदारांनी तात्काळ बँक अधिकाऱ्यांची बैठक बोलवावी आणि त्यांना योग्य ती समज द्यावी, अशी मागणी त्यांनी या चर्चेदरम्यान केली. या आंदोलनाप्रसंगी शिवसेना शहरप्रमुख मुन्ना उर्फ योगेश इसोकार, तालुकाप्रमुख नितीन चौखडे, विशू पाटील सावरकर, सुधाकर फुलबंकर, सोनू रायलकर, सागर गेठे, गजानन पाटील, राम बर्वे, विनोद पायघन, गणेश गावडे, शरद आठवले यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक आणि परिसरातील शेतकरी उपस्थित होते. बँकांनी शेतकऱ्यांची पिळवणूक न थांबवल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही यावेळी देण्यात आला.

### दुर्गोत्सवाच्या पार्श्वभूमीवर

देवींची स्थापना करण्यात आली आहे. शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत ५४५ सार्वजनिक दुर्गादेवी मंडळे आणि ७९ सार्वजनिक शारदादेवी मंडळे अशा एकूण ६२४ मंडळांनी देवींची स्थापना केली आहे. २० ते २५ ऑक्टोबरदरम्यान देवींचे विसर्जन होणार असल्याने या कालावधीत शांतता व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने पोलिसांनी प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या आहेत.

गाडगेनगर, नागपुरी गेट, वलगाव, फ्रेजरपुरा, नांदगाव पेठ आणि बडनेरा या सहा पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील गंभीर गुन्ह्यांशी संबंधित तसेच जातीय तेढ वाढविण्याची शक्यता असलेल्या व्यक्तींवर पोलिसांनी लक्ष केंद्रित केले. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ मधील कलम १६३ (२) अंतर्गत उपलब्ध तरतुदींचा आधार घेत ३३१ इसमांना दुर्गोत्सवाच्या संपूर्ण कालावधीसाठी शहर व परिसरातून हद्दपार करण्यात आले आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील तरतुदींनुसार आणखी ६७ आरोपींना दोन वर्षांसाठी अमरावती शहर व जिल्ह्याच्या हद्दीतून तडीपार करण्यात आले आहे.

### फ्लिपकार्टमधील १.०४ लाखांच्या

कंपनीतील २० वर्षीय कर्मचाऱ्याला ताब्यात घेतले. भावेश राजू गजभिये (रा. सुकळी, अमरावती) असे त्याचे नाव आहे. त्याच्याकडून चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणातील फिर्यादी शुभम अनिल हिवरेकर (वय ३०, रा. जवाडे कंपाउंड, अमरावती) हे फ्लिपकार्ट कंपनीत ऑपरेशन्स एक्झिक्युटिव्ह म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी १२ ऑक्टोबर २०२६ रोजी पोलिसांत तक्रार दाखल केली. कंपनीच्या हबमध्ये महागड्या वस्तूंच्या पार्सलऐवजी कमी किमतीची पार्सल आढळून आल्याने या प्रकरणाची पडताळणी करण्यात आली.

यावेळी कंपनीतील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, हबमध्ये शॉर्टर म्हणून काम करणाऱ्या भावेश गजभिये याने महागड्या वस्तूंच्या पार्सलवरील लेबलची अदलाबदल केल्याचे निदर्शनास आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या पद्धतीने एकूण ३९ वस्तूंची, अंदाजे १ लाख ४ हजार ३०७ रुपये किमतीच्या मालाची हेराफेरी करून चोरी केल्याचा आरोप आहे. या तक्रारीवरून राजापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तपासादरम्यान निष्पन्न झालेल्या बाबींच्या आधारे भावेश गजभिये याला ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. त्याने महागड्या पार्सलच्या जागी कमी किमतीचे पार्सल लावून वस्तूंची हेराफेरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर चोरीचा मुद्देमाल जप्ती पंचनाम्यानुसार जप्त करण्यात आला.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त (परिमंडळ क्रमांक २) श्याम घुगे आणि राजापेठ विभागाचे सहायक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक रोशन शिरसाट, पोलीस निरीक्षक (गुन्हे) मंगला वाकडे, पोलीस उपनिरीक्षक तुषार गावंडे, रंगराव जाधव, रवींद्र हरणे, पोलीस हवालदार हरीश बुंदेले, नापोकॉ. प्रमोद हरणे, पोलीस अंमलदार सतीश लोहकरे, आकाश इंगोले, बाबूसिंग राठोड आणि चालक पोलीस अंमलदार आनंद जाधव यांनी केली.

### लुंबिनी नगरात चोरी

येथील रुग्णालयात होते.याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यानी घराला लक्ष करत मंगळवारीं (दि.१३) रात्री दहा वाजता दरम्यान घराचे कुलूप तोडून घरातील कपाटातुन सोने, चांदी व दहा हजार रुपये रोख रक्कम लंपास केली. पत्नीच्या प्रसुतीनंतर सर्व कुटुंब घरी आले असता हा सर्व प्रकार उघडकीस आला. पोलीसांनी पंचनामा करत अज्ञात चोरटयांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून अधिक तपास पोलीस करीत आहे.

### दुचाकी चोर जेरबंद!

हिरो पॅशन प्रो दुचाकी (क्रमांक एमएच २७ एएन ८५३३) घरासमोर नेहमीप्रमाणे उभी केली होती. मात्र, दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजता ही दुचाकी जागेवर आढळून आली नाही. परिसरात शोध घेऊनही ती मिळाली नसल्याने त्यांनी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. तपासातून कमलेश सर्वटकर याला ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. त्याने दुचाकी चोरीच्या गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. तसेच अमरावती शहरातील इतर वाहनचोरीच्या घटनांबाबतही त्याने माहिती दिल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. या कारवाईत पोलिसांनी एकूण चार दुचाकी जप्त केल्या. त्यामध्ये फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतून चोरीला गेलेल्या दोन पॅशन प्रो दुचाकींचा समावेश आहे. याशिवाय, हिरो होंडा कंपनीची काळ्या रंगाची, निळा-लाल पट्टा असलेली दुचाकी आणि बजाज कंपनीची काळ्या रंगाची, करडा व लाल पट्टा असलेली सीटी १०० दुचाकी जप्त करण्यात आली. या चारही दुचाकींची एकूण अंदाजे किंमत १ लाख १० हजार रुपये आहे.

### सफाई कर्मचाऱ्यांचे मानधन

आर्थिक संकट ओढवल्याने प्रशासनाने तातडीने दखल घेण्याची गरज आहे.

नगर परिषदेच्या सफाई कामाचे कंत्राट मे महिन्यात संपुष्टात आले.मात्र तांत्रिक कारणामुळे निविदा प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही.त्यामुळे सध्या स्वच्छतेची कामे तात्पुरत्या स्वरूपात नगर परिषद कडून पूर्ण करून घेतली जात आहेत.या प्रक्रियेत निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणीमुळे संबंधित कर्मचाऱ्यांचे वेतन थांबल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. भविष्यात अशा प्रकारची समस्या निर्माण होणार नाही याची दखल घेणार असल्याचे मुख्याधिकारी निवृत्ती भालकर यांनी सांगितले. दरम्यान कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर मिळावे, तसेच शहरातील स्वच्छता व्यवस्था विस्कळीत होऊ नये यासाठी प्रशासनाने कायमस्वरूपी उपाय योजना करावी अशी मागणी करण्यात येत आहे.थकीत वेतन प्रत्यक्ष कर्मचाऱ्यांच्या खात्यात कधी जमा होणार याकडेही लक्ष लागले आहे.

### डिप्टी ग्राउंडवर पिस्तूल घेऊन

जप्त करण्यात आले.

गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांना १४ ऑक्टोबर रोजी एका गोपनीय खबऱ्यामार्फत माहिती मिळाली की, नारंगी रंगाचा गोल गळ्याचा टी-शर्ट आणि काळ्या रंगाची पँट परिधान केलेला एक इसम पिस्तूल बाळगून डिप्टी ग्राउंड परिसरात फिरत आहे. तो गंभीर स्वरूपाचा गुन्हा करण्याच्या उद्देशाने तेथे असल्याची माहितीही मिळाली होती.

या माहितीची दखल घेत गुन्हे शाखेच्या पथकाने तातडीने डिप्टी ग्राउंड परिसर गाठला. खबऱ्याने दिलेल्या वर्णनाशी जुळणारा इसम दिसताच पोलिसांनी त्याला घेराव घालून शिताफीने ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता पँटच्या मागील बाजूस कमरेला खोचलेले पिस्तूल आढळून आले. पोलिसांनी हे अग्निशस्त्र जप्त केले. ताब्यात घेतलेला इसम आणि जप्त केलेले अग्निशस्त्र पुढील कायदेशीर कारवाईसाठी नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या स्वाधीन करण्यात आले. या प्रकरणी पुढील तपास नागपुरी गेट पोलीस करीत आहेत.

### अमरावती विभागात आंबिया बहार

आहे. संत्रा पिकासाठी ८० हजार प्रती हेक्टरी विमा संरक्षित रक्कम निश्चित करण्यात आली असून अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ नोव्हेंबर २०२६ आहे.

डाळिंब पिकासाठी १ लाख ६० हजार प्रती हेक्टरी विमा संरक्षित रक्कम निश्चित करण्यात आली असून अर्ज करण्याची अंतिम मुदत १४ जानेवारी २०२७ आहे.केळी पिकासाठी १ लाख ७० हजार प्रती हेक्टरी विमा संरक्षित रक्कम निश्चित करण्यात आली असून अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर २०२६ आहे. द्राक्ष पिकासाठी ३ लाख ८० हजार प्रती हेक्टरी विमा संरक्षित रक्कम निश्चित करण्यात आली असून अर्ज करण्याची अंतिम मुदत १५ ऑक्टोबर २०२६ आहे. आंबा पिकासाठी १ लाख ७० हजार प्रती हेक्टरी विमा संरक्षित रक्कम निश्चित करण्यात आली असून अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ डिसेंबर ऑक्टोबर २०२६ आहे.पपई पिकासाठी ४० हजार प्रती हेक्टरी विमा संरक्षित रक्कम निश्चित करण्यात आली असून अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर २०२६ आहे. विमा योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांकडे ॲग्रीस्टॅक नोंदणी, आधार कार्ड, बँक खाते तपशील, जमीन धारणा उतारा (७/१२), जिओ टॅग फोटो आणि ई-पीक पाहणी/डीएससी असणे १०० टक्के बंधनकारक आहे. या कागदपत्रांशिवाय विमा प्रस्ताव रद्द केला जाऊ शकतो असे सांगण्यात आले आहे.शेतकऱ्यांनी आपल्या जवळच्या ई-सेवा केंद्र, बँक किंवा वित्तीय संस्थेशी संपर्क साधून विहित मुदतीमध्ये योजनेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन कृषी विभागातर्फे करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी शासकीय संकेतस्थळ www.maharashtra.gov.in किंवा कृषि विभागाच्या www.krishi.maharashtra.gov.in या वेबसाईटला भेट द्यावी असेही सांगण्यात आले आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, १५ ऑक्टोबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# मंगरूळपीर पोलिसांचा 'फुल्ल ॲक्शन मोड'
# ३६ सीसीटीव्हींचा पहारा, आणखी ४० कॅमेऱ्यांचे नियोजन!

## टवाळखोरांनो, सावधान! नवरात्रोत्सवासाठी पोलिसांचा तगडा बंदोबस्त; महिला पथकासह तीन पोलीस वाहने तैनात

■ प्रतिनिधी | मंगरूळपीर ■

नवरात्रोत्सवाच्या उत्साहात मंगरूळपीर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी मंगरूळपीर पोलिसांनी कंबर कसली आहे. शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठा, मंदिर परिसर आणि गर्दीच्या ठिकाणांवर पोलिसांची करडी नजर राहणार असून, सध्या ३६ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून शहरावर देखरेख ठेवली जात आहे. याशिवाय आणखी ४० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. महिला पोलीस पथक, तीन पोलीस वाहने आणि २४ तास सुरू असलेली सुभाष चौकी यांच्या माध्यमातून सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत करण्यात आली आहे. त्यामुळे उत्सवाच्या नावाखाली हुल्लडबाजी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.




पोलीस स्टेशन मंगरूळपीरच्या ११ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकानुसार, शहरातील महत्त्वाच्या ठिकाणांसह गर्दीच्या परिसरात सीसीटीव्ही कॅमेऱ्यांद्वारे संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यात येत आहे. मुख्य बाजारपेठ, मंदिर परिसर, संवेदनशील भाग आणि इतर गर्दीच्या ठिकाणी विशेष दक्षता घेतली जाणार आहे. ग्रामीण भागातही नियमित गस्तीचे नियोजन करण्यात आले असून, कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे.

### तीन पोलीस वाहनांतून नियमित गस्त

शहरासह ग्रामीण भागात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तीन पोलीस वाहनांद्वारे नियमित गस्त घालण्यात येणार आहे. गर्दीच्या ठिकाणी संशयास्पद हालचाली आढळल्यास तातडीने प्रतिसाद देणे, तसेच नागरिकांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे, याला प्राधान्य देण्यात आले आहे. शहरातील सुभाष चौकी नागरिकांच्या सेवेसाठी २४ तास सुरू ठेवण्यात येत असल्याने नागरिकांना गरजेच्या वेळी पोलिसांशी संपर्क साधता येणार आहे.

### महिला व मुलींच्या सुरक्षेसाठी विशेष पथक

नवरात्रोत्सवादरम्यान महिला व मुलींच्या सुरक्षिततेसाठी महिला पोलीस कर्मचाऱ्यांचे विशेष पथक तैनात करण्यात आले आहे. गर्दीच्या ठिकाणी तसेच सार्वजनिक परिसरात छेडछाड, हुल्लडबाजी आणि नागरिकांना त्रास देणाऱ्या व्यक्तींवर पोलिसांची नजर राहणार आहे. सार्वजनिक ठिकाणी अतिक्रमण करून वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्यांविरुद्धही नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

### अफवा पसरविणाऱ्यांवरही लक्ष

नवरात्रोत्सव, विजयादशमी आणि धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पार्श्वभूमीवर शहरातील शांतता व सामाजिक सलोखा कायम राखण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. सोशल मीडियावरून खोटी माहिती, अफवा किंवा सामाजिक तेढ निर्माण करणारे संदेश प्रसारित करणाऱ्यांवर सायबर यंत्रणेच्या माध्यमातून लक्ष ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे कोणत्याही संदेशाची खातरजमा केल्याशिवाय तो पुढे पाठवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

### ठाणेदार किशोर शेळके यांचे नागरिकांना आवाहन

पोलीस निरीक्षक किशोर शेळके यांच्या स्वाक्षरीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या पत्रकातून नागरिकांनी उत्सव शांततेत आणि उत्साहात साजरा करावा, पोलिसांना सहकार्य करावे आणि कायद्याचे उल्लंघन टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कारंजा नगर परिषदेच्या दोन मुख्याध्यापकांसह तिघांचा अपघातात मृत्यू

■ प्रतिनिधी | कारंजा ■

कारंजा नगर परिषद संचालित उर्दू प्राथमिक शाळा क्रमांक १ व २ चे दोन मुख्याध्यापक आणि बजाज पल्सर मोटारसायकलचा चालक अशा तिघांचा भीषण रस्ते अपघातात मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना बुधवार, दि. १४ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजताच्या सुमारास शेलूबाजारजवळील तपोवन फाट्यावर घडली. या घटनेमुळे कारंजा शहरातील शैक्षणिक क्षेत्रात शोककळा पसरली आहे.

या अपघातात कारंजा नगर परिषद उर्दू प्राथमिक शाळा क्रमांक १ चे मुख्याध्यापक सैय्यद आबीद हुसैन सैय्यद रऊफ (वय ५६) आणि उर्दू प्राथमिक शाळा क्रमांक २ चे मुख्याध्यापक नाझीम मोहम्मद नूर मोहम्मद (वय ५७) यांच्यासह बजाज पल्सर मोटारसायकल चालक विजय गोविंदा चव्हाण (रा. पिंपळगाव)

## तपोवन फाट्याजवळ भीषण अपघात; पिंपळगाव येथील पल्सर चालकाचाही मृत्यू



यांचा मृत्यू झाला. पल्सर मोटारसायकलचा क्रमांक MH 30 BV 6331 असा आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दोन्ही मुख्याध्यापक शाळेच्या संचमान्यता कामानिमित्त कारंजा येथून वाशिम येथील प्राथमिक शिक्षण विभागाच्या कार्यालयाकडे मोटारसायकलने जात होते. दरम्यान, शेलूबाजारजवळील तपोवन फाट्यावर समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या बजाज पल्सर मोटारसायकलने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात दोन्ही मुख्याध्यापकांसह पल्सर चालकाचाही मृत्यू झाला.

अपघाताची माहिती मिळताच कारंजा मृतांच्या नातेवाइकांनी व शिक्षकांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर पुढील कार्यवाहीसाठी तिघांनाही मंगरूळपीर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

दोन्ही मुख्याध्यापक हे कारंजा नगर परिषदेच्या शिक्षण विभागात कार्यरत असल्याने त्यांच्या निधनाच्या वृत्ताने शिक्षकवर्गात हळहळ व्यक्त होत आहे. शालेय कामानिमित्त प्रवास करत असताना घडलेल्या या दुर्दैवी घटनेमुळे कारंजा नगर परिषद आणि शैक्षणिक क्षेत्रावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# चिनी व बनावट फटाक्यांवर वाशिम प्रशासनाचा बडगा

## ग्राहक दक्षता फाउंडेशनच्या तक्रारीनंतर विशेष मोहीम

■ प्रतिनिधी | वाशिम ■

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात चिनी, निकृष्ट आणि प्रतिबंधित फटाक्यांची अवैध विक्री व साठवणूक रोखण्यासाठी जिल्हा प्रशासन ?क्शन मोडवर आले आहे. सर्व उपविभागीय दंडाधिकारी आणि तहसीलदारांना विशेष तपासणी मोहीम राबवून दोषींवर कठोर कारवाई करण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाने दिले आहेत.

ग्राहक दक्षता कल्याण फाउंडेशनने २५ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार देऊन चिनी फटाक्यांमुळे ग्राहकांची फसवणूक व सुरक्षेला धोका असल्याचे निदर्शनास आणले होते. या तक्रारीची गंभीर दखल घेत प्रशासनाने ही कारवाई हाती घेतली आहे.

**ग्राहकांची फसवणूक थांबवा - नितीन सोळंके**

याबाबत फाउंडेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन सोळंके म्हणाले, 'कष्टाच्या पैशाने खरेदी केलेले फटाके फुसके निघाल्याने ग्राहकांची फसवणूक होते आणि सणाचा आनंद हिरावला जातो. प्रशासनाने असे फटाके बाजारातून जप्त करावेत. ग्राहकांनी केवळ 'पेसो' (ईएंध) मान्यताप्राप्त फटाकेच खरेदी करावेत आणि दुकानदारांनी वैध फटाक्यांची यादी दुकानात लावावी.'

**प्रशासनाचे प्रमुख निर्देश :**

१. पोलीस, अग्निशमन, नगरपालिका व 'पेसो' विभागाच्या संयुक्त पथकाकडून सर्व फटाका दुकाने, गोदामे व स्टॉल्सची तपासणी.

२. विस्फोटक नियम २००८ चे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई.

३. विनापरवाना व चिनी फटाका आढळल्यास साठा जप्त, दुकान बंद आणि फौजदारी गुन्हा दाखल.

४. सर्व दुकानांमधील अग्निसुरक्षा यंत्रणेची तपासणी.

सार्वजनिक सुरक्षिततेचा प्रश्न असल्याने या आदेशांची तातडीने अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# बोरविहिरींना बंदी, मग तलावातील पाण्याच्या अवैध उपशाला मोकळीक का?

■ प्रतिनिधी | रिसोड ■

वाशिम जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने पाण्याचा प्रत्येक थेंब जपण्याची गरज असताना खडकी सदार येथील तलावातील जिवंत पाण्याचा अवैध उपसा सुरू आहे. एका बाजूला नवीन बोरविहिरीं घेण्यासाठी बंदी घातली जात असताना दुसरीकडे तलावातील पाण्याचा उपसा होत असल्यास संबंधित यंत्रणा नेमकी काय करत आहे, असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे.

### दुष्काळात पाणी जपणार कोण?

दुष्काळाच्या झळा ग्रामीण भागाला बसत असताना शेतकरी आणि पशुपालकांसमोर पाण्याचा प्रश्न गंभीर बनत आहे. अशा परिस्थितीत गावातील तलावातील उपलब्ध पाणीसाठा जपणे अत्यंत आवश्यक आहे. तलावातील पाण्याचा उपसा असाच सुरू राहिला, तर भविष्यात जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे.

जिल्हाधिकारी साहेब, बोरविहिरी घेण्यास बंदी घालण्यात येत असेल, तर तलावातील पाणीसाठ्याचे संरक्षण करण्याची जबाबदारी



कोणाची? नियम केवळ बोरविहिरींसाठीच आहेत का? तलावातील पाण्याचा अवैध उपसा रोखण्यासाठी प्रशासन कोणती पावले उचलत आहे, असे प्रश्न ग्रामस्थांकडून उपस्थित केले जात आहेत.

### पथक नेमके करते तरी काय?

तलावातील पाण्याचा अवैध उपसा रोखण्यासाठी संबंधित विभागाचे पथक नेमण्यात आले आहे, मात्र पथकाकडून प्रत्यक्षात कोणती कारवाई केली जात आहे, याची माहिती समोर येणे गरजेचे आहे. तलावातील पाण्याचा उपसा अधिकृत परवानगीने सुरू आहे की नियमबाह्य पद्धतीने, याची चौकशी करून प्रशासनाने वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी होत आहे. केवळ आदेश काढून किंवा निर्बंध लादून पाणीटंचाईचा प्रश्न सुटणार नाही. नियमांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणेही तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी तलावाची पाहणी करून पाण्याचा उपसा नियमबाह्य असल्याचे आढळल्यास नियमानुसार कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### जनावरांना पाणी आणायचे कुठून, जिल्हाधिकारी साहेब?

दुष्काळात शेतकऱ्यांसमोर पिके वाचवण्याचे आव्हान आहे, तर पशुपालकांसमोर जनावरांची तहान भागवण्याची चिंता आहे. गावातील तलावातील पाणीसाठाच कमी झाला, तर मुक्या जनावरांना पाणी उपलब्ध करून देण्याचा प्रश्न गंभीर होऊ शकतो. 'बोरविहिरींवर बंदी घालता, तलावातील पाण्याचा उपसा सुरू असल्याच्या तक्रारींकडेही लक्ष द्या. उद्या तलावातील पाणी संपले, तर जनावरांना पाणी आणायचे कुठून? याचे उत्तर प्रशासनाने द्यावे,' असा सवाल या पार्श्वभूमीवर उपस्थित होत आहे.

# विद्याभारती शाळेच्या खेळाडूंचे शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये घवघवीत यश



■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम येथील विद्याभारती शाळेच्या खेळाडूंनी क्रीडा स्पर्धांमध्ये दमदार कामगिरी केली आहे. मैदानी स्पर्धा मुष्टियुद्ध व तायक्वांदोमध्ये विद्यार्थ्यांनी क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली. मैदानी स्पर्धेत आर्यन सुरेश राठोड याने ३००० मीटर धावण्यात तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळवून तो जिल्हास्तरावर पात्र झाला आहे.तर सौरव वसुदेव वारकड याने १५०० मीटर धावण्यात तृतीय क्रमांक मिळवला.

जिल्हास्तरीय मुष्टियुद्ध स्पर्धेत आशिष विनोद घुगे याने प्रथम साहिल मनोज बनसोड याने द्वितीय राजेंद्र अमोल दुबे याने द्वितीय तर यश शितल कांबळे याने तृतीय क्रमांक पटकावला. तायक्वांदो स्पर्धेत सौख्यदा सचिन ढोरे व साहिल मनोज बनसोड यांनी प्रथम स्वराली पुरुषोत्तम ढोबळे हिने द्वितीय तर तृतीय क्रमांक राजेंद्र अमोल दुबे याने मिळविला.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब लाव्हरे शाळेचे अध्यक्ष सुरेशराव मिटकरी संचालक सुमित मिटकरी मुख्याध्यापक नितेश मिटकरी पर्यवेक्षक विजय गोटे तसेच शिक्षकवृंद व पालकांनी खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# जय शिवशंकर भजनी मंडळींच्या भजनाने भक्तिमय वातावरण



■ प्रतिनिधी | शेलुबाजार ■

चोरद येथील भगवान बाबा नवदुर्गा मंडळाच्या धार्मिक कार्यक्रमात कोंडाळा महाली येथील जय शिवशंकर भजनी मंडळींनी सादर केलेल्या भक्तिमय भजनांनी उपस्थित भाविकांची मने जिंकली. भजनांच्या सुरांनी संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

जय शिवशंकर भजनी मंडळींनी एकापेक्षा एक सरस भजने सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या सुमधुर भजनांना भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्माचा सुंदर संगम या वेळी अनुभवायला मिळाला. भगवान बाबा नवदुर्गा मंडळाच्या माध्यमातून आयोजित या धार्मिक उपक्रमामुळे गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले. अशा कार्यक्रमांमुळे सामाजिक एकोपा होण्यासोबतच गावातील सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपराही जपली जात आहे.

# युवराज खैरे कुटुंबीयांचा माणुसकी जपणारा नेत्रदानाचा निर्णय

■ प्रतिनिधी | वाशिम ■

मृत्यू हा जीवनाचा शेवट असला, तरी माणुसकीचा अंत होत नाही, याचा प्रत्यय रिसोड तालुक्यातील मौजे हराळ येथील युवराज नामदेव खैरे (वय ४४) यांच्या कुटुंबीयांनी दिला आहे. युवराज खैरे यांच्या निधनानंतर दुःखाच्या प्रसंगातही त्यांच्या कुटुंबीयांनी धैर्याने निर्णय घेत मरणोत्तर नेत्रदान केले. त्यांच्या या निर्णयामुळे गरजू व्यक्तींच्या आयुष्यात पुन्हा प्रकाश येण्याची आशा निर्माण झाली असून, समाजासमोर माणुसकीचा प्रेरणादायी आदर्श ठेवला आहे.

जिवलग व्यक्तीच्या निधनानंतर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळलेला असताना नेत्रदानाचा निर्णय घेणे सोपे नसते. मात्र, युवराज खैरे यांच्या कुटुंबीयांनी भावनिक दुःखावर मात करत सामाजिक



बांधिलकी जपली. आपल्या प्रिय व्यक्तीचे नेत्र एखाद्या गरजू व्यक्तीला दृष्टी मिळवून देऊ शकतात, यापेक्षा मोठी श्रद्धांजली कोणती, या भावनेतून त्यांनी हा निर्णय घेतला. त्यामुळे युवराज खैरे यांच्या स्मृती जपण्यासोबतच इतरांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण होण्यास मदत होणार आहे.

नेत्रदान हे केवळ दान नसून मानवतेची अनमोल सेवा आहे. कॉर्नियाशी संबंधित अंधत्व असलेल्या व्यक्तींना मरणोत्तर नेत्रदानातून मिळालेल्या नेत्रपटलाच्या मदतीने दृष्टी मिळवून देणे शक्य होते. त्यामुळे नेत्रदानाबाबत समाजात जनजागृती होणे आणि अधिकाधिक नागरिकांनी या चळवळीत सहभागी होणे आवश्यक आहे. युवराज खैरे यांच्या कुटुंबीयांनी घेतलेला निर्णय या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

खैरे कुटुंबीयांची नेत्रदानाची अंतिम इच्छा जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अविनाश पुरी आणि नेत्रशल्यचिकित्सक डॉ. आशिष बेदरकर यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आली. नेत्रदान समुपदेशक रमेश ठाकरे आणि नेत्रचिकित्सा अधिकारी सुधीर साळवे यांनी मरणोत्तर नेत्रगोलक संकलित केले.

**नेत्रदान चळवळ लोकचळवळ व्हावी : डॉ. कावरखे**

समाजातील सर्व गणमान्य व्यक्तींनी नेत्रदान चळवळीत सक्रिय सहभाग घेऊन ती लोकचळवळ बनवावी. मृत्यूनंतर आपल्या जवळच्या व्यक्तीचे नेत्रदान वेळेत घडवून आणण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे यांनी केले. तसेच, मरणोत्तर नेत्रदानाचा प्रेरणादायी निर्णय घेतल्याबद्दल त्यांनी खैरे कुटुंबीयांचे आभार मानले.


## जाहीर नोटीस

**वि. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, न्यायालय क्रमांक १, मालेगांव जि.वाशिम यांचे न्यायालयात**

फौ. कि. अर्ज. क्र. ६८ / २०२६ चौकशी तारीख: २१/११/२०२६

मुजाहीद खाँ सरफराज खाँ

....... वि.......

**निबंधक, जन्ममृत्यु नोंदणी अधिकारी, नगर पंचायत, मालेगांव, ता. मालेगांव जि. वाशिम**

अर्जदार यांनी वि. न्यायालयामध्ये अर्ज कलम १३(३) जन्म मृत्यु नोंदणी आधिनियम १९६९ प्रमाणे जन्माची नोंद होणे बाबत अर्ज केला आहे.

सर्वत्र जनतेस कळविण्यात येते की, वरील प्रकरणात अर्जदार नामे मुजाहीद खाँ सरफराज खाँ यांचा जन्म दि. २०/१२/१९८९ रोजी राहते घरी मौजे मालेगांव, ता.मालेगांव, जि. वाशिम येथे झाल्याची नोंद नगर पंचायत, मालेगाव, ता. मालेगाव जि.वाशिम येथे घेणेसाठी कोर्टास निर्देश देणेकरीता अर्ज केला आहे.

तरी कोणास कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी दि. २१/११/२०२६ रोजी स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहुन आपली लेखी हरकत दाखल करावी अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरुन सदर प्रकरण कायद्यानुसार निकाली काढण्यात येईल.आज दिनांक ०९/१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्या निशी दिली.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहा अधिक्षक**
दिवाणी न्यायालय (क.स्तर), मालेगांव जि.वाशिम

## जाहीर सुचना

**जाहीर सुचना देणार-** १) आकाश देवराव अघडते, वय अं ३४ वर्षे, रा.सुंदर वाटिका, कारंजा, ता.कारंजा, जि.वाशीम, मो.क्र- ८६६८५७३३७२ २) प्राजक्ता गजानन गावंडे, वय अं ३० वर्षे, रा.अन्नपूर्णा माता मंदिर जवळ, डाबकी रोड, अकोला, जि.अकोला

या जाहीर नोटीस द्वारे/ सुचनेद्वारे सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की आमचे उपरोक्त जाहीर सुचना देणार पक्षकार यांनी मौजे पोहा, ता.कारंजा, जि.वाशीम येथील शेत सर्व्हे क्रमांक १४३/१/ब, क्षेत्र – २.३९ हे.आर, आकार-७.०० रु., पो.ख.०.०७ आर, भोगवटदार वर्ग १, खाते क्र ४११ या शेतीचा नोंदणीकृत खरेदी खताद्वारे खरेदी व्यवहार करण्याचे ठरविले आहे. या शेतीच्या चतुःसीमा पुढीलप्रमाणे आहेतः- उत्तरेस- शेत सर्व्हे क्रमांक १४२, दक्षिणेस- शेत सर्व्हे क्रमांक १३१ व १३३, पूर्वेस- शेत सर्व्हे क्रमांक १४५, पश्चिमेस – शेत सर्व्हे क्रमांक १४१ तसेच उपरोक्त नमूद मालमत्तेचे लगतधारक - शेत सर्व्हे क्रमांक १४३/१, १४३/१/अ, १४३/१/क, १४३/२, १४३/३ अशी आहेत.

आमचे पक्षकार यांनी उपरोक्त नमूद मालमत्तेचा सौदा नोंदणीकृत खरेदीखताद्वारे सौ.माधुरी सुभाष चौधरी, वय अं ५६ वर्षे, रा.पोहा, ता.कारंजा, जि.वाशीम यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. उपरोक्त मालमत्तेसंबंधित तशी इसार पावती ही जाहीर सुचना देणार क्र २ यांचेसोबत दिनांक १४/१०/२०२६ रोजी झालेला आहे.

तरी या जाहीर सुचनेद्वारे सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की उपरोक्त खरेदी/विक्री व्यवहाराबाबत कोणासही कोणताही आक्षेप असल्यास तसेच उपरोक्त मालमत्तेवर या आधी कोणताही खरेदी, विक्री, बोझा, गहाणखत, कर्ज व्यवहार, न्यायालयीन मनाई हुकुम, भाडेपट्टा, जप्ती यासंबंधी कोणतीही काही, तसेच इतर कोणताही व्यवहार झाला असल्यास व कोणत्याही नागरिकाचे कोणताही कायदेशीर हक्क तसेच वारसांसंबंधित व इतर कायदेशीर कोणताही आक्षेप असल्यास ही जाहीर सुचना प्रसिद्ध झाल्यासपासून ७ दिवसांचे आत आमचे पक्षकार यांचेशी संपर्क करावा. मुदतीत कोणाचाही लेखी आक्षेप न आल्यास, सदर मालमत्तेवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क वा बोजा नाही असे समजून आमचे पक्षकार सदर शेतजमिनीचे नोंदणीकृत खरेदीखत पूर्ण करतील. त्यानंतर आलेला कोणताही आक्षेप किंवा दावा आमच्या पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

**संपर्कासाठी नाव व पत्ता :-**

१) आकाश देवराव अघडते, वय अं ३४ वर्षे, रा.सुंदर वाटिका, कारंजा, ता.कारंजा, जि.वाशीम, मो.क्र- ८६६८५७३३७२२) प्राजक्ता गजानन गावंडे, वय अं ३० वर्षे, रा.अन्नपूर्णा माता मंदिर जवळ, डाबकी रोड, अकोला, जि.अकोला

दिनांक १५/१०/२०२६

**पक्षकारांतर्फे वकील**
**ॲ.सुजय दिलीप राऊळ**


# दुष्काळग्रस्तांना २५ हजार मदत यासह विविध मागण्यांसंदर्भात पोहरादेवीत रास्ता रोको!

■ प्रतिनिधी | मानोरा ■

संपूर्ण तालुक्यासह पोहरादेवी परिसरात तीव्र दुष्काळ जाहीर झालेला असून पिके करपून गेल्यामुळे शेतकरी व सर्वसामान्यांचे उत्पन्नाचे साधन पूर्णपणे नष्ट झाले आहे. या पार्श्वभूमीवर दुष्काळग्रस्त परिस्थितीत हेक्टरी २५ हजार रुपये सरसकट मदतीसह विविध मागण्या संदर्भात पोहरादेवी येथे महंत रमेश महाराज यांच्या नेतृत्वात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, दुष्काळी परिस्थितीत मायक्रो बँक फायनान्स कंपन्या किंवा संबंधित मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून कर्ज वसुलीसाठी अत्यंत सक्ती केली जात आहे, ज्यामुळे शेतकरी व महिलांवर मानसिक दबाव येत आहे. तरी शासनाच्या नियमानुसार या दुष्काळी परिस्थितीत



सदर वसुली त्वरित स्थगित करण्यात यावी. दुष्काळामुळे कुटुंबांपुढे उदरनिर्वाहाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. हाताला काम नाही आणि घरात अन्नधान्याची टंचाई आहे. त्यामुळे मजूर व दुष्काळग्रस्त भागातील बाधित कुटुंबांना शासनाकडून तातडीची आर्थिक मदत म्हणून प्रति कुटुंब २५,००० रुपये अनुदान किंवा सानुग्रह अनुदान स्वरूपात थेट बँक खात्यात जमा करण्यात यावे, जेणेकरून कुटुंबांना तात्पुरता दिलासा द्यावा, बंजारा समाजाचे श्रद्धास्थान आणि पवित्र तीर्थक्षेत्र असलेल्या पोहरादेवी काशी परिसरात सध्या मोठ्या प्रमाणावर अवैध देशी दारूचे विक्री आणि जुगार अड्डे राजरोसपणे सुरू आहेत. यामुळे पवित्र क्षेत्राचे पावित्र्य भंग पावत असून, दुष्काळात आधीच आर्थिक संकटात असलेले तरुण व नागरिक या व्यसनाधीनतेमुळे उद्ध्वस्त होत आहेत. गावात धांगडधिंगा, मारामारी आणि लुटमारीच्या घटना वाढल्या आहेत. तरी ही देशी दारूचे दुकान आणि सर्व जुगार अड्डे कायमचे बंद करण्यात यावे. यासह विविध समस्या तात्काळ सोडवाव्यात यासाठी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी महंत बापुराव साबळे, प्रेम राठोड, रमेश वानखडे, मखराम पवार आदीसह शेतकरी व सुशिक्षित बेरोजगार युवक आंदोलनात सहभागी झाले होते.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३१८ ■ गुरुवार, १५ ऑक्टोबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# कारंजाच्या दुष्काळी निर्णयावरून श्रेययुद्ध

## अमर काळेंचा रास्ता रोकोचा दावा; सुमित वानखेडेंनी पाठपुराव्याला दिले यशाचे श्रेय

**कारंजा / वर्धा जनमाध्यम :** कारंजा तालुका दुष्काळग्रस्त यादीत समाविष्ट होताच या निर्णयाच्या श्रेयावरून खासदार अमर काळे आणि आमदार सुमित वानखेडे यांच्यात राजकीय दावे-प्रतिदावे सुरू झाले आहेत. काळे यांनी १ ऑक्टोबरच्या रास्ता रोको आंदोलनाला यशाचे श्रेय दिले, तर वानखेडे यांनी शासनदरबारी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे निर्णय झाल्याचे म्हटले आहे. मात्र, शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत मिळेपर्यंत हा निर्णय पूर्णत्वास जाणार नाही.



**काळे म्हणतात, आंदोलनामुळे शासनाला निर्णय घ्यावा लागला**

कारंजा तालुक्यातील पर्जन्यमानातील तूट, पिकांचे नुकसान आणि उत्पादनातील घट लक्षात घेता तालुक्याला दुष्काळग्रस्त घोषित करावे, या मागणीसाठी खासदार अमर काळे यांच्या नेतृत्वाखाली १ ऑक्टोबर रोजी नारा टी-पॉईंट येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात शेतकऱ्यांनी सहभाग घेत अमरावती-नागपूर महामार्गावरील वाहतूक रोखली होती. तालुक्याचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश, दुष्काळी मदत आणि सरसकट कर्जमाफी या प्रमुख मागण्या आंदोलनातून करण्यात आल्या होत्या.

या आंदोलनानंतर १४ ऑक्टोबर रोजी शासन निर्णय निर्गमित झाल्याने आंदोलनाच्या दबावामुळेच शासनाला निर्णय घ्यावा लागल्याचा दावा काळे यांच्या गोटातून केला जात आहे. स्वतः काळे यांनीही हा विजय केवळ आपला नसून रस्त्यावर उतरलेल्या शेतकऱ्यांच्या एकजुटीचा असल्याचे म्हटले आहे. त्याचवेळी दुष्काळी मदत प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईपर्यंत पाठपुरावा सुरू ठेवण्याची भूमिका त्यांनी स्पष्ट केली आहे.

**वानखेडेंचा प्रतिदावा ; मुख्यमंत्र्यांच्या सहकार्याचाही उल्लेख-** दुसरीकडे, आमदार सुमित वानखेडे यांनी कारंजा तालुक्याचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश होण्याचे श्रेय आपल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला दिले आहे. सुरुवातीला तालुक्याचा समावेश झाला नसताना आपण शासनदरबारी प्रश्न लावून धरला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सहकार्यामुळे हा प्रश्न मार्गी लागल्याचे वानखेडे यांनी म्हटले आहे. त्यामुळे एकाच निर्णयासाठी खासदारांनी रस्त्यावरील आंदोलनाचा, तर आमदारांनी प्रशासकीय पाठपुराव्याचा आधार घेतला आहे. दोघांच्याही दाव्यांमधील नेमके योगदान स्वतंत्रपणे स्पष्ट होणे आवश्यक असले, तरी निर्णयानंतर श्रेयाची लढाई रंगू लागली आहे.

### घोषणा झाली; आता मदत शेतकऱ्यांच्या हातात कधी

कारंजा तालुक्याचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश झाल्याने जमीन महसुलात सूट, पीककर्जाचे पुनर्गठन, कर्जवसुलीला स्थगिती, कृषी वीजबिलात सवलत आणि विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी यांसारख्या उपाययोजनांचा लाभ नियमानुसार मिळण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो. मात्र, यातील प्रत्येक सवलतीची अंमलबजावणी संबंधित शासन नियम आणि आदेशांनुसारच होणार आहे. तालुक्याचा समावेश झाला म्हणजे सरसकट कर्जमाफी किंवा सर्व शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत मंजूर झाली, असे मानता येणार नाही.

त्यामुळे शासन निर्णयातील तरतुदींची प्रत्यक्ष अंमलबजावणी कधी सुरू होणार, पात्र शेतकऱ्यांची निश्चिती कशी होणार, मदतीचे वाटप कधी होणार आणि कोणत्या शेतकऱ्यांना किती लाभ मिळणार, याबाबत प्रशासनाने स्पष्टता देणे गरजेचे आहे.

आंदोलनाचे श्रेय असो वा पाठपुराव्याचा दावा, शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्याची जबाबदारी आता दोन्ही लोकप्रतिनिधींवर आहे. राजकीय श्रेयापेक्षा शेतकऱ्यांच्या खात्यात मदत जमा होण्याची तारीख महत्त्वाची ठरणार आहे.

# धाम नदीने महिनाभरात दुसरा तरुण हिरावला

## आरबीआयमध्ये नुकतीच नियुक्ती; कुणालचा मृतदेह पुलाखाली आढळला

**पवनार (वर्धा) जनमाध्यम :** उज्ज्वल भविष्याची स्वप्ने डोळ्यांत घेऊन उंबरठ्यावर उभ्या असलेल्या २६ वर्षीय तरुणाचा धाम नदीच्या पात्रात मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना बुधवारी सकाळी उघडकीस आली. सिंदी मेघे येथील कुणाल भारत मडावी याचा मृतदेह आश्रमाकडे जाणाऱ्या पुलाखाली आढळून आला. भारतीय रिझर्व्ह बँकेत नुकतीच नियुक्ती झालेल्या कुणालच्या मृत्यूने परिसरात शोककळा पसरली आहे. महिनाभरात धाम नदीत दुसऱ्या तरुणाचा मृत्यू झाल्याने नदी परिसरातील सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

### सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर; उच्चशिक्षित तरुणाच्या मृत्यूने हळहळ

कुणाल मंगळवारी सायंकाळी कुटुंबीयांना 'दहा मिनिटांत येतो,' असे सांगून घराबाहेर पडला. मात्र, बराच वेळ उलटूनही तो परतला नाही. त्यामुळे चिंताग्रस्त कुटुंबीयांनी रामनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिस आणि नातेवाइकांकडून त्याचा शोध सुरू असतानाच बुधवारी सकाळी धाम नदीच्या पात्रात त्याचा मृतदेह आढळून आला.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेतला. पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला. मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून पोलिसांचा पुढील तपास सुरू आहे.

कुणाल उच्चशिक्षित होता. भारतीय रिझर्व्ह बँकेत त्याची नुकतीच नियुक्ती झाली होती. दोन दिवसांचे प्रशिक्षण पूर्ण करून तो गावी परतला होता. करिअरची नवी सुरुवात, कुटुंबाच्या अपेक्षा आणि भविष्याची स्वप्ने अशा आनंदाच्या क्षणी काळाने घाला घातला. ज्या तरुणाकडून कुटुंबाला मोठ्या अपेक्षा होत्या, त्याचाच मृतदेह नदीत आढळल्याने नातेवाइकांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

**महिनाभरात दुसरी घटना; सुरक्षिततेचे काय**

धाम नदीत महिनाभरात दोन तरुणांचा मृत्यू झाल्याने नदी परिसरातील सुरक्षिततेचा मुद्दा गंभीर बनला आहे. अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रशासनाने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

# गुगल पेच्या बहाण्याने सराफाला गंडा घालण्याचा प्रयत्न

## २५ हजार ८०० रुपयांचे दागिने घेऊन पोबारा; नागरिकांनी पाठलाग करून पकडले

**पुलगाव जनमाध्यम :** गुगल पेवर पैसे पाठविण्याचे आमिष दाखवत सोन्याचे दागिने घेऊन पळ काढण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोघांना नागरिकांनी पाठलाग करून पकडले. ही घटना महावीर चौकातील सराफा दुकानात घडली. रोहितसिंग बावरी (१९) आणि रोहित सावळे (२०), दोघेही रा. सद्गुरुनगर, बडनेरा, अशी पकडण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. नागरिकांनी दोघांना पुलगाव पोलिसांच्या स्वाधीन केले.

प्रवीण बदनोर यांचे महावीर चौकात सराफा दुकान आहे. रोहितसिंग बावरी आणि रोहित सावळे हे दोघे सोन्याचे दागिने खरेदी करण्याच्या बहाण्याने दुकानात आले. त्यांनी सोन्याची अंगठी आणि बेसर असे एकूण २५ हजार ८०० रुपयांचे दागिने खरेदी करण्याचे सांगितले. त्यानुसार बदनोर यांनी दागिने पॅक केले.

पैसे मागितल्यानंतर आरोपींनी गुगल पेवर पैसे पाठवत असल्याचे सांगत पाच मिनिटे थांबण्यास सांगितले. त्यातील एक जण दुकानाबाहेर गेला, तर दुसऱ्याने पैसे पाठविण्याच्या बहाण्याने स्कॅनर मागितले. बदनोर हे ड्रॉवरमधून पर्स काढत असताना एकाने काउंटरवरील दागिन्यांची डबी उचलून पळ काढला.

दागिने घेऊन आरोपी पळत असल्याचे लक्षात येताच बदनोर यांनी आरडाओरड केली. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी पाठलाग करून दोघांनाही पकडले आणि पोलिसांच्या ताब्यात दिले. या प्रकरणी बदनोर यांच्या तक्रारीवरून पुलगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# अनर्थ टळला... बजाज चौकात झाडाची मोठी फांदी कोसळली

## काही सेकंदांपूर्वीच पाच ते सहा जण उभे होते; केळीच्या हातगाडीचे नुकसान

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील गजबजलेल्या बजाज चौकात मुडके बुक स्टॉलजवळ असलेल्या झाडाची मोठी फांदी अचानक सायंकाळच्या सुमारास कोसळली. सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झाली नाही. मात्र, काही सेकंदांपूर्वीच याच ठिकाणी पाच ते सहा जण उभे होते. ते बाजूला गेल्यानंतरच फांदी कोसळल्याने मोठा अनर्थ टळला.



बजाज चौक हा नेहमीच नागरिकांच्या वर्दळीचा परिसर आहे. मुडके बुक स्टॉलजवळ नागरिकांची ये-जा सुरू असतानाच झाडाची मोठी फांदी अचानक खाली कोसळली. या घटनेमुळे परिसरात काही काळ घबराट निर्माण झाली. फांदी कोसळल्याने जवळील केळी विक्रेत्याच्या हातगाडीचे नुकसान झाले.

काही सेकंदांचा फरक आणि मोठा अनर्थ टळला! झाडाखाली उभे असलेले नागरिक काही क्षणांपूर्वीच तेथून बाजूला झाल्याने जीवितहानी टळली.

# अत्याचाराच्या गुन्ह्यात आरोपीला १० वर्षांचा कारावास

## हिंगणघाट सत्र न्यायालयाचा निकाल

**वर्धा जनमाध्यम :** महिलेवर दोन वेळा अत्याचार करून तिचा मोबाईल आणि दोन हजार रुपये जबरीने हिसकावून घेतल्याच्या प्रकरणात हिंगणघाट येथील सत्र न्यायालयाने आरोपीला १० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. अंकुश उर्फ सोम्या महादेव सलामे (३६, रा. सावली सास्ताबाद, जि. वर्धा) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. न्यायालयाने त्याला पाच हजार रुपयांचा दंडही ठोठावला असून दंड न भरल्यास तीन महिने अतिरिक्त सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे.



प्रकरणातील पीडिता तरोडा बसस्थानक ते तरोडा पारधी बेड्यादरम्यान असलेल्या शाळेजवळ उभी होती. त्यावेळी आरोपीने तिला वर्धा येथे सोडून देण्याचे सांगून दुचाकीवर बसवले. त्यानंतर रस्त्यालगतच्या नालीतील गवतात नेऊन तिला जबरदस्तीने दारू पाजली आणि मारहाण करून दोन वेळा तिच्यावर अत्याचार केला. यानंतर तिचा मोबाईल आणि दोन हजार रुपये जबरीने हिसकावून घेतले. या प्रकरणी हिंगणघाट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा तपास तत्कालीन पोलिस निरीक्षक विजय नाईक यांनी करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सरकारी पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता दीपक वैद्य यांनी कामकाज पाहिले. पैरवी अंमलदार महिला पोलिस हवालदार रंजना झिलपे यांनी साक्षीदारांना न्यायालयात वेळोवेळी उपस्थित केले. तसेच हिंगणघाटचे तत्कालीन ठाणेदार पोलिस निरीक्षक अनिल राऊत यांनी साक्षीदारांना मार्गदर्शन केले.

सत्र न्यायालय क्रमांक एकचे न्यायाधीश धनराज काळे यांनी भारतीय दंड विधानाच्या कलम ३७६ (२) (N) अंतर्गत आरोपीला १० वर्षांच्या सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली.

# तहसीलसमोरच आचारसंहितेला ठेंगा

## शिवसेनेचा फलक उघडाच; नवीन आष्टीत भाजपचाही बोर्ड कायम

**आष्टी (शहीद) जनमाध्यम :** आचारसंहितेचे नियम सर्वसामान्यांसाठी आणि राजकीय पक्षांसाठी वेगवेगळे आहेत काय असा प्रश्न आष्टीत उपस्थित होत आहे. तहसील कार्यालयासारख्या महत्त्वाच्या प्रशासकीय केंद्रासमोरच शिवसेनेचा फलक अद्याप उघडा असून, नवीन आष्टी परिसरातील भारतीय जनता पक्षाचा फलकही झाकण्यात आलेला नाही. प्रशासनाच्या नजरेसमोरच राजकीय पक्षांचे फलक कायम असतील, तर आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी नेमकी कुणासाठी, असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे.



**प्रशासनाच्या दारातच नियमांची ऐशीतैशी**

निवडणुकीच्या काळात आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करणे अपेक्षित असते. राजकीय पक्षांचे फलक, बॅनर आणि प्रचारात्मक साहित्याबाबत निवडणूक आयोगाच्या लागू निर्देशांनुसार कार्यवाही होणे आवश्यक आहे. मात्र, तहसील कार्यालयासमोरच शिवसेनेचा फलक उघडा दिसत असताना आणि नवीन आष्टीत भाजपचा फलक कायम असताना संबंधित यंत्रणा नेमकी काय करीत आहे, हा प्रश्न अनुत्तरित आहे.

**जबाबदारी झटकण्याचा खेळ सुरू आहे काय**

राजकीय फलक झाकण्याची जबाबदारी निवडणूक निर्णय अधिकारी, तहसील प्रशासन की स्थानिक स्वराज्य संस्थेची? संबंधित विभागांमध्ये समन्वयाचा अभाव आहे की नियमांच्या अंमलबजावणीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे? हे स्पष्ट होणे गरजेचे आहे.

एका पक्षाचा फलक उघडा आणि दुसऱ्या पक्षाचा बोर्डही कायम असेल, तर कारवाईतील समानतेबाबत प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

**कारवाई केव्हा होणार**

निवडणूक नियमांची अंमलबजावणी करताना कोणत्याही राजकीय पक्षाला झुकते माप न देता समान निकष लावणे आवश्यक आहे.

संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून लागू निर्देशांनुसार कार्यवाही करावी आणि फलक अद्याप का झाकण्यात आले नाहीत, याचा खुलासा करावा.

अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. प्रशासनाच्या दारातच राजकीय फलक उघडे राहत असतील, तर आचारसंहितेच्या अंमलबजावणीचा धाक कुठे उरला आता प्रशासन केवळ नियम सांगणार की प्रत्यक्ष कारवाईही करणार, याकडे आष्टीकरांचे लक्ष लागले आहे.

# सेलूत अतिक्रमणधारकांना हक्काच्या पट्ट्यांचा मार्ग मोकळा

## ५०० चौरस फुटांपर्यंत शुल्कमाफी; ३१ डिसेंबर अंतिम मुदत

**सेलू / जनमाध्यम :** सेलू नगरपंचायत हद्दीतील मौजा बेलगाव येथील जोशीनगर, शिक्षक कॉलनी आणि बंजारा वस्तीतील नागरिकांना हक्काचे पट्टे मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. अतिक्रमण नियमितीकरणासाठी प्रशासनाने पुढाकार घेतला असून, पात्र नागरिकांना ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत अर्ज करण्याची संधी देण्यात आली आहे. मुदतीनंतर अतिक्रमण नियमित केले जाणार नसल्याने नागरिकांनी तत्परता दाखविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या संदर्भात १३ ऑक्टोबर रोजी सेलू तहसील कार्यालयात उपविभागीय अधिकारी कुश मोटवानी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. नगराध्यक्ष स्नेहल देवतारे, मुख्याधिकारी अनुप अग्रवाल, सभापती शैलेंद्र दफ्तरी, नगरसेविका गीता रामगडिया, नगरसेवक राजेश जयस्वाल यांच्यासह नागरिक उपस्थित होते.



**५०० चौरस फुटांपर्यंत शुल्कमाफी**

शासनाच्या २५ मार्च २०२६ च्या निर्णयानुसार ५०० चौरस फुटांपर्यंतच्या जागेसाठी शुल्क आकारले जाणार नाही. त्यापेक्षा अधिक क्षेत्राच्या नियमितीकरणासाठी शासकीय दरानुसार मूल्यांकनाच्या १० टक्के शुल्क भरावे लागणार आहे.

**पुरावे आवश्यक; अन्यथा संधी हुकणार**

अतिक्रमण १ जानेवारी २०११ रोजी किंवा त्यापूर्वीचे असल्याचे सिद्ध करावे लागेल. यासाठी मतदार यादीतील नाव, वीज बिल, मालमत्ता कराची पावती, शिधापत्रिका वगळता अन्य शासकीय निवासी पुरावे, नमुना ८-अ उतारा, सर्वेक्षण नोंदवही आणि उपग्रह छायाचित्रे ग्राह्य धरली जातील.

अर्ज स्वीकारण्यासाठी तहसील कार्यालयात विशेष शिबिर आयोजित करण्यात येणार आहे. मुदतीनंतर दंडात्मक कारवाई प्रस्तावित होऊ शकते. त्यामुळे पात्र नागरिकांनी वेळेत कागदपत्रे सादर करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्याधिकारी अनुप अग्रवाल यांनी केले.

# पदवीधर मतदारसंघ निवडणूक काळात विविध बाबींवर निर्बंध लागू

**वर्धा जनमाध्यम :** महाराष्ट्र विधानसभेच्या पदवीधर मतदारसंघाचा द्विवार्षिक निवडणूक कार्यक्रम जाहिर करण्यात आला असून जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्ह्यात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार विविध बाबीवर निर्बंध लागू करण्यात आले आहे.

जिल्हा दंडाधिकारी कार्यालय, उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, तालुका दंडाधिकारी कार्यालय तसेच जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालय, संस्था आणि शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्यावर कोणत्याही राजकीय पक्षाने, व्यक्तीने, संघटनेने, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने किंवा त्यांच्या प्रतिनिधीने किंवा त्यांच्या हितचिंतकाने धरणे, आंदोलने, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निर्बंध लावण्यात आले आहे.

तसेच सदर ठिकाणी सभा घेणे, आवाराचा वापर राजकीय कामासाठी करणे किंवा रॅली काढणे, निवडणूक संबंधाने पोस्टर्स, बॅनर्स, पॉम्प्लेट, कटआऊट, पेंटीग्स, होर्डीग्ज लावणे, निवडणुकीविषयक घोषवाक्य लिहिणे किंवा आवारात निवडणूक विषयक घोषणा देणे किंवा मतदाराला प्रलोभन दाखविणे आणि निवडणूकीच्या कामात बाधा निर्माण होईल, अशी कृती करणे या बाबींवर निर्बंध लावण्यात आले आहे, असे जिल्हादंडाधिकारी यांच्या आदेशात नमूद केले आहे.

# वर्धा जिल्ह्यातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना मुख्यालय सोडण्यास मनाई

## दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिका-यांचे आदेश

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात निर्माण झालेल्या गंभीर दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व विभागांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी पूर्णवेळ हजर राहावे, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या अध्यक्षांनी दिले आहेत.

जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आर्थिक व मानसिक संकटाचा सामना करीत आहेत. या पार्श्वभूमीवर दुष्काळ निवारण, पीक पाहणी, कर्ज पुनर्गठन आणि शेतकरी सहाय्याची कामे सर्वोच्च प्राधान्याने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

महसूल, कृषी, ग्रामविकास, नगरविकास, भूमी अभिलेख, महावितरण, पशुसंवर्धन, जलसंपदा, शिक्षण, पुरवठा, सहकार आणि पाणीपुरवठा आदी विभागांतील जिल्हा व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांना पूर्वपरवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही. तसेच, संबंधित अधिकाऱ्यांच्या रजेच्या मंजुरीचे सर्वाधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या अध्यक्षांकडे राखीव ठेवण्यात आले आहेत. रजेचा अर्ज सबळ कारणांसह संबंधित विभागप्रमुखांच्या अभिप्रायासह जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करणे आवश्यक राहील. पूर्वपरवानगी मिळाल्याशिवाय कोणत्याही अधिकाऱ्याला रजेवर जाता येणार नाही. असे आदेशात नमुद करण्यात आले आहे. मुख्यालय सोडणे, परस्पर रजा मंजूर करून घेणे किंवा विनापरवानगी गैरहजर राहणे आढळल्यास संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ नुसार विभागीय चौकशी व निलंबनाची कारवाई प्रस्तावित करण्यात येईल. तसेच, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ अंतर्गत लागू तरतुदींनुसार दंडात्मक व फौजदारी कारवाईही करण्यात येऊ शकते. या आदेशाची सर्व जिल्हास्तरीय व क्षेत्रीय विभागप्रमुखांनी गांभीर्याने नोंद घेऊन तात्काळ व काटेकोर अंमलबजावणी करावी, असे आदेशात नमुद करण्यात आले आहे.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# पतीची हत्या करून निळ्या ड्रममध्ये भरणाऱ्या मुस्कानला फाशी

## प्रियकर साहिललाही फाशीची शिक्षा; मेरठ न्यायालयात म्हणाली- माझ्या मुलींची काळजी घ्या




अटकेनंतर मुस्कानला न्यायालयात हजर करून तुरुंगात पाठवण्यात आले. माध्यमांनी हत्येशी संबंधित प्रश्न विचारले, तेव्हा ती शांत राहिली.



फोटो सुमारे ६ महिन्यांपूर्वीचा आहे. न्यायालयात हजर करण्यासाठी आणलेल्या मुस्कानच्या कुशीत ६ महिन्यांची मुलगीही होती. तिने तुरुंगातच मुलीला जन्म दिला होता.



१८ मार्च २०२५ रोजी शवविच्छेदनासाठी ड्रम कापण्यात आला. त्यानंतर गोठलेले सिमेंट फोडण्यात आले. तेव्हा मृतदेहाचे तुकडे सापडले.

**मेरठ/वृत्तसंस्था-** मेरठमध्ये प्रियकरासोबत मिळून पती सौरभ राजपूतची हत्या करणाऱ्या मुस्कानला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. तिचा प्रियकर साहिललाही न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली. शिक्षा सुनावण्यापूर्वी तुरुंगात असलेल्या मुस्कान आणि साहिलला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे जोडण्यात आले. मुस्कान रस्तोगी आणि साहिल ढसाढसा रडू लागले. न्यायाधीशांनी मुस्कानला विचारले- तू तुझा पती सौरभ राजपूतच्या हत्येप्रकरणी दोषी आहेस, तुला कोणती शिक्षा हवी आहे? तिने उत्तर दिले- माझ्या मुलींची काळजी घेतली जावी. त्यानंतर ती शांत झाली. यानंतर साहिलला हाच प्रश्न विचारण्यात आला, मात्र तो गप्प राहिला.

**आईला अश्रू अनावर-** शिक्षेची घोषणा झाल्यानंतर सौरभच्या आईला अश्रू अनावर झाले. त्या म्हणाल्या- शांतपणे न्याय मिळाला. सौरभ राजपूतची हत्या ३ मार्च २०२५ रोजी झाली होती. मृतदेहाचे ५ तुकडे करून तो निळ्या ड्रममध्ये भरला होता.

**सौरभचा भाऊ म्हणाला- फाशीची शिक्षा हीच योग्य शिक्षा होती**

सौरभचा भाऊ बबलू म्हणाला, 'आम्हाला न्याय मिळेल अशी आशा होती. सुरुवातीपासूनच आमची एकच मागणी होती, ती म्हणजे फाशीची शिक्षा. त्यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे हे समजल्यावर आम्हाला खूप आनंद झाला आहे. जर त्यांनी अपील केले किंवा पुढील कायदेशीर पावले उचलली, तर आम्ही त्यालाही कायदेशीररीत्या विरोध करू. ज्यांनी हे कृत्य केले आहे त्यांना शिक्षा व्हावी—आणि विशेषतः त्यांना फाशीची शिक्षा व्हावी—अशी प्रार्थना आम्ही देवीकडे करत होतो. आमचा त्या व्यक्तीशी कोणताही संपर्क नाही; तिला परत स्वीकारण्याची किंवा तिच्याशी कोणतेही संबंध ठेवण्याची आमची इच्छा नाही. जरी आमच्यावर डीएनए चाचणीसाठी दबाव आणला गेला, तरी आमचे कुटुंब ती करण्यास नकार देईल.'

**वकिलांचे म्हणणे: दोघांनाही फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे-** सरकारी वकील विजय बहादूर यांनी सांगितले, 'साहिल आणि मुस्कान यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली असून, त्यांच्यावर २०,००० रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला आहे. शिक्षा सुनावल्यानंतर मुस्कान आणि साहिल दोघेही भावूक झाले आणि त्यांना हुंदके देऊन रडू कोसळले.'

**साहिल आणि मुस्कान यांना विशेष बराकींमध्ये हलवले जाणार**

फाशीची शिक्षा सुनावल्यानंतर, जिल्हा कारागृहातील साहिल आणि मुस्कान यांच्याबाबतच्या व्यवस्थेत बदल करण्यात आले आहेत. निकाल जाहीर झाल्यानंतर संध्याकाळी कारागृह प्रशासनाची एक बैठक झाली, ज्यामध्ये या दोघांसाठीच्या नवीन कार्यपद्धतींवर चर्चा करण्यात आली. त्यांना २४ तासांच्या आत विशेष बराकींमध्ये हलवले जाईल.

आतापर्यंत, मुस्कान रस्तोगी बराक क्रमांक १२-बी मध्ये आणि साहिल शुक्ला बराक क्रमांक १५ मध्ये सामान्य कपड्यांमध्ये राहत होते. फाशीची शिक्षा सुनावल्यानंतर, मुस्कानला आता क्रीम रंगाची साडी किंवा सूट परिधान करावा लागेल, तर साहिलला पांढरा कुर्ता-पायजमा परिधान करावा लागेल. कारागृहाचे वरिष्ठ अधीक्षक डॉ. वीरेश राज शर्मा यांनी सांगितले की, न्यायालयाच्या निकालाची प्रत मिळताच या नवीन व्यवस्थेची अंमलबजावणी केली जाईल. लवकरच या दोघांनाही कैदी क्रमांक दिले जातील.

**न्यायालयाबाहेर वकिलांकडून लाडूंचे वाटप-** मुस्कान आणि साहिल यांना फाशीची शिक्षा सुनावल्यानंतर मेरठ न्यायालयाबाहेर लाडूंचे वाटप करण्यात आले. वकिलांनी एकमेकांना लाडू भरवून आपला आनंद व्यक्त केला. इतक्या भयंकर गुन्ह्यासाठी फाशीची शिक्षा हाच योग्य निर्णय असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणात फाशीच्या शिक्षेची मोठ्या प्रमाणावर मागणी होत होती, म्हणूनच हे लाडू वाटले जात असल्याचे वकिलांनी स्पष्ट केले.

**महिलेला फाशीची शिक्षा सुनावणे हा एक पायंडा पाडणारा निर्णय- वकील**

अधिवक्ता कृष्ण कुमार दुबे यांनी सांगितले की, या गुन्ह्यासाठी मुस्कान आणि साहिल यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली आहे. न्यायालयाने कलम ३०२ अन्वये ५०,००० रुपये आणि कलम २३८ए अन्वये २०,००० रुपयांचा दंडही ठोठावला आहे. हा एक ऐतिहासिक निकाल आहे. या दोघांना कोणती शिक्षा मिळते, याकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले होते. शिक्षा सुनावल्यानंतर दोघेही हादरलेले दिसत होते; ज्याला फाशीची शिक्षा सुनावली गेली आहे, त्याच्या मनस्थितीची केवळ कल्पनाच केली जाऊ शकते.

त्यांनी पुढे नमूद केले की, देशातील न्यायालयांनी दिलेल्या निकालांमध्ये हे एक महत्त्वपूर्ण प्रकरण आहे, कारण एखाद्या महिलेला फाशीची शिक्षा सुनावणे ही स्वतःच एक पायंडा पाडणारी बाब आहे. जिल्हा न्यायाधीश अरविंद कुमार मिश्रा यांनी सौरभ राजपूतच्या हत्येप्रकरणी मुस्कान आणि साहिल यांना फाशीची शिक्षा सुनावली. ही हत्या त्या दोघांनी अत्यंत क्रूरपणे केल्याचे नमूद करत, न्यायाधीशांनी स्पष्ट केले की शिक्षेत सवलत देण्याबाबतच्या कोणत्याही विनंतीचा विचार केला जाणार नाही. मुस्कान आणि साहिल यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे कारागृहातूनच न्यायालयीन कामकाजात सहभाग घेतला. फाशीची शिक्षा ऐकताच दोघेही ढसाढसा रडू लागले.

### अंगणवाडी सेविका, मदतनीसांना दिवाळीची भाऊबीज

# सरकारकडून २००० रुपयांची घोषणा

**मुंबई/ प्रतिनिधी-** यंदाच्या दिवाळीवर दुष्काळाचे सावट असून शेतकरी हवालदील झाला आहे. राज्य सरकारने ३०० हून अधिका तालुक्यात दुष्काळ जाहीर केला असून शेतकऱ्यांच्या शेतातील पीकांचे पंचनामेही करण्यात आले आहे. त्यामुळे, आता बळीराजाला नेमकं मदत कधी मिळणार याचीच उत्सुकता सर्वांना आहे. त्याच पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वीच ५ हजार रुपयांची अग्रीम मदत करण्याचा निर्णय सरकारने घेतला. त्यासह, राज्यातील अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांनाही दिवाळीची भाऊबीज म्हणून २००० रुपये देण्याचे जाहीर करण्यात आले. राज्यातील एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना दिवाळीपूर्वीच शासनाकडून भाऊबीज भेट म्हणून प्रत्येकी दोन हजार रुपये देण्यात येणार असल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.



राज्यात १,०८,६२७ अंगणवाडी सेविका आणि १,०५,४७० अंगणवाडी मदतनीस आहेत. त्यामुळे, दोन्हींची एकूण पदसंख्या २,१४,०९७ एवढी कार्यरत आहे. या सर्व कार्यरत अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना प्रत्येकी दोन हजार रुपये भाऊबीज भेट देण्यात येणार आहे. त्यासाठी ४२ कोटी ८१ लाख ९४ हजार रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील गर्भवती महिला, स्तनदा माता आणि बालकांच्या पोषणाची काळजी घेणाऱ्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची दिवाळी गोड व्हावी, हा या निर्णयामागील उद्देश असल्याचे मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले.

# सोयाबीन, तूर, उडदच्या हमीभावात भरीव वाढ

**मुंबई/ प्रतिनिधी-** केंद्र शासनाच्या हमीभाव खरेदी योजनेअंतर्गत खरीप हंगाम २०२६-२७ मध्ये सोयाबीन, मूग, उडीद व तूर खरेदीसाठी राज्यातील केंद्रांवर शेतकऱ्यांना आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात. तसेच खरेदी करण्यात आलेल्या शेतमालाच्या साठवणुकीचे काटेकोर नियोजन करण्याचे स्पष्ट निर्देश पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिले आहेत. खरीप हंगामातील हमीभाव खरेदीच्या पूर्वनियोजनाबाबत आयोजित उच्चस्तरीय बैठकीत ते बोलत होते.

**हमीभावात भरीव वाढ-** खरीप हंगाम २०२६-२७ साठी केंद्र शासनाकडून शेतमालाच्या हमीभावात वाढ करण्यात आली आहे. यामध्ये सोयाबीनच्या हमीभावात ३८० रुपयांची वाढ होऊन तो ५ हजार ३२८ रुपयांवरून ५ हजार ७०८ रुपये प्रति क्विंटल झाला आहे. तसेच उडदाचा हमीभाव ४०० रुपयांनी वाढून ८ हजार २०० रुपये आणि तुरीचा हमीभाव ४५० रुपयांनी वाढून ८ हजार ४५० रुपये प्रति क्विंटल झाला असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. खरेदी करण्यात येणाऱ्या कडधान्ये व तेलबियांच्या सुरक्षित साठवणुकीसाठी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या स्वमालकीच्या १६८ वखार केंद्रांबरोबरच गरजेनुसार भाडेतत्त्वावरील गोदामांचा वापर केला जाणार आहे. सद्यस्थितीत स्वमालकीच्या व भाडेतत्त्वावरील गोदामांमध्ये ८.१२ लाख मेट्रिक टन रिक्त साठवणूक जागा उपलब्ध आहे. आगामी खरीप हंगामासाठी खासगी गोदामांचे नियोजन करून आणखी ७.१६ लाख मेट्रिक टन आंतरिक क्षमता उपलब्ध होणार असून, याद्वारे एकूण १५.२८ लाख मेट्रिक टन साठवणूक जागा उपलब्ध होईल, असे नियोजन वखार महामंडळाद्वारे करण्यात आले आहे. सर्व खरेदी केंद्रांवर येणाऱ्या शेतकऱ्यांसाठी हँगिंग व बसण्याची व्यवस्था, पिण्याचे स्वच्छ पाणी आणि स्वच्छतागृह यांसारख्या मूलभूत सुविधा प्राधान्याने उपलब्ध कराव्यात. किंमत समर्थन योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार बारदाना, वाहतूक आणि गोदामांची योग्य व्यवस्था करावी. तसेच, पारदर्शकता राखण्यासाठी संबंधित राज्यस्तरीय नोडल संस्थांच्या सर्व खरेदी केंद्रांवर क्यूआर कोड टॅगिंगची व्यवस्था करण्याचे निर्देशही मंत्री रावल यांनी दिले आहेत. या हंगामात नाफेडमार्फत २२ जिल्ह्यांत, तर एनसीसीएफमार्फत सहा जिल्ह्यांत खरेदी प्रक्रिया राबविण्यात येणार असून राज्यात ९५० हून अधिक खरेदी केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. यात महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ (मुंबई), विदर्भ सहकारी पणन महासंघ (नागपूर) आणि महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ (पुणे) या राज्यस्तरीय नोडल संस्था सहभागी होणार आहेत. शासनाच्या निश्चित सूचीनुसार ही केंद्रे कार्यान्वित केली जातील.

# दीक्षाभूमीचा तिढा तातडीने सोडवा

### अन्यथा जनरोषाला सामोरे जावे लागेल; नितीन राऊत यांचा इशारा

**नागपूर/ प्रतिनिधी-** समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेचा संदेश देणाऱ्या ऐतिहासिक दीक्षाभूमीची स्मारक समितीतील वादांमुळे बदनामी होत असून, हे प्रकार तातडीने थांबवावेत. समितीच्या पदाधिकाऱ्यांनी आपापसांतील मतभेद बाजूला ठेवून सामंजस्याने प्रश्न सोडवावेत, अन्यथा आंबेडकरी जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशारा उत्तर नागपूरचे आमदार आणि माजी मंत्री डॉ. नितीन राऊत यांनी दिला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी लाखो अनुयायांसह दीक्षाभूमीवर बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. त्यामुळे दीक्षाभूमी हे केवळ ऐतिहासिक स्थळ नसून संपूर्ण आंबेडकरी समाजाचे श्रद्धास्थान, अस्मिता आणि सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीचे प्रतीक आहे. अशा पवित्र स्थळाशी संबंधित वाद सार्वजनिक चर्चेचा विषय होणे आणि त्यातून त्याच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचणे, ही अत्यंत वेदनादायी बाब असल्याचे राऊत यांनी म्हटले आहे.

स्मारक समितीच्या पूर्वीच्या पदाधिकाऱ्यांमध्येही मतभेद आणि वाद निर्माण झाले होते. मात्र, रा. सु. गवई आणि सदानंद फुलझेले यांच्या कार्यकाळात एकजूट, सामंजस्य आणि समन्वयाच्या माध्यमातून प्रश्न सोडविण्यात आले. दीक्षाभूमीचे पावित्र्य आणि प्रतिष्ठा जपण्याला प्राधान्य देण्यात आले. सध्याच्या पदाधिकाऱ्यांनीही पूर्वसुरींच्या कार्याचा



आदर्श घेऊन आत्मपरीक्षण करावे आणि परस्परांतील मतभेद चर्चेतून मिटवावेत, असे आवाहन राऊत यांनी केले.

दीक्षाभूमी ही कोणत्याही व्यक्तीची किंवा गटाची खासगी मालमत्ता नसून संपूर्ण आंबेडकरी समाजाच्या अस्मितेचे, स्वाभिमानाचे आणि ऐतिहासिक त्यागाचे प्रतीक आहे. त्यामुळे तिच्या पावित्र्याला धक्का पोहोचेल, असे वर्तन कोणाकडूनही होता कामा नये. दीक्षाभूमीचे पावित्र्य नष्ट करण्याचा अधिकार कोणालाही नाही, असेही त्यांनी ठणकावून सांगितले.

**महाविद्यालयाच्या प्रतिमेवरही परिणाम**

स्मारक समितीशी संबंधित वादांचा परिणाम डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या प्रतिमेवरही होत असल्याची चिंता राऊत यांनी व्यक्त केली. शिक्षण, प्रबोधन आणि सामाजिक परिवर्तनाच्या मूल्यांशी जोडलेल्या संस्थांची प्रतिष्ठा टिकवण्यासाठी पारदर्शकता आणि उत्तरदायित्व आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. धम्मचक्र प्रवर्तनदिन हा केवळ धार्मिक सोहळा नसून सामाजिक समता, मानवी हक्क आणि वैचारिक मुक्तीचा ऐतिहासिक दिवस आहे. त्यामुळे या महत्त्वाच्या काळात समितीतील वादांऐवजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा परिवर्तनवादी विचार आणि बुद्धांच्या धम्माचा संदेश केंद्रस्थानी राहायला हवा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. १४ ऑक्टोबर तसेच २० ऑक्टोबर रोजी होणाऱ्या कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर समितीने एकजुटीने काम करून समाजासमोर आदर्श निर्माण करावा, असेही राऊत यांनी स्पष्ट केले.

# हिंमत असेल तर अधिकृतपणे आणीबाणी जाहीर करा

**मुंबई/ प्रतिनिधी-** देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी दिल्लीत आंदोलन करण्यात आले. कॉक्रोच जनता पार्टीच्या नेत्यांनी गनिमी कावा करत जंतरमंतरवर जाऊन तिरंगा उंचावून ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात



घोषणाबाजी सुरू केली. या आंदोलनासाठी रोज हजारो लोक रस्त्यावर उतरत आहेत. यादरम्यान जनतेच्या लढ्याविरोधात सरकार सातत्याने टीका करत आहे. या टीकेला सीजेपी नेते अभिजित दीपके अत्यंत आक्रमक शब्दांत प्रत्युत्तर दिले आहे. हिंमत असेल तर अधिकृत आणीबाणी जाहीर करा, असे म्हणत सरकारवर हल्लाबोल केला.अभिजीत दीपके यांनी नागपूरमधून माध्यमांशी संवाद साधला असून सरकारच्या भूमिकेवर निशाणा साधला. दीपके म्हणाले की जर तुम्हाला आणीबाणी लादायचीच असेल, तर ती अधिकृतपणे जाहीर करा, असा भ्याडपणा का करत आहात? तुम्ही केवळ आरोप का करत आहात? तुमच्याकडे सर्व संसाधने आहेत, सर्व तपास यंत्रणा आहेत; मग पुरावे सादर करा, तपास करा आणि काय ती कारवाई करा अशा शब्दात दीपके यांनी सरकारला सुनावले.दरम्यान, सीजेपीच्या या आंदोलनाला परदेशातून फंडिंग होत असल्याचा आरोप ज्येष्ठ वकील हरीश साळवे यांनी केला. त्यांनी केलेल्या आरोपांचा समाचार घेताना अभिजित दीपक म्हणाले, मी हरीश साळवे यांना विनंती करेन की, त्यांच्याकडे जर काही पुरावे असतील तर कृपया ते पुरावे थेट अमित शहा यांच्याकडे सुपूर्द करावेत. कारण, आम्हाला परदेशी निधी मिळत असल्याचे अमित शाह यांना अद्याप सिद्ध करता आलेले नाही. जर हरीश यांच्याकडे पुरावे असतील, तर त्यांनी ते अमित शहांना द्यावेत, कारण ते पुरावे शोधण्यासाठी सध्या संघर्ष करत आहेत असे दीपके यावेळी म्हणाले. या आंदोलनाची पुढील दिशा काय असेल यावरही दीपके यांनी भाष्य केलं. ते म्हणाले की, मी दिल्लीत पोहोचताच आमची लवकरच एक बैठक पार पडेल. त्यानंतरच आम्ही आमची पुढील रणनीती ठरवू, असे अभिजीत दीपके यांनी स्पष्ट केले आहे.

# पाण्यात बुडून ४ मुलांचा मृत्यू

### २ दिवसापासून एकाच्या मृतदेहासाठी शोधमोहीम सुरू

**रत्नागिरी :** जिल्ह्यातील राजापूरतालुक्यात अत्यंत हृदयद्रावक घटना घडली असून ४ मुलांचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची माहिती आहे. राजापूरच्या नाणार गावातील इंगळवाडी येथे खाडीत आईसोबत कालवे काढण्यासाठी गेलेल्या चार मुलांचा बुडून मृत्यू झाला. त्यापैकी एक मृतदेह अद्यापही सापडला नाही. या मृतदेहाचा शोध घेण्यासाठी पोलीस दलातर्फे तटरक्षक दलाच्या मदतीने आज दिवसभर शोध मोहीम राबवले गेले. मात्र, या मन हेलावणाऱ्या घटनेनं अख्ख्या गावावर शोककळा पसरली आहे. नाणार येथील इंगळवाडी परिसरात राहणारे जुनेद भाटकर यांच्या पत्नी हिना भाटकर आपल्या मुलांसह दुपारी साडेतीनच्या सुमारास खाडीमध्ये मुळे आणि कालवे काढण्यासाठी गेल्या होत्या. आई-वडील खाडीपात्रात कालवे काढत असताना मुले पाण्याजवळ होती. दरम्यान, सायंकाळी साडेचारच्या सुमारास खाडीपात्रातील खोल खड्ड्याचा अंदाज न आल्याने पाचही मुले एकापाठोपाठ पाण्यात बुडू लागली. या दुर्घटनेत बुडालेली सर्व मुले ४ ते १५ वयाची असल्याची माहिती आहे. सुदैवाने दुर्घटनेत एका मुलीला वाचविण्यात यश आलं. मात्र, या घटनेनं कुटुंबीयांसह संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे. दरम्यान, बुडालेल्या ४ जणांपैकी एका मुलाचा मृतदेह अद्याप सापडला नसून प्रशासनाकडून शोधमोहीम सुरू आहे. त्याच पार्श्वभूमीवर येथील खाडीत स्कुबा डायव्हर्स, काया किंग बोटी, तटरक्षक दलाचे हेलिकॉप्टर आणि तज्ज्ञ यांच्या मदतीने ही शोधमोहीम दिवसभर राबवली गेली. पण, मृतदेह काही हाती लागला नाही. रत्नागिरी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नितीन बगाटे हे स्वतः या शोध मोहिमेमध्ये सहभागी झाले होते.

# ११.४० लाख रेल्वे कर्मचाऱ्यांना ७८ दिवसांचा दिवाळी बोनस

**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था-** केंद्र सरकारने दिवाळीपूर्वी रेल्वेतील सुमारे ११.४० लाख पात्र कर्मचाऱ्यांना ७८ दिवसांचा बोनस देण्यास मंजुरी दिली आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या मते, यासाठी २,००९ कोटी खर्च केले जातील. कॅबिनेटने दिव्यांग पेन्शनच्या नियमांमध्येही बदल केला आहे. आता पेन्शनसाठी ८०% ऐवजी ४०% दिव्यांगत्व आवश्यक असेल आणि पात्रता जन्मापासून



लागू होईल. पंतप्रधान मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कॅबिनेट बैठकीत एकूण ३ निर्णय घेण्यात आले. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, रेल्वेतील सुमारे ११ लाख ४० हजार पात्र कर्मचाऱ्यांना ७८ दिवसांचा प्रोडक्टिव्हिटी लिंक्ड बोनस दिला जाईल. यासाठी सुमारे २,००९ कोटी खर्च केले जातील. वैष्णव म्हणाले की रेल्वे कर्मचारी दिवस-रात्र काम करतात. लोक आपल्या कुटुंबासोबत सण साजरे करतात, तेव्हादेखील कर्मचारी रेल्वे ट्रॅक, इंजिन आणि वर्कशॉपमध्ये ड्युटी बजावत असतात. त्यांच्या मेहनतीचा विचार करून बोनस देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दिव्यांग पेन्शन योजनेअंतर्गत आता ० ते ७९ वर्षे वयोगटातील लाभार्थ्यांना ३७५ आणि ८० वर्षे किंवा त्याहून अधिक वय असलेल्यांना ६२५ ची मदत मिळेल. योजनेचा लाभ घेण्यासाठी दिव्यांगत्वाची किमान मर्यादा ८०% वरून ४०% करण्यात आली आहे. तसेच, पेन्शनसाठीची किमान वयोमर्यादेची अट जन्मापासून लागू असेल. नवीन नियम, पात्रता आणि लाभार्थ्यांची संख्या यासंबंधी मार्गदर्शक सूचना तीन महिन्यांच्या आत जारी केल्या जातील. कॅबिनेटने राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रम २०२६-२७ ते २०३०-३१ या कालावधीसाठी सुरू ठेवण्यास मंजुरी दिली आहे. यासाठी ५३,४२८ कोटींचे बजेट निश्चित करण्यात आले आहे. सरकारच्या म्हणण्यानुसार, देशातील सर्व ३६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांतील सुमारे ३.२० कोटी लाभार्थ्यांना याचा फायदा मिळेल. या योजनेचे नाव बदलून प्रधानमंत्री सामाजिक सहाय्य योजना असे करण्यात येईल. याअंतर्गत वृद्धापकाळ पेन्शन योजनेचे नाव प्रधानमंत्री वृद्धापकाळ पेन्शन योजना आणि विधवा पेन्शन योजनेचे नाव प्रधानमंत्री विधवा पेन्शन योजना असे करण्यात येईल. दिव्यांग पेन्शन योजनेला प्रधानमंत्री दिव्यांगजन पेन्शन योजना आणि राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेला प्रधानमंत्री कुटुंब लाभ योजना असे नाव देण्यात येईल. वृद्ध आणि विधवा पेन्शन योजना तसेच कुटुंब लाभ योजना पूर्वीप्रमाणेच सुरू राहतील.

# वेस्ट इंडिजने भारताला २४ धावांनी हरवले

### ◆ चौथ्या टी-२०त होपचे शतक ◆

**हैदराबाद/ वृत्तसंस्था-** चौथ्या टी-२० सामन्यात वेस्ट इंडिजने भारताचा २४ धावांनी पराभव केला. या विजयामुळे पाच सामन्यांची मालिका आता २-२ अशी बरोबरीत आली आहे. मालिकेतील अंतिम सामना १७



तारखेला बंगळुरू येथे खेळवला जाईल. नाणेफेक गमावल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना, वेस्ट इंडिजने २० षटकांत ३ गडी बाद २४७ धावा केल्या. कर्णधार शाई होप याने ५० चेंडूंत नाबाद १०२ धावांची खेळी केली; यात त्याने ४ चौकार आणि ९ षटकार लगावले. मालिकेतील हे होपचे दुसरे शतक होते; यापूर्वी त्याने रांची येथे खेळल्या गेलेल्या दुसऱ्या सामन्यातही शतक झळकावले होते. त्याच्याव्यतिरिक्त, शेरफेन रदरफोर्डने नाबाद ४९ धावा केल्या. भारताकडून प्रिन्स यादव, अक्षर पटेल आणि अर्शदीप सिंग यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. प्रत्युत्तरात, भारताचा संघ २० षटकांत २२३ धावांत सर्वबाद झाला. संजू सॅमसनने २३ चेंडूंत ५६ धावा केल्या, ज्यामध्ये त्याने ६ चौकार आणि ४ षटकार मारले. वेस्ट इंडीजच्या २४७ धावांच्या आव्हानाला प्रत्युत्तर देताना भारतीय संघ २२३ धावांत सर्वबाद झाला. कीमो पॉलने ५ बळी घेतले; पुरुषांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील त्याची ही दुसरी 'फाईव्ह-विकेट हॉल' (एका डावात ५ बळी घेण्याची कामगिरी) ठरली असून, अशी कामगिरी करणारा तो वेस्ट इंडीजचा पहिलाच गोलंदाज बनला आहे. कीमो पॉलने १९ व्या षटकात नितीश कुमार रेड्डी, प्रिन्स यादव आणि अक्षर पटेल यांना बाद केले. पॉलने आपल्या ४ षटकांत ४१ धावा देत ५ बळी घेतले.

# पदवीधर मतदारांची संख्या वाढण्याऐवजी घटली

**नागपूर/ प्रतिनिधी-** विधान परिषदेच्या नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी राबवण्यात आलेली मतदार नोंदणीची प्रक्रिया वादग्रस्त ठरण्याची शक्यता आहे. प्रशासनाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार सहा दिवसात मतदारांची संख्या वाढण्याऐवजी कमी झाली. त्यामुळे आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.भारत निवडणूक आयोगाकडून मतदार याद्यांच्या शुद्धीकरणासाठी राबवण्यात येत असलेली विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) प्रक्रिया वादग्रस्त ठरली आहे. सत्ताधाऱ्यांच्या फायद्यासाठी ही प्रक्रिया असल्याचा आरोप होत असून या प्रक्रियेची अंमलबजावणी करणारे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात आंदोलन करण्यात येत आहे. याच दरम्यान विधान परिषदेच्या पाच जागांसाठी निवडणूक होत आहे. त्यात नागपुरात पदवीधर मतदारसंघाचा समावेश आहे.या निवडणुकीकरिता मतदार नोंदणीची प्रक्रिया राबवण्यात आली. नोंदणीसाठी अर्ज स्वीकारण्याकरिता २६ सप्टेंबर ही शेवटची तारीख होती. तर आलेल्या अर्जावर अंतिम निर्णय घेण्यासाठी ६ ऑक्टोबरही ही शेवटती तारीख होती. याच दिवशी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईल, अशी अपेक्षा होती. परंतु १२ ऑक्टोबरला अंतिम मतदार यादी सार्वजनिक करण्यात आली. विशेष म्हणजे, यादीनुसार ६ ऑक्टोबरपर्यंतची मतदार संख्या २ लाख ५५ हजार ८२३ होती. तर १२ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध यादीनुसार मतदारांची संख्या २ लाख ५५ हजार ६०३ आहे. म्हणजे सहा दिवसात मतदारांची संख्या २२० ने कमी झाली. सर्वाधिक १५८ मतदार नागपूर जिल्ह्यातून कमी झाले. तर गोंदियातून ११, भंडाऱ्यातून २८ तर गडचिरोली जिल्ह्यातून २३ मतदार कमी झाले. मतदार संख्या वाढण्याऐवजी घटल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे. तर आधी स्वीकारले अर्ज नंतर नामंजूर कसे करण्यात आले, असाही प्रश्न उपस्थित होत आहे.

# संपादकीय

**प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे**

## विरोधकांचा कस

**म**तदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणावरून (एसआयआर) निवडणूक आयोग आणि विरोधकांमध्ये निर्माण झालेला संघर्ष अधिक तीव्र झाला आहे. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्यासह 'इंडिया' आघाडीतील नेत्यांनी राजधानी दिल्लीत आंदोलन करत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. आयोगाच्या निर्णय प्रक्रियेतील अनियमितता, मतदारांची नावे वगळण्याची कार्यपद्धती आणि स्वतंत्र लेखापरीक्षणाची आवश्यकता यांसारखे मुद्दे त्यांनी उपस्थित केले. त्याआधीपासूनच हा मुद्दा न्यायप्रविष्ट आहे. याच कारणास्तव सरन्यायाधीशांनी राहुल आणि खर्गे यांच्या शिष्टमंडळाला भेट नाकारली. अशाप्रकारची चर्चा करणे ही न्यायिक नैतिकता आणि औचित्यानुसार नसल्याचे स्पष्ट करतानाच याचिका दाखल करण्याचा सूचक सल्ला सूर्यकांत यांनी दिला होता. ही याचिका न्यायालयाच्या पटलावर तत्काळ आलीही असती; पण त्यात १४ त्रुटी असल्याचे समोर आले. काँग्रेसकडे निष्णात विधिज्ञ असताना इतक्या महत्त्वाच्या याचिकेत क्षुल्लक त्रुटी राहणे, ही बाब गंभीर आहे.दुसरीकडे केरळ काँग्रेसने सरन्यायाधीशांच्या राजीनाम्याची मागणी करणारी पोस्ट समाजमाध्यमांवर टाकली होती. सदर पोस्ट तत्काळ डिलिट केली असली, तरी यातून घटनात्मक संस्थांवर अविश्वास दाखवण्याची भूमिका समोर आली. कपिल सिब्बल यांनीही सर्वोच्च न्यायालयाकडून फारशा अपेक्षा राहिलेल्या नाहीत, कोर्टात जाण्याला काही अर्थ उरलेला नाही, असे विधान केले होते. निवडणूक आयोग, सर्वोच्च न्यायालय या स्वायत्त संस्थांच्या कार्यपद्धतीत उणिवा असू शकतात; पण अशी विधाने करून त्यांचे जनमानसातील आणि लोकशाहीतील स्थान डळमळीत करणे समर्थनीय नाही. निवडणूक प्रक्रियेत अनियमितता, मतदार याद्यांमध्ये त्रुटी आणि एसआयआर प्रक्रियेवरून ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात दाखल केलेल्या सर्व याचिका एकत्र करून यावर २७ ऑक्टोबरला सुनावणी घेण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला. न्यायालयीन प्रक्रियेचा आदर करत संयम राखणे ही विरोधी पक्षांची जबाबदारी आहे. विरोधकांच्या आरोपांची आता कायदेशीर कसोटी लागणार आहे. सरकारच्या दृष्टीनेही घटनात्मक संस्थांच्या कामावर निर्माण झालेल्या शंकांना वस्तुनिष्ठ उत्तरे मिळणे आवश्यक आहे.लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० आणि राज्यघटनेच्या कलम ३२४ अंतर्गत आयोगाला निवडणूक प्रक्रियेचे व्यवस्थापन करण्याची जबाबदारी दिली आहे. त्यानुसार देशातील मतदार याद्या अद्ययावत ठेवण्याचे काम सातत्याने चालते. मृत मतदारांची नावे, स्थलांतरामुळे निर्माण झालेल्या दुबार नोंदी आणि इतर अपात्र नोंदी यांची पडताळणी आयोगाकडून केली जाते.

दुबार नोंदी कायम राहणे आणि पात्र मतदारांची नावे चुकीने वगळली जाणे, या दोन्ही त्रुटी निवडणूक प्रक्रियेच्या विश्वासार्हतेला बाधा आणतात. त्यामुळे पुनरीक्षणाची आवश्यकता मान्य करतानाच त्यातील प्रक्रियात्मक दोष दूर केले गेलेच पाहिजेत. एसआयआर प्रक्रियेत घरोघरी पडताळणी, मसुदा मतदार यादीचे प्रकाशन, दावे व हरकती नोंदविण्याची संधी आणि अपिल करण्याची व्यवस्था आहे. सर्वोच्च न्यायालयानेही २७ मे रोजी पुनरीक्षणाचा वैधानिक अधिकार मान्य केला आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या काही निर्णयांबाबत निवडणूक आयुक्त सुखबीरसिंग संधू आणि विवेक जोशी यांनी दहा महिन्यांत १४ वेळा आक्षेप नोंदविल्याचे समोर आले. न्यायालयाने संबंधित याचिकांवर आयोग आणि केंद्र सरकारकडून उत्तर मागविले आहे. त्यावेळी मुख्य निवडणूक आयुक्तांना तात्पुरते पदावरून दूर करण्याची मागणी न्यायालयाने फेटाळली. निर्णय घेताना सदस्यांचे आक्षेप नोंदविले गेले पाहिजेत आणि त्यावर नियमानुसार विचार झाला पाहिजे; मात्र मतभेदांची नोंद झाली म्हणून प्रत्येक निर्णय बेकायदेशीर ठरतो, असा निष्कर्ष काढता येत नाही.आयोगाने अलीकडेच सर्व बैठकींचे विषयपत्रक आधी वितरित करण्याचा आणि बैठकीचे इतिवृत्त तयार करण्याचा निर्णय जाहीर केला. आयटी प्रणालीच्या परीक्षणासाठी स्वतंत्र तज्ज्ञांचा समावेश असलेली समिती नेमण्याचीही तरतूद केली. संस्थात्मक कार्यपद्धतीतील अशा सुधारणा प्रत्यक्षात उतरल्यास निर्णय प्रक्रियेतील संदिग्धता कमी होऊ शकते; परंतु मतदार यादी पुनरीक्षणात पात्र नागरिकांची नावे वगळली जाण्याची शक्यता गांभीर्याने हाताळायला हवी. आयोगाने पुनरीक्षण झालेल्या राज्यांत वगळलेल्या पात्र मतदारांसाठी विशेष नोंदणी मोहीम राबविण्याचे निर्देश दिलेत. ही कार्यवाही योग्य दिशेने असली, तरी तिचे मूल्यमापन प्रत्यक्ष परिणामांवर करावे लागेल.

किती अर्ज प्राप्त झाले, किती नावे पुन्हा समाविष्ट झाली, किती प्रकरणांत अपील दाखल झाले, याची माहिती सार्वजनिक व्हायला हवी. स्थलांतरित कामगार, बेघर नागरिक, वृद्ध आणि दस्तावेजांची उपलब्धता मर्यादित असलेल्या व्यक्तींना पुनरीक्षणात अडचणी येऊ शकतात. अशांसाठी विशेष मदत केंद्रे, घरोघरी संपर्क आणि सुलभ सुनावणीची व्यवस्था असणे महत्त्वाचे आहे. मतदारांची नावे वगळण्याच्या प्रत्येक घटनेमागे राजकीय हेतू असल्याचा आरोप करण्यासाठी ठोस पुरावे लागतील. त्या आधारेच विरोधी पक्षांना न्यायालयातील कायदेशीर लढाई जिंकता येईल. त्यामुळे आता आरोपांची तीव्रता वाढविण्यापेक्षा निर्णय प्रक्रियेतील त्रुटी न्यायालयासमोर सादर करण्याबाबत विरोधकांनी सक्रियता दाखवावी. विरोधी पक्षांच्या याचिकेत १० मागण्या असून त्यात मततदार यादीतून वगळलेल्या सर्व मतदारांची यादी मतदान केंद्रनिहाय (बूथनिहाय) सार्वजनिक करण्याचे आदेश आयोगाला देण्याची विनंती केली आहे. यात नाव वगळण्याचे नेमके कारण, लिंग आणि वयानुसार वर्गीकरण, तसेच पात्र मतदारांची नावे पुन्हा समाविष्ट करण्यासाठी एक कार्यक्षम यंत्रणा उपलब्ध करून देण्याचा समावेश आहे. यादीतून नाव वगळले गेल्यास नागरिकत्वावर किंवा योजनांच्या लाभावर परिणाम होईल. गरीब आणि वंचित घटकांसाठी ही अस्वस्थता अधिक महत्त्वाची ठरते. सरकारी योजनांतून मिळणारे लाभ त्यांच्या दैनंदिन जगण्याशी संबंधित असतात. त्यामुळे दुबार आणि अपात्र नोंदी काढून टाकण्याच्या उद्दिष्टासाठी स्वीकारलेल्या पद्धतीमुळे एकाही पात्र नागरिकाला मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहावे लागू नये. स्वतंत्र लेखापरीक्षण आणि आयोगाच्या संबंधित नोंदी उपलब्ध करून देण्याच्या मागण्यांवर न्यायालय काय निर्णय देते, हे महत्त्वाचे ठरेल. न्यायालयाच्या निवाड्यातून संस्थात्मक सुधारणा घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. न्यायालयीन प्रक्रियेतून आणि घटनात्मक संस्थांच्या जबाबदार कार्यपद्धतीतून राजकीय संघर्षाचे निराकरण झाल्यास ते अधिक उचित ठरेल. त्याआधी उगाचच आरोपांची राळ उडवून राजकीय आणि सामाजिक वातावरण कलूषित करणे टाळणे ईष्ट ठरेल.

# डिजिटलच्या आडून कंपन्यांचे नियंत्रण!

**म**हाराष्ट्रात कृषी अनुदानासाठी फार्मर आयडी सक्तीचा आहे. डिसेंबर २०२५ मध्ये सरकारने विधान परिषदेत सांगितले की राज्यात १.७१ कोटी शेतकरी आहेत, पण फार्मर आयडी फक्त १.२७ कोटींचेच तयार झाले होते. म्हणजे सुमारे ४४ लाख शेतकरी नोंदीबाहेर. तांत्रिक अडचणींमुळे आयडी महिनाभर तयार होत नाही, अशी तक्रार आमदारांनीच सभागृहात केली. त्याच वेळी अवजारे, ठिबक-तुषार, फळबाग आणि शेततळ्यांचे सुमारे ४७ लाख अनुदान अर्ज प्रलंबित होते.सरकार म्हणते, माहिती शेतकऱ्याच्या संमतीनेच घेतली जाते आणि डेटा संरक्षण कायद्यानुसार वापरली जाते. पण अनुदान, कर्जमाफी आणि हप्ता आयडीशी बांधलेला असताना 'नाही' म्हणण्याचा पर्याय शेतकऱ्यापुढे उरतोच कुठे? पोटाला चिमटा घेऊन दिलेली संमती ही खरी संमती नसते. आणि हा आयडी जमिनीच्या मालकीशी बांधलेला आहे. त्यामुळे कुळाने, खंडाने, वाट्याने किंवा अर्धलीने शेती करणारे, सातबाऱ्यावर पतीचे किंवा सासऱ्याचे नाव असलेली जमीन राबणाऱ्या महिला, गायरान कसणारी दलित आणि भूमिहीन कुटुंबे, वनहक्काचे दावे प्रलंबित असलेले आदिवासी, हे सारे या व्यवस्थेला दिसतच नाहीत.नोंदवहीत कुळांसाठी 'तरतूद' आहे, असे मंत्रालय सांगते. पण ज्याचे नाव सातबाऱ्यावरच नाही, त्याच्यासाठी ती तरतूद म्हणजे भिंतीवर रंगवलेला दरवाजा आहे. महाराष्ट्र सरकारने २ जून २०२६ रोजी ३६,५८५ कोटी रुपयांची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना मंजूर केली. फार्मर आयडी आणि आधार ई-केवायसी ही तिची अट आहे. पहिल्या यादीत १६.९६ लाख कर्जखाती आली. पण ७ ऑगस्टला पैसे जमा झाले ते फक्त आधार प्रमाणीकरण पूर्ण झालेल्या ६ लाख २२ हजार शेतकऱ्यांच्या खात्यांत, एकूण ५,०२९ कोटी रुपये. यादीतील उरलेल्यांना प्रमाणीकरणाच्या रांगेत थांबावे लागले. त्यातच, निकषांमुळे लाखो शेतकरी वंचित राहतील, म्हणून वर्ध्यातील शेतकऱ्यांनी शासन निर्णयाची होळी केली.




**दिल्लीच्या सीमांवर वर्षभराहून अधिक काळ लढून, सातशेहून अधिक साथींचे प्राण गमावून, शेतकऱ्यांनी तीन काळे कृषी कायदे रद्द करायला लावले. आज तेच कायदे दुसऱ्या वाटेने परत येत आहेत.कसे ते पाहूया...**

**डेटा जमीनदारी**

ॲग्रिस्टॅक उभा राहिला तो मायक्रोसॉफ्ट, ॲमेझॉन वेब सर्व्हिसेस, पतंजली, स्टार ऑग्रीबाजार, ईएसआरआय, सिस्को, जिओ प्लॅटफॉर्म्स, आयटीसी आणि एनसीडीईएक्स ई-मार्केट्स यांच्याशी केलेल्या सामंजस्य करारांतून. मायक्रोसॉफ्टसोबतचा करार तर सरकारने योजना लोकांच्या अभिप्रायासाठी खुली करण्याआधीच झाला. जुना जमीनदार पिकाचा वाटा घेत असे, पण बियाणे शेतकऱ्याकडेच ठेवत असे. नवा जमीनदार शेताचा नकाशा, कर्जाचा इतिहास आणि मातीची कुंडली घेऊन जातो.हीच डेटा जमीनदारी. अमेरिकेत जॉन डिअर या ट्रॅक्टर कंपनीने स्वतःला डेटा कंपनी बनवले आणि

**उत्तरार्ध**

शेतकऱ्यांना स्वतःचा ट्रॅक्टर दुरुस्त करण्याचाही हक्क नाकारला. त्यातून तिथे 'दुरुस्तीचा हक्क' मागणारी मोठी चळवळ उभी राहिली. जानेवारी २०२५ मध्ये अमेरिकेच्या संघीय व्यापार आयोगानेच (एफटीसी) याबद्दल जॉन डिअरवर खटला दाखल केला. आपल्याकडे तसेच नियंत्रण शेतकऱ्यांवर, सरकारच्या पूर्ण ताकदीने उभारले जात आहे.

**उघडलेले दरवाजे**

६ फेब्रुवारी २०२६ रोजी भारत-अमेरिका अंतरिम व्यापार कराराची चौकट जाहीर झाली. भारताने अमेरिकेच्या सर्व औद्योगिक वस्तूंवर आणि अनेक कृषी उत्पादनांवर आयात शुल्क काढण्याचे किंवा कमी करण्याचे मान्य केले. यादीत सोयाबीन तेल, डीडीजीएस (मक्यापासून इथेनॉल बनवल्यावर उरणारे पशुखाद्य), जनावरांसाठी लाल ज्वारी, सुकामेवा आणि फळे आहेत. सोबत पाच वर्षांत ५०० अब्ज डॉलरची अमेरिकन खरेदी करण्याचे वचन आहे. आणि हा विषय जुना झालेला नाही. २९ सप्टेंबरला परराष्ट्रमंत्र्यांनी सांगितले की पूर्ण करारावर आता जवळपास सहमती झाली आहे.विशेष म्हणजे, ज्या अमेरिकन आयात शुल्कांच्या दबावाखाली ही चौकट ठरली, ती शुल्केच अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने २० फेब्रुवारी २०२६ रोजी बेकायदा ठरवली. पण अमेरिकेने लगेच दुसऱ्या कायद्याखाली १५ टक्के शुल्क लावले, आणि कलम ३०१ खालील नवी प्रक्रियाही चालू आहे, असे परराष्ट्रमंत्र्यांनीच सांगितले आहे. म्हणजे शस्त्राचे नाव बदलले, दबाव तसाच आहे. आणि आपल्या शेतीवरच्या सवलती मात्र टेबलावर कायम आहेत. करारावर सही होण्याआधी आवाज उठवण्याची हीच वेळ आहे.

सरकार म्हणते, सोयाबीन आणि मका वगळले आहेत, आणि सोयाबीन तेल व डीडीजीएस ठरावीक कोट्यापुरतेच येतील. पण पीक वगळायचे आणि पिकापासून बनलेला माल आत घ्यायचा, याला संरक्षण कसे म्हणायचे? भारताने २०२४-२५ मध्ये आधीच विक्रमी ५४.७ लाख टन सोयाबीन तेल आयात केले. त्यात अमेरिकेचा वाटा आज फक्त दीड ते दोन लाख टन आहे. शुल्क सवलतीचा उद्देशच हा वाटा वाढवणे आहे. तेल गिरण्यांना परदेशी तेल स्वस्त मिळत राहिले, तर लातूर, धाराशिव, नांदेड, वाशीम, अमरावतीच्या सोयाबीनला भाव कोण देणार? या करारामुळे मका, ज्वारी आणि सोयाबीनचे भाव आणखी दबतील, असा इशारा शेतकरी संघटनांनी दिलाच आहे. कोटा म्हणजे भिंत नव्हे. ते उघडे दार आहे, आणि अशी दारे फक्त रुंदच होत जातात.

ही स्पर्धा नाही, हे डंपिंग आहे. भारत जीएम मक्याच्या आयातीला परवानगी देत नाही, पण अमेरिकेतला बहुतांश मका जीएम असतो. जीएम डीडीजीएसला परवानगी मिळणार की नाही, याबाबत स्पष्टता नाही, असे सोयाबीन प्रक्रिया उद्योगाच्या संघटनेनेच म्हटले आहे. पुढच्या दाराने बंदी आणि मागच्या दाराने प्रवेश, असा हा धोका आहे. याच संयुक्त निवेदनात भारताने अमेरिकेसोबत डिजिटल व्यापाराचे नियम ठरवण्याची वचनबद्धता दिली आहे. पुढील वाटाघाटींच्या यादीत बौद्धिक संपदा, सेवा आणि गुंतवणूक हे विषयही आहेत, असे अमेरिकेच्या दूतावासानेच जाहीर केले आहे. अमेरिकेच्या अशा करारांमध्ये नेहमी तीन मागण्या असतात: शेतकऱ्यांची माहिती देशातच ठेवण्याचा आग्रह धरण्यावर बंदी, माहिती परदेशी संगणकांवर मुक्तपणे नेण्याची मुभा, आणि कर्ज-विमा ठरवणाऱ्या संगणक प्रोग्रामचा सोर्स कोड गुप्त ठेवण्याचा हक्क. त्यात परदेशी गुंतवणूकदारांना आपल्या सरकारवर खटले भरू देणारी कलमे आणि बौद्धिक संपदेच्या नावाखाली कंपन्यांचे बियाणे-हक्क मजबूत करणारी कलमे जोडली, तर आपल्या पीपीव्हीएफआर कायद्याने शेतकऱ्याला दिलेला बियाणे जपण्याचा आणि देवाणघेवाणीचा हक्क धोक्यात येतो. म्हणजे आपली माहिती आणि आपले बियाणे परक्यांच्या नावावर होतात.

दिल्लीच्या सीमांवर वर्षभराहून अधिक काळ लढून,शेतकऱ्यांनी तीन काळे कृषी कायदे रद्द करायला लावले. आज तेच कायदे दुसऱ्या वाटेने परत येत आहेत. खासगी व्यापार ई-कॉमर्समधून येतो, करार शेती 'ॲपवरची शेती' म्हणून येते, आणि कंपन्यांचे नियंत्रण व्यापार करारांतून येते. जे कायदा म्हणून मंजूर झाले नाही, ते आता सॉफ्टवेअर म्हणून उभारले जात आहे आणि करारांवर सह्या करून पक्के केले जात आहे.

**राजन क्षीरसागर**

# डान्स ऑफ डेमॉक्रसी

**गे**ली तीन चार महिने आपला देश लोकशाही व्यवस्थेचे एक अत्यंत देखणे नृत्य अनुभवत आहे. २० जून पासून सुमारे महिनाभर जंतर-मंतरवर चाललेले विद्यार्थी युवक-युवतींचे शांततापूर्ण व अहिंसक आंदोलन, त्या आंदोलनास केंद्र सरकारने २० जुलै रोजी दिलेला प्रतिसाद, जो पुढे पुढे सर्वोच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळे अधिक अहिंसक होत गेला,राहुल गांधींनी देशातील वेगवेगळ्या जागी घेतलेले 'छात्रों की गुंज'कार्यक्रम, केंद्रीय शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा, इंडियन एक्स्प्रेस व इतर प्रतिष्ठित वृत्त समूहांची शोधपत्रकारिता, त्यातून मुख्य निवडणूक आयुक्तांविरुद्ध वाढत गेलेला असंतोष, दहा, अकरा आणि बारा ऑक्टोबरला झालेली दिल्लीतील निदर्शने, अवघे २७ वर्षाचे वय असलेल्या नेहा बोरा ची प्रगट झालेली चिवट व लढाऊ छबी, सोशल मीडियातील जागरूक पत्रकारांनी आंदोलनात शिरून कॅमेरात टिपलेले व्हिडीओ या सगळ्या लागोपाठ घडत गेलेल्या घटनांमुळे देशातील जनमानस ढवळून निघाले आहे.

आमचे आंदोलन पूर्णपणे अहिंसक व शांततापूर्ण राहील, अशी ग्वाही सीजेपीचे अभिजित दिपके व इतर युवा नेते वारंवार देत होते. त्याप्रमाणे त्यांचे आंदोलन निःशस्त्र तर राहिलेच पण जेन-झी च्या आंदोलनातील काही मुलामुलींनी 'असभ्य' व शिवीगाळीची भाषा वापरली, ती अनेकांना रुचली नाही. भाजपचे नेते व ट्रोलस् सुद्धा याहून असभ्य भाषेत शिवीगाळ करतात, असे म्हणून अनेकांनी मुलामुलींच्या त्या भाषेचे समर्थनही केले. शासनाने सुद्धा आंदोलकांचा मोर्चा अडविण्यासाठी २० जुलैला जो बलप्रयोग केला त्यात अणकुचीदार खिळे टोकावर असलेल्या लाठ्या, अश्रुधूर व पेलेट गन्सचा वापर झाल्यामुळे केंद्र शासनावर चौफेर टीका होऊ लागली. काही गुंड प्रवृत्तीच्या व्यक्तीसुद्धा आंदोलकांना बेदम मारत असताना पोलीस बघत राहिले, असेही दृश्य दिसले. सर्वोच्च न्यायालयाने या घटनांची दखल घेतली. आंदोलनाची व्याप्ती अधिक वाढू नये म्हणून शिक्षण मंत्र्यांचा राजीनामा घेण्यात आला आणि परीक्षा पद्धती विरुद्ध चाललेले आंदोलन शमले.




मात्र त्यानंतर भारताच्या निवडणूक आयोगातील चुकीच्या घडामोडींबाबत इंडियन एक्सप्रेस मध्ये जी माहिती छापून आली, तिचे नेमके व मुद्देसुद खंडन आयोगाने अथवा भारत सरकारने केले नाही. उलट इतर पत्रकारांनी सुद्धा त्याबाबत अधिक शोध घेऊन आयोगात सगळे आलबेल नसल्याचा निर्वाळा दिला. सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाल्या. सीजेपी आणि विरोधी पक्षांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात मोहीम उघडली. दोन, दहा, अकरा व बारा ऑक्टोबर ला दिल्लीत जी प्रदर्शने झाली, त्यात केंद्र सरकारने आपल्या पाशवी बळाचे फक्त प्रदर्शन केले पण वापर संयमित केला. बारा ऑक्टोबर ला तर विरोधी पक्षांच्या महामोर्चाला बरीच सुट मिळाली. तो मोर्चा सर्वोच्च न्यायालयावर चालून जात होता. मात्र सरन्यायाधीशांनी भेट नाकारल्यानंतर आग्रह न धरता विरोधी पक्षांनी फक्त पिटीशन दाखल केली.

या दरम्यान गांधी, आंबेडकर आणि मार्क्स यांचे फ्युजन होत असल्याचे जाणवले. आमच्या तरुणपणी या तिघांच्या अनुयायांची तोंडे तीन दिशांना असायची. पण त्यांच्या विचारातले सत्व तेवढे घेऊन नवी पिढी हे फ्युजन घडवून आणत आहे, ही अत्यंत आशादायक प्रगती वाटते. संविधानाने भाजप सरकारचेही हात बांधले आहेत. साम, दाम, दंड, भेद या चाणक्यनीतीवर श्रद्धा असणाऱ्या भाजप नेत्यांना दंड मात्र जपून वापरावा लागतो. चीन चे अनुकरण विद्यार्थी आंदोलन दडपण्यासाठी भारतात करता येऊ शकत नाही, याची जाणीव भाजपच्या नेत्यांना निश्चितच असावी. राहुल गांधींनी पुण्यातील कार्यक्रमात पितृसत्ता मोडीत काढण्याचे केलेले आवाहन व त्यास तरुण स्त्रियांचा उत्स्फूर्त प्रतिसाद, यामुळे समाजरचनेसंबंधी मुलभूत वैचारिक मंथन होण्यास मदतच झाली.

असे हे लोकशाहीचे मनमोहक नृत्य बघायला मिळत आहे, त्यासाठी जेन-झी, विरोधी पक्ष, मुक्त पत्रकार, भारतीय संविधान आणि भारत सरकारचेही मनोमन आभार!

**-किशोर देशपांडे**

# कॉकरोच जनता पार्टीचा उदय

**कॉ**करोच जनता पार्टीचा उदय बेरोजगारांच्या उत्स्फूर्त प्रतिसादातून झाला.२०२६ मधील मे महिन्याच्या अखेर पर्यंत सुमारे २ कोटी ४२ लाख अनुयायांनी कॉकरोच जनता पार्टीला समर्थन दिले. भाजप सरकार या पक्षाला पायबंद घालेल की, तरुणाई सरकार विरोधात आक्रमक आंदोलन छेडेल हे येणारा काळ ठरवेल.१५ मे २०२६ला रोजी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सुर्यकांत यांनी एका सुनावणी दरम्यान तरुणाला उद्देशून कॉकरोच असा उल्लेख केला. त्यांना रोजगार मिळत नाही. हे सर्व झुरळासारखे आहेत. त्यापैकी काही मीडियामध्ये आहेत. काही आरटीआय व इतर प्रकारचे कार्यकर्ते बनतात. हे सर्व बेरोजगार तरुण प्रत्येक संस्था प्रमुंखावर हल्ले करतात. लगेच दुसऱ्या दिवशी कॉकरोच जनता पार्टी या नावाने डिजिटल उपक्रम सुरु झाला. सीजेपी चे ९६ % फॉलोअर्स भारतीय आहेत. मात्र २१ मे२०२६ रोजी केंद्र सरकारने इन्स्टाग्राम वरील सीजेपी चे अकौंट बंद करण्यात आले.

बेरोजागारांच्या पेपरफुटी विरूद्ध फुकारलेल्या आक्रमक आंदोलनात लाखो बेरोजगार युवक रस्त्यावर उतरले. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली. दिल्लीमधे कॉंग्रेसच्या एनएसयुआय या संघटनेच्या कार्यकर्त्यांनी मे२०२६ ला तीव्र आंदोलन केले. त्यांनी आंदोलन रेटले. कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अध्यक्ष अभिजित दीपके यांनी आपल्या पार्टीचा प्रायोजक नाही. आम्ही स्वतंत्र आहोत असे स्पष्ट केले. आपल्या वेबसाईटवर पक्षाचा जाहिरनामा प्रसिद्ध केला. पक्षाच्या पाच मागण्या घोषित केल्या.




पक्षाने पक्ष सत्तेवर आल्यास मतदारांना पाच आश्वासने दिली. १) कोणत्याही सेवानिवृत्त न्यायाधीशाला राज्यसभा सदस्यत्व दिले जाणार नाही. २) मतदाराचे वैध मत हटविल्यास मुख्य निवडणूक आयुक्तां विरुद्ध कारवाई केल्या जाईल.मतदाराचा हक्क हिरावून घेणे लोकशाही विरुद्ध मानल्या जाईल. ३)महिलांना ३३% नव्हे तर ५०% आरक्षण संसद पासून मंत्रीमंडळातही लागू राहील. लोकसभेतील खासदारांची संख्या वाढविली जाणार नाही.४) अंबानी व अडाणी समूहाच्या सर्व माध्यमाचे परवाने रद्द केल्या जातील. स्वतंत्र माध्यमांना माध्यमात प्रतिनिधित्व मिळेल.गोदी मिडीयाच्या संबंधित प्रतीनिधींच्या बँक खात्यांची चौकशी केल्या जाईल.५) आमदार व खासदाराने पक्ष बदल केल्यास ५० वर्षे निवडणूक लढण्यास अपात्र ठरविणार. तसेच पुढील २५ वर्षपर्यंत कोणतेही सार्वजनिक पद दिल्या जाणार नाही अशी आचारसंहिता पक्षाने घोषित केली.

कॉकरोज जनता पार्टीचे संथापक अभिजित दिपके यांनी प्रेस प्रसिद्धी पत्रकात जून२०२६ रोजी भारतात येऊन बेरोजगारांच्या अन्यायाविरुद्ध निकराचे आंदोलन करणार असे जाहीर केले. पेपरफुटी प्रकरणात केंद्र सरकार धर्मेंद्र प्रधान यांना पाठीशी घालत आहे. सनदशीर मार्गाने त्यांचा राजीनामा मागण्यासाठी आंदोलन करण्याचे युवकांना आवाहन केले. इंडिया महाआघाडी सर्व पक्षाने आंदोलनाचे समर्थन केले.आंदोलनात सक्रीय सहभागाचे घोषित केले.

गेल्या सहा महिन्यात सीजेपी पार्टीने सुशिक्षित बेरोजगारांना संघटित करून पेपरफुटी विरुद्ध आंदोलन केले. मतदार घोटाळाप्रकरणी मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या हुकुमशाही कारभाराविरुद्ध सप्टेंबर २०२६ पासून आंदोलन सुरु केले.अभिजित दिपके यांच्या सीजेपी या पक्षाच्या मेळाव्या समकक्ष राहुल गांधींनी स्वतंत्रपणे 'छात्रोकी गुंज' हा संपूर्ण देशातील प्रमुख राज्यात आयोजित केले.या सर्व मेळाव्यांना बेरोजगार विद्यार्थी व विद्यार्थिनींनी प्रतिसाद दिला. काही ठिकाणी लाखोच्या संख्येत सहभाग नोंदवला. यानंतर राहुल गांधींनी पवित्रा बदलला.इंडिया आघाडीतील २३ पक्षांना नेत्यासह कार्यकर्त्यांना सक्रीय केले.मोर्चे काढले.धरणे दिले. 'जंतर मंतर' वारी आंदोलना दरम्यान राहुल गांधी व नेत्यांना जबदस्तीने फरफरट नेऊन पोलीस व्हॅनमधे कोंबले. राहुल गांधी व प्रियंका गांधीच्या तीव्र प्रतीकारांच्या झटापटीत अनेक नेते अस्वस्थ झाले.मुख्य निवडणूक आयुक्त यांच्या विरोधात मोर्चे काढले. राष्ट्रपतींना निवेदन दिले. सर्वोच्च न्यायालयावर लाखोच्यासंख्येतील सर्वपक्षीय नेते, कार्यकर्ते, नागरिक यांच्या सहमोर्चा नेला.

**पुरुषोत्तम गुळवे**
मो.९४२२३२५०७४

गुरूवार, दि. १५ ऑक्टोबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# अन्नत्याग आंदोलनाची सांगता, नगरपरिषद प्रशासनाचे लेखी आश्वासन!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. १४ : कंत्राटी कामगारांच्या किमान वेतनाचा प्रश्न अखेर अन्नत्याग आंदोलनामुळे ऐरणीवर आला आहे. वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष तथा नगर परिषदेचे गटनेते डॉ. नीरज वाघमारे यांनी १२ ऑक्टोबरपासून सुरू केलेल्या बेमुदत अन्नत्याग आंदोलनानंतर नगर परिषद प्रशासनाने १४ ऑक्टोबर रोजी लेखी आश्वासन दिले. मात्र, आता आश्वासनाची अंमलबजावणी वेळेत होते का, याकडे कामगारांचे लक्ष लागले आहे.**

## १६ ऑक्टोबरपर्यंत वेतन जमा करण्याचे कंत्राटदारांना निर्देश



अग्निशमन विभागातील फायरमन, वाहनचालक, डाटा एन्ट्री ऑपरेटर आणि सुरक्षा रक्षकांचे सप्टेंबर २०२६चे थकीत वेतन जमा करण्यासाठी संबंधित कंत्राटदारांना नोटीस बजावण्यात आली आहे. शासननिर्धारित किमान वेतनानुसार १६ ऑक्टोबरपर्यंत कामगारांच्या बँक खात्यात वेतन जमा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कंत्राटदारांनी मुदतीत पैसे न दिल्यास १९ ऑक्टोबरला नगर परिषद प्रशासन थेट कामगारांच्या खात्यात वेतन जमा करणार असल्याचे लेखी पत्रात नमूद आहे. किमान वेतन न देणाऱ्या कंत्राटदारांची पुढील देयके रोखणे, करारातील अटींनुसार कारवाई करणे आणि काळ्या यादीत टाकण्याची प्रक्रिया राबविण्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे. दरम्यान, सफाई कामगार, घंटागाडी चालक आणि मदतनीस यांच्या सप्टेंबर महिन्याच्या वेतनाबाबत सरकारी कामगार अधिकाऱ्यांकडून मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. नवीन निविदा प्रक्रिया आचारसंहिता संपल्यानंतर सुरू करण्याचे नियोजन असून, सफाई कामगारांच्या किमान वेतना शी संबंधित काही प्रकरणे न्यायालयात आहेत. लेखी आश्वासनानंतर डॉ. वाघमारे यांनी प्रशासनाचे आभार मानले. मात्र, किमान वेतन हा कामगारांचा हक्क असून, केवळ आश्वासन नव्हे तर प्रत्यक्ष खात्यात वेतन जमा होणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे १६ आणि १९ ऑक्टोबरच्या मुदती प्रशासनाच्या कार्यवाहीची कसोटी ठरणार आहेत.

# जनमाध्यमच्या बातमीचा दणका,रस्त्यातील मुरूम हटविला!

### बातमी प्रसिद्ध होताच महसूल व बांधकाम विभागाची धावपळ, प्रवाशांना दिलासा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. १४ :** पुसद–हिंगोली राज्य मार्गावरील बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालयासमोर रस्त्याच्या मधोमध टाकण्यात आलेला दगडगोटे मिश्रित मुरूम अखेर हटविण्यात आला. दैनिक जनमाध्यममध्ये १४ ऑक्टोबर रोजी बातमी प्रसिद्ध होताच महसूल व बांधकाम विभागाने घटनास्थळी धाव घेत रस्ता वाहतुकीसाठी मोकळा केला.

त्यामुळे नागरिक व प्रवाशांना दिलासा मिळाला. १३ ऑक्टोबर रोजी पहाटे साडेपाचच्या सुमारास अज्ञात वाहनधारकाने पुसद–कारला मार्गावरील मुख्य रस्त्याच्या मधोमध गौणखनिजाचा मुरूम टाकून निघून गेल्याची माहिती परिसरातील नागरिकांनी दैनिक जनमाध्यमच्या तालुका प्रतिनिधींना दिली होती. रस्त्यावर मुरूम पडल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होण्यासह अपघाताचा धोका वाढला होता. या प्रकाराची दखल घेत दैनिक जनमाध्यमने 'पुसद–हिंगोली राज्य मार्गावर मुरूम टाकून अज्ञात वाहनधारकाचे पलायन; महसूल प्रशासन झोपेत!' या मथळ्याखाली वृत्त प्रसिद्ध केले. त्यानंतर त्याच दिवशी दुपारी दोनच्या सुमारास संबंधित विभागाने मुरूम हटवून रस्ता मोकळा केला. बातमी प्रसिद्ध झाल्यानंतरच प्रशासनाला जाग आली का? असा सवाल उपस्थित होत आहे. रस्त्यावर मुरूम टाकणाऱ्या अज्ञात वाहनधारकाचा शोध घेऊन कारवाई होणार का, हा प्रश्न मात्र कायम आहे. बातमीची दखल घेऊन तातडीने अडथळा दूर केल्याबद्दल परिसरातील नागरिकांनी दैनिक जनमाध्यमचे आभार मानले.

## थोडक्यात



### गुरुकुल कॉन्व्हेंटमध्ये विज्ञानाचा जागर, विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला नवी भरारी!

**नावीन्यपूर्ण प्रकल्पांतून वैज्ञानिक दृष्टिकोनाचे दर्शन, प्रयोगशीलतेला प्रोत्साहन**

**मुकुटबन :** विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनवृत्ती आणि सर्जनशीलतेला चालना देण्याच्या उद्देशाने मुकुटबन येथील गुरुकुल कॉन्व्हेंट स्कूलमध्ये आयोजित विज्ञान प्रदर्शन उत्साहात संपन्न झाले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नावीन्यपूर्ण प्रकल्पांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेत विज्ञानाच्या व्यावहारिक उपयोगाचे दर्शन घडविले.

या प्रदर्शनात पर्यावरण संवर्धन, आधुनिक तंत्रज्ञान, शहरी विकास, ऊर्जा व्यवस्थापन आणि दैनंदिन जीवनातील विज्ञान अशा विविध विषयांवरील प्रतिकृती व प्रकल्पांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने आपल्या प्रकल्पांची माहिती देत त्यामागील वैज्ञानिक संकल्पना स्पष्ट केल्या. पुस्तकी ज्ञानाच्या पलीकडे जाऊन प्रत्यक्ष प्रयोगांतून विज्ञान समजून घेण्याची संधी या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना मिळाली. निरीक्षणशक्ती, कल्पकता, समस्या सोडविण्याची क्षमता आणि सादरीकरण कौशल्य विकसित करण्यासाठी हे प्रदर्शन उपयुक्त ठरले. 'Explore, Innovate, Create' अर्थात 'शोधा, नवनिर्मिती करा आणि सर्जनशीलतेतून घडवा' हा संदेश देणाऱ्या या उपक्रमाने विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले. प्रयोगशील शिक्षणातूनच उद्याचे संशोधक घडू शकतात, हे या विज्ञान प्रदर्शनातून अधोरेखित झाले.

### अमरावती शिक्षक मतदारसंघ निवडणुकीची आचारसंहिता लागू..!

**जिल्हादंडाधिकारी विकास मीना यांचे आदेश जारी**



**यवतमाळ :** अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या व्दिवार्षिक निवडणुकीसाठी २२ सप्टेंबर रोजी मुख्य निवडणूक अधिकारी यांनी कार्यक्रम घोषित केलेला आहे. जिल्ह्यात निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या दि. २२ सप्टेंबरपासून आदर्श आचार संहिता अंमलात आलेली आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत जिल्ह्यात शस्त्र वापरावर निर्बंध घालणे अत्यावश्यक असल्याचे निवडणूक आयोगाचे निर्देश आहेत. त्या अनंषंगाने यवतमाळ जिल्ह्यातील अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाची व्दिवार्षिक निवडणूक - २०२६ निवडणुकीची संपुर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून तसेच यवतमाळ जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था अबाधित ठेवणे आवश्यक असून जिल्ह्यातील शस्त्र परवानाधारकांकडून शस्त्रांचा गैरवापर होवू शकतो म्हणून यवतमाळ जिल्ह्यातील सर्व शहरात गावात शस्त्र वाहून नेण्यास व वापरावर निर्बंध, प्रतिबंध असल्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी विकास मीना यांनी तसेच परवानाधारक शस्त्रांबाबत लागू असलेल्या निवडणूक विषयक निर्देशांनुसार आवश्यक कार्यवाही करून बेकायदेशीर शस्त्रांची वाहतूक अथवा वापर होणार नाही याची दक्षता घेण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

याशिवाय, जो कोणी या नियमाचे उल्लंघन करेल तो इसम तथा शस्त्र परवानाधारक दंडनीय कार्यवाहीस पात्र ठरणार आहे.

### पाणीटंचाईचे सावट,आता रोज १५ मिनिटांची कपात!

**१६ ऑक्टोबरपासून पाणीपुरवठ्याचे नवे वेळापत्रक, अपव्यय करणाऱ्यांवर कारवाईचा इशारा**

**पांढरकवडा :** पांढरकवडा शहरात पाणीटंचाईचे सावट गडद होत असून, उपलब्ध जलसाठ्याचे नियोजन करण्यासाठी नगर परिषद प्रशासनाने पाणीपुरवठ्यात कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या १६ ऑक्टोबरपासून शहरातील पाणीपुरवठ्याच्या वेळेत दररोज १५ मिनिटांची कपात केली जाणार आहे. पाण्याची उपलब्धता मर्यादित झाल्याने नागरिकांनी आता पाणी वापरताना अधिक काळजी घेण्याची गरज निर्माण झाली आहे. यंदा अल निनोच्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने धरणे आणि जलसाठ्यांतील पाण्याची पातळी घटल्याचे नगर परिषद प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे पाणीटंचाईची तीव्रता वाढू नये, यासाठी पाणी बचतीच्या उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. प्रशासनाच्या प्रसिद्धी पत्रकानुसार, पाणीपुरवठ्यात १० टक्के कपात करण्यात येणार आहे. नागरिकांनी नळांना तोट्या बसवाव्यात, गळती तातडीने दुरुस्त करावी आणि सर्व्हिस पाइपलाइनवरील टिल्लू पंपांचा वापर टाळावा, असे आवाहन करण्यात आले आहे. पाणीपुरवठा विभाग विशेष तपासणी मोहीम राबविणार असून, पाण्याचा अपव्यय किंवा टिल्लू पंपाचा वापर आढळल्यास पूर्वसूचना न देता नियमानुसार कारवाई केली जाणार आहे. पाणी बचतीची जबाबदारी केवळ नागरिकांचीच नाही, तर जलसाठ्यांचे नियोजन आणि पाणीपुरवठ्यातील गळती रोखण्याची जबाबदारीही प्रशासनाची आहे. त्यामुळे नागरिकांनी पाणी जपून वापरताना प्रशासनानेही उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करून शहराचा पाणीपुरवठा सुरळीत ठेवावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# दुष्काळाचा फटका शेतकऱ्यांना; मालमत्ता कर तरी माफ करा!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**बाभूळगाव, दि. १४ :** यवतमाळ जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित झाल्यानंतर शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिक आर्थिक संकटात सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर बाभूळगाव नगरपंचायतीने सन २०२६-२७ या वर्षाचा मालमत्ता कर माफ करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी नगरसेवकांसह नागरिकांनी मुख्याधिकारी व नगरपंचायत अध्यक्षांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

यंदा पावसाने दडी मारल्याने पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मशागत, बियाणे आणि अन्य शेतीखर्च वाया गेल्याने शेतकऱ्यांची आर्थिक घडी विस्कटली आहे. बाभूळगाव नगरपंचायत हद्दीतील बहुतांश मालमत्ताधारकांचा मुख्य व्यवसाय शेती असल्याने दुष्काळाचा फटका त्यांच्या कुटुंबांनाही बसला आहे. नगरपंचायत ही नागरिकांना रस्ते,



नाल्या, पथदिवे, पाणीपुरवठा आणि आरोग्य यांसारख्या मूलभूत सुविधा देणारी स्थानिक स्वराज्य संस्था आहे. त्यामुळे सध्याच्या संकटात नागरिकांच्या पाठीशी उभे राहून सामाजिक बांधिलकी जपण्याची गरज असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दुष्काळी परिस्थितीचा विचार करून शासनाच्या नियम व दिशानिर्देशांनुसार मालमत्ता करमाफीचा निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. नगरसेवकांच्या निवेदनावर १४ नगरसेवकांच्या, तर स्वतंत्र नागरिक निवेदनावर सुमारे ८० मालमत्ता धारकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. आता नगरपंचायत प्रशासन या मागणीवर काय निर्णय घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# पांढरकवड्यात पाणीटंचाईचे सावट,नागरिकांवर कपातीचा भार!

### १६ ऑक्टोबरपासून पाणीपुरवठ्यात १० टक्के कपात

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. १४ :** यंदा पावसाने ओढ दिल्याने पांढरकवडा शहरातील धरणे आणि जलसाठ्यांमधील पाण्याची पातळी घटली आहे. त्याचा परिणाम आता शहराच्या पाणीपुरवठ्यावर होणार असून, १६ ऑक्टोबरपासून पाणीपुरवठ्यात १० टक्के कपात करण्याचा निर्णय नगर परिषद प्रशासनाने घेतला आहे.

परिणामी, नागरिकांना दररोजच्या पाणीपुरवठ्यात १५ मिनिटांची कपात सहन करावी लागणार आहे. पाणीटंचाईची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने नागरिकांना काटकसरीने पाणी वापरण्याचे आवाहन केले आहे. नळांना तोट्या बसवणे, गळती तातडीने दुरुस्त करणे आणि सर्व्हिस पाइपलाइनवरील टिल्लू पंप काढून टाकण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दरम्यान, पाणीपुरवठा विभागाकडून विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येणार असून, पाण्याचा अपव्यय किंवा टिल्लू पंपाचा वापर आढळल्यास पूर्वसूचना न देता कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे. पाणी बचतीचे आवाहन, पण नियोजन किती प्रभावी? कारण पाण्याचा प्रत्येक थेंब जपण्याची जबाबदारी नागरिकांइतकीच प्रशासनाचीही आहे. उपलब्ध जलसाठ्याचे काटेकोर नियोजन, वितरणातील गळती रोखणे आणि पाणीपुरवठ्याचे पारदर्शक वेळापत्रक जाहीर करणे आवश्यक आहे. नागरिकांवर कपातीचा भार टाकताना पाणीटंचाईवर मात करण्यासाठी प्रशासनाने ठोस उपाययोजनाही कराव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# संत खेमराज महाराजांच्या प्रगट दिनानिमित्त पिंपरीत भक्तीचा जागर

### हरिनामाचा गजर,कीर्तन आणि संगीत मैफलीची मेजवानी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**वणी, दि. १४ :** तालुक्यातील पिंपरी (कायर) येथे संत खेमराज महाराजांच्या सोळाव्या प्रगट दिनानिमित्त भक्तिमय सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.सद्गुरू जगन्नाथ महाराज नंदीगड संस्थानच्या वतीने शनिवार, १७ ऑक्टोबर रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम रंगणार आहेत.

सोहळ्याची सुरुवात शुक्रवार, १६ ऑक्टोबर रोजी ह.भ.प. अनुपमा दीदी पिंपळकर यांच्या कीर्तन व भजनाने होईल.शनिवारी सकाळी ८.१६ वाजता श्री जगन्नाथ महाराजांच्या पालखीची भव्य शोभायात्रा काढण्यात येणार असून विविध गावांतील हरिपाठ मंडळे सहभागी होणार आहेत. दुपारी १.१६ वाजता ह.भ.प. प्रमोद पानबुडे महाराज यांचे कीर्तन होईल.त्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे.दुपारी ३ वाजता स्वरधारा म्युझिक ग्रुप,वरोरा यांचा संगीत कार्यक्रम होणार आहे. परिसरातील वारकरी,भजनी मंडळे आणि भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे,असे आवाहन संस्थानचे अध्यक्ष डॉ.गजानन बाबुराव पावडे यांनी केले आहे.

# पुसद नगरपरिषदेतील रोडचे खड्डे बुजवण्याच्या मुरूम टेंडरवर प्रश्नचिन्ह?

### निकृष्ट व बोगस मुरूम वापरल्याचा आरोप,निवेदक यांची चौकशीची मागणी.!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. १४ :** पुसद:नगरपरिषदेच्या हद्दीतील रोड मधील खड्डे बुजवण्यासाठी एक वर्षासाठी मुरूम टाकण्याच्या कामासाठी मंजूर करण्यात आलेल्या निविदेतील कामाच्या दर्जाबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. संबंधित कामात निकृष्ट व बोगस मुरूम वापरला जात असल्याचा आरोप समाजसेवक फिरोज खान यांनी केला असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

नगरपरिषद हद्दीतील मुरूम टाकण्याच्या कामासाठी निविदा मंजूर करण्यात आली असतांना प्रत्यक्ष कामात माती मिक्स दर्जाहीन मुरूम वापरला जात असल्याची बाब निदर्शनास आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

शासकीय निधीतून होणाऱ्या विकासकामांमध्ये गुणवत्तेशी तडजोड होत असल्यास सार्वजनिक निधीचा अपव्यय होण्याची शक्यता असल्याने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेण्याची मागणी करण्यात आली आहे. संबंधित कामात वापरण्यात येणाऱ्या मुरुमाची गुणवत्ता, मंजूर निविदेतील अटी व शर्ती, अंदाजपत्रक आणि प्रत्यक्ष कामाची पडताळणी करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत स्थळ तपासणी करण्यात यावी, अशी मागणी फिरोज खान यांनी केली आहे. तसेच, कामाची निष्पक्ष व सखोल चौकशी करून अहवाल तयार करावा, मुरमाची तांत्रिक तपासणी करावी, मंजूर निविदा व प्रत्यक्ष कामाची पडताळणी करावी आणि अनियमितता आढळल्यास संबंधित कंत्राटदारासह जबाबदार अधिकाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

# दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी चोरंबा येथे वनराई बंधाऱ्यांची उभारणी



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**घाटंजी, दि. १४ :** घाटंजी तालुक्यातील मौजा चोरंबा येथे संभाव्य दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन भूजल पातळी कायम राखणे, पाण्याचा अपव्यय रोखणे आणि पावसाचे पाणी अडवून जमिनीत मुरविणे या उद्देशाने वनराई बंधारे उभारण्यात आले.

मा. महेश येलगट्टे, उपविभागीय अधिकारी घाटंजी, तसेच मा. विजय साळवे, तहसीलदार घाटंजी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. या कामावर मंडळ अधिकारी रवींद्र शिंदे, साखरा यांच्या नियंत्रणाखाली वनराई बंधारे टाकण्यात आले. यावेळी तलाठी सीडाम मॅडम, तलाठी मानकर, भगतसिंग ढालवाले, वाल्मीक उरकुडे आणि अमितसिंग ढालवाले यांनी सहभाग घेतला. पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अडवून ते जमिनीत जिरविण्यासाठी वनराई बंधारे उपयुक्त ठरतात. त्यामुळे भूजल पातळी टिकवून ठेवण्यास, विहिरींच्या पाणीपातळीत सुधारणा होण्यास तसेच जनावरांसाठी पाणी उपलब्ध राहण्यास मदत होऊ शकते. ग्रामीण भागातील पाणीटंचाई कमी करण्यासाठी अशा जलसंधारणाच्या उपाययोजना महत्त्वपूर्ण मानल्या जातात.

# महावितरण कार्यालयात राडा,उपकार्यकारी अभियंत्याला मारहाण..! मॉनिटरची तोडफोड करून धमकी

### झरीजामणीतील घटनेने खळबळ,सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी एकाविरुद्ध गुन्हा दाखल

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**झरी, दि. १४ :** महावितरणच्या झरी-जामणी येथील कार्यालयात निवेदन देण्यासाठी आलेल्या एका तरुणाने गोंधळ घालत शासकीय कामकाजात अडथळा निर्माण केल्याचा, कार्यालयातील साहित्याची तोडफोड केल्याचा आणि उपकार्यकारी अभियंत्याला मारहाण करून धमकी दिल्याचा आरोप आहे. या प्रकरणी समीर चंद्रशेखर लेंगुरे (वय ३०, रा. पवनार, ता. झरी, जि. यवतमाळ) याच्याविरुद्ध पाटण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांत दाखल तक्रारीनुसार, १३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ३ ते ३.१५ वाजताच्या दरम्यान ही घटना महावितरणच्या झरी-जामणी कार्यालयात घडली. फिर्यादी राजेश बालाजी जिझीलवार (वय ५७), उपकार्यकारी अभियंता, महावितरण, हे कार्यालयात कर्तव्यावर असताना आरोपी निवेदन देण्यासाठी तेथे आला. त्यानंतर त्याने सरकारी कामात अडथळा निर्माण करत कार्यालयातील कागदपत्रांची फेकाफेक केली. तक्रारीत पुढे नमूद केल्यानुसार, आरोपीने प्लास्टिकची खुर्ची टेबलावर आपटली आणि टेबलावरील मॉनिटर खाली पाडून नुकसान केले. या घटनेत अंदाजे चार हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे फिर्यादीने म्हटले आहे. याशिवाय फिर्यादीच्या डाव्या गालावर थाप्पड मारून, "तुम्हाला पाहून घेतो," अशी धमकी दिल्याचाही आरोप आहे. या घटनेप्रकरणी फिर्यादीने पोलिसांत लेखी तक्रार दिल्यानंतर अप. क्र. २१३/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम १३२, ३५१(२), २२१ आणि ३२४(३) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पाटण पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार सचिन गाडगे करीत आहेत. सरकारी कार्यालयातील कर्मचाऱ्याच्या कामात अडथळा आणून कार्यालयीन साहित्याचे नुकसान केल्याच्या या प्रकारामुळे परिसरात चर्चेला उधाण आले आहे.

# सरकारी नाल्यांमधून अवैध पाणी उपसा सुरूच? प्रशासनाच्या कारवाईकडे लक्ष

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**वणी, दि. १४ :** वणी तालुक्यातील ग्रामीण भागात सरकारी नाल्यांमधून डिझेल व मोटारपंपांच्या साहाय्याने पाणी उपसा सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तातडीने कारवाई करावी,अशी मागणी मानवी हक्क सुरक्षा परिषदेने केली आहे.यासंदर्भात परिषदेच्या वतीने उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी,वणी यांना निवेदन देण्यात आले आहे.

यवतमाळ जिल्ह्यात संभाव्य दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता नवीन विहिरी व बोअरवेल खोदण्यावर तसेच जलप्रकल्प आणि बंधाऱ्यांमधून पाणी उपसा करण्यावर निर्बंध



घालण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.उपलब्ध पाणीसाठा पिण्यासाठी सुरक्षित ठेवणे आणि उन्हाळ्यात निर्माण होणारी पाणीटंचाई टाळण्यासाठी पाण्याचे योग्य नियोजन करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या आदेशांची वणी तालुक्यात काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागात गटविकास अधिकारी व तहसीलदार,तर वणी शहरात नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांची अंमलबजावणी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. शासकीय आदेशांचे उल्लंघन होऊ नये आणि पिण्याच्या पाण्याचा साठा सुरक्षित राहावा,यासाठी संबंधित यंत्रणांनी सरकारी नाल्यांमधून होणाऱ्या पाणी उपशाची तपासणी करून तातडीने आवश्यक कारवाई करावी, अशी मागणी मानवी हक्क सुरक्षा परिषदेने केली आहे.निवेदन देतेवेळी मानवी हक्क सुरक्षा परिषदेचे राजु धावंजेवार,परशुराम पोटे,भाऊसाहेब आसुटकर,सुरेश बन्सोड, हनुमंते,संजय चिंचोलकर यांच्यासह मानवी हक्क सुरक्षा परिषदेचे पदाधिकारी उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

# पंचनामे, भरपाई व सिंगल फेजसाठी पालकमंत्र्यांना साकडे

### नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी

**अंजनगाव बारी/ वार्ताहर**

अऱ्हाड येथे रानडुकरांच्या कळपाने तूर व कपाशी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान केल्याने शेतकरी संकटात सापडले आहेत.

या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून भरपाई द्यावी, वन्यप्राण्यांपासून संरक्षणासाठी कुंपण अनुदान मंजूर करावे आणि अऱ्हाड ॲग्रीकल्चर फीडरवरील सिंगल फेज वीजपुरवठा त्वरित सुरू करावा, अशी मागणी किरण पोकळे, विजय पोकळे व प्रकाश पोकळे यांनी महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.





रानडुकरे, रोही व माकडांच्या उपद्रवामुळे पिकांचे नुकसान होत असताना सिंगल फेज वीजपुरवठा बंद असल्याने रात्री पिकांचे संरक्षण करणेही कठीण झाले आहे.

प्रशासनाने तातडीने दखल घेऊन पंचनामे, नुकसानभरपाई व वीजपुरवठ्याचा प्रश्न मार्गी लावावा; अन्यथा तीव्र आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

**नुकसानग्रस्त पिकांची प्रत्यक्ष पाहणी**

अऱ्हाड येथील नुकसानग्रस्त शेतातील तूर व कपाशी पिकांची संबंधित अधिकारी व उपस्थितांनी प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी पोलीस पाटील विनोद डकरे, कृषी सहायक प्रियंका पाटबाजे, शेतकरी विजय पोकळे, किरण पोकळे, बाळू यमगर, वन अधिकारी अमोल खैरकर आणि तलाठी प्रीती कराळे आदी उपस्थित होते. या पाहणीनंतर नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना नियमा नुसार भरपाई मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

## दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर
# पिंगळादेवी संस्थानची मुख्यमंत्री निधीला मदत

**लेहगाव/ वार्ताहर**



मोर्शी तालुक्यातील नेरपिंगळाईजवळच्या सुंदरगिरी पर्वतावर वसलेले ऐतिहासिक व जागृत देवस्थान म्हणून पिंगळादेवी मंदिराची ओळख आहे. या मंदिराने यावर्षी अत्यंत सकारात्मक निर्णय घेतला असून नवरात्रोत्सवात गोळा होणाऱ्या देणगीचा मोठा भाग मुख्यमंत्री सहायता निधीला अर्पण करण्याचे ठरवले आहे.

राज्यात उद्भवलेल्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर मंदिर व्यवस्थापनाने हा निर्णय घेतला असून त्यामुळे अभावग्रस्त शेतकऱ्यांना मोठी मदत होणार आहे. दुसरीकडे नवरात्रोत्सवातील इतर उत्सवांसाठीसुद्धा हे मंदिर सज्ज झाले आहे. अमरावती-मोर्शी मार्गावर अमरावतीपासून सुमारे ३५ किलोमीटर अंतरावर असलेले हे देवस्थान नेरपिंगळाईपासून अवघ्या चार किलोमीटर अंतरावर आहे.

सध्या उभा महाराष्ट्र दुष्काळाच्या झळांमुळे होरपळून निघत आहे.सरकारने त्यासाठी उपाययोजना आखल्या आहेत. परंतु समाज म्हणून संस्था, संघटना, मठ, मंदिरे यांचीही काही जबाबदारी आहे. तेच भान राखत मंदिर व्यवस्थापनाने यावर्षीच्या देणगीचा मोठा वाटा मुख्यमंत्री सहायता निधीला देण्याचे ठरवले आहे.

### भोसलेकालीन कापूर तलाव

कापूर मंदिरापासून काही अंतरावर भोसलेकालीन तलाव आहे. हा तलाव भाविकांसाठी आणखी एक आकर्षण आहे. हा तलाव रघुजी राजे भोसले यांनी बांधल्याचे सांगितले जाते. धार्मिक स्थळासोबतच निसर्गरम्य परिसर आणि ऐतिहासिक वारसा यामुळे पिंगळादेवी गडाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

**विनीत पाखोडे**, अध्यक्ष व सर्व विश्वस्त, पिंगळादेवी देवस्थान

## राज्यात दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर
# राज्यात विदा केंद्र परिसंस्थांचा वेगाने विस्तार

### १६ सदस्यीय राज्यस्तरीय समिती स्थापन

**अमरावती/ का.प्र.**

महाराष्ट्रात झपाट्याने विदा केंद्रांची (डेटा सेंटर्स) संख्या वाढत असताना त्याचा पर्यावरण, वीज आणि पाण्याच्या उपलब्धतेवर पडणारा संभाव्य ताण लक्षात घेऊन, या प्रकल्पांच्या सर्वकष अभ्यासासाठी राज्य सरकाने उच्चस्तरीय समिती गठीत केली आहे.

राष्ट्रीय अणूऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली ही १६ सदस्यीय राज्यस्तरीय समिती स्थापन करण्यात आली असून, याबाबतचा शासन निर्णय उद्योग विभागाने जारी केला आहे.

राज्यात दुष्काळी परिस्थिती आहे. पाणीटंचाईचे संकट उभे ठाकले आहे.

त्यातच राज्यात विदा केंद्र परिसंस्था अत्यंत वेगाने विस्तारत आहे. विविध कंपन्या या क्षेत्रात कार्यरत आहेत. पण, विदा केंद्रांमुळे होत असलेल्या गंभीर दुष्परिणामांवरही बोलले जात आहे. विदा केंद्रांसाठी अतिरिक्त वीज लागेल, याचबरोबर या केंद्रांसाठी पाण्याची आवश्यकता मोठ्या प्रमाणात भासते.

विदा केंद्रांमधील सर्व्हर थंड ठेवण्यासाठी पाणी आणि ऊर्जा लागते. यंदाच्या दुष्काळी परिस्थितीत विदा केंद्रांसाठी पाण्याची उपलब्धता हा कळीचा मुद्दा ठरला आहे. त्यावर पर्यावरणवाद्यांनी चिंता व्यक्त केली आहे.

विदा केंद्र उद्योगात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत असली, तरी प्रकल्पांना लागणारी वीज, पाणी, उत्सर्जित होणारी उष्णता आणि त्यामुळे स्थानिक नागरी सुविधांवर होणारे दुष्परिणाम यावरून विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी सूचनेद्वारे चिंता व्यक्त करण्यात आली होती. त्यावेळी उद्योगमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनानुसार ही समिती स्थापन करण्यात आली आहे.

या समितीत ऊर्जा, जलसंपदा, उद्योग आणि पर्यावरण विभागाचे प्रधान सचिव तसेच 'नीरी'चे संचालक डॉ. एस. वेंकट मोहन, आयआयटी मुंबईचे प्रा. एम.व्ही.रणे यांच्या सह 'ॲमेझॉन वेब सर्व्हिसेस' आणि 'योट्टा डेटा सर्व्हिसेस'चे प्रतिनिधी सदस्य म्हणून कार्यरत राहतील. सेवा आयुक्तालयाचे आयुक्त या समितीचे सदस्य सचिव असतील.

समिती केवळ दुष्परिणामांचा अभ्यास करणार नसून पर्यावरणपूरक 'ग्रीन डेटा सेंटर्स'ची उभारणी, पाण्याचा पुनर्वापर, पर्यायी शीतकरण तंत्रज्ञान आणि मानकांवर आधारित कार्यपद्धती तयार करण्याबाबत शिफारशी करेल.

याशिवाय स्थानिक रोजगार, कौशल्य विकास आणि प्रकल्पांबाबत नागरिकांमधील गैरसमज दूर करण्यासाठी जनजागृतीची चौकट देखील समिती निश्चित करणार आहे. या समितीला तीन महिन्यांच्या आत आपला अंतिम आणि कृतीशील अहवाल शासनाला सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## 'ना जमिन ना आधार' भूमिहीनांचा वाली कोण?

**खल्लार/ वार्ताहर**

सणासुदीचे दिवस आले की सर्वत्र आनंदाचे, उत्साहाचे आणि खरेदीचे वातावरण निर्माण होते. बाजारपेठा सजतात, घराघरांत सणांची तयारी सुरू होते.मात्र दुसरीकडे भूमिहीन नागरिकांच्या आयुष्यात आजही आर्थिक विवंचनेचे सावट कायम आहे. स्वतःच्या मालकीची जमिन नाही, उत्पन्नाचे ठोस कुठलेही साधन नाही आणि अनेकदा शासकीय योजनांचाही पुरेसा लाभ मिळत नसल्याने या घटकांसमोर उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. अशा परिस्थितीत भूमिहीन नागरिकांचा वाली कोण, हा प्रश्न ऐरणीवर आला आहे.शेती करण्यासाठी स्वतःची जमिन नसल्याने अनेक भूमिहीन कुटुंबांना शेतमजुरी, रोजंदारी किंवा मिळेल ते काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करावा लागतो. काम मिळाले तर चूल पेटते, अन्यथा घरखर्च भागविण्यासाठीही मोठी कसरत करावी लागते. मुलांचे शिक्षण, आरोग्याचा खर्च, घरातील जिवनावश्यक वस्तू आणि दैनंदिन गरजा भागविताना त्यांच्या आर्थिक परिस्थितीची कसोटी लागते. त्यातच सणासुदीचा काळ जवळ आला की कपडे, किराणा, तसेच इतर आवश्यक वस्तूंच्या खरेदीचा खर्च वाढतो. समाजातील इतर घटक आनंदाने सण साजरे करत असताना आर्थिक परिस्थितीमुळे अनेक भूमिहीन कुटुंबांना मात्र गरजा आणि इच्छा यांची सांगड घालत दिवस काढावे लागतात.

## संक्षिप्त

### जागतिक मानसिक आरोग्य जनजागृती सप्ताहनिमित्त

**अमरावती** - संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या मानसशास्त्र विभागाच्यावतीने जागतिक मानसिक आरोग्य जनजागृती सप्ताहनिमित्ताने मानसिक आरोग्य जनजागृती, मानसशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन, एम. ए. मानसशास्त्र प्रथम वर्ष विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन प्रोग्राम तसेच मानसिक आरोग्यविषयक पोस्टर सादरीकरण असे विविध शैक्षणिक व जनजागृतीपर उपक्रम संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मानसशास्त्र विभागाच्या समन्वयक प्रा. अरुणा तसरे, प्रमुख पाहुणे म्हणून शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावतीचे मानसशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख व ज्येष्ठ प्राध्यापक डॉ. श्रीकांत शर्मा उपस्थित होते.डॉ. अमोल गुल्हाने यांनी मानसिक आजार व त्यांची लक्षणे, आजारांशी संबंधित प्रचलित गैरसमज आणि मानसिक आरोग्याबाबत योग्य दृष्टिकोन याविषयी मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांशी संवाद साधत शंकांचे निरसन केले. अभ्यास मंडळाचे अध्यक्ष हर्षदा इंगोले, उपाध्यक्ष, चेतन राऊत, सचिव वैभव भिवरकर, कोषाध्यक्ष म्हणून पूजा वानखेडे, तर सदस्य म्हणून पायल खंडार, ॲड. रवी जावंजळ, प्रिया शेळडे, सत्यम किरक्टे यांची निवड करण्यात आली आहे. त्यानंतर नवीन विद्यार्थ्यांना विभागाची शैक्षणिक रचना, अभ्यासक्रम, विभागीय उपक्रम, शैक्षणिक संधी आणि मानसशास्त्र विषयातील पुढील व्यावसायिक व संशोधनाच्या संधी यांची ओळख करून देण्यासाठी एम.ए. मानसशास्त्र प्रथम वर्षाचा इंडक्शन प्रोग्राम संपन्न झाला.संचालन प्रिया शेळके पाहुण्यांचा परिचय हर्षदा इंगोले यांनी करुन दिला आभार प्रदर्शन पूजा वानखेडे यांनी केले.आयोजनासाठी प्रा. राजश्री ब्राम्हणे यांच्यासह विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाला विभागातील प्रा. मनिषा लकडे, प्रा. अभिजित खंडारे, वरिष्ठ लिपिक राजू इंगोले, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.



### शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी मुदतवाढ

**अमरावती** - इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळवण्यासाठी ३० ऑक्टोबर २०२६ पर्यंत ऑफलाईन अर्ज करण्यास मुदत वाढ देण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता१२ वी नंतर उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या वर्षाच्या प्रवेशासाठी संबंधित वसतिगृहामध्ये अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.आवश्यक कागदपत्रांसह वसतिगृह प्रवेशासाठीचा अर्ज कालमर्यादेत मुलांनी इतर मागास बहुजन कल्याण मुलांचे शासकीय वसतिगृह, ब्लॉक एच, राम लक्ष्मण संकुल, दुसरा माळा, रामपुरी कँप अमरावती येथे तर मुलींनी बहुजन कल्याण मुलींचे शासकीय वसतिगृह, ब्लॉक ए, राम लक्ष्मण संकुल, तिसरा माळा, रामपुरी कँप अमरावती या वसतीगृहांमध्ये सादर करावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण अमरावतीच्या सहायक संचालक सरिता बोबडे केले आहे.ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेअंतर्गत इच्छुक विद्यार्थ्यांनी ऑफलाईन अर्ज भरून आवश्यक त्या कागदपत्रांसह दिलेल्या दिनांकापर्यंत सादर करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.माहितीसाठी सहायक संचालक,इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, सामाजिक न्याय भवन, (पोलीस आयुक्तालयाच्या मागे) येथे तसेच adobbwoamravati@gmail.com वर ईमेलवर तसेच ०७२१-२९९०३५९ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करता येणार आहे.

### सिताफळ झाडांच्या लिलावासाठी निविदा आमंत्रित

**अमरावती** - मोर्शी येथील खुले कारागृह प्रक्षेत्रावरील ५०० सिताफळ झाडांवरील फळांच्या लिलावासाठी १४ ते २० ऑक्टोबर २०२६ दरम्यान मोहोरबंद निविदा मागविण्यात आल्याचे कारागृह अधिक्षकांनी कळविले आहे.निविदा अर्ज व लिलावाच्या अटी –शर्ती संबंधी तसेच झाडांची पाहणी करण्यासाठी कारागृह परिक्षेत्रात कार्यालयीन दिवस व वेळेत संपर्क साधण्याचे तसेच या निविदा २३ ऑक्टोबर रोजी दुपारी ४ वाजता कारागृह अधिक्षक यांच्या कार्यालयात उघडण्यात येतील असे सांगण्यात आले आहे.

### मरिमाय माता मंदिरात भाविकांची मांदियाळी

**ब्राह्मणवाडा थडी** - येथील ग्रामदैवत मरिमाय माता मंदिरात दर्शनासाठी भाविकांची गर्दी जमली आहे. श्रद्धा आणि भक्तिभावाने मातेचे दर्शन घेऊन भाविकांकडून सुख, शांती, समृद्धी आणि कुटुंबाच्या कल्याणासाठी प्रार्थना केली जात आहे.भाविकांकडून मनोभावे पूजा-अर्चा करण्यात येत असून, मातेच्या दर्शनाने भाविकांना आत्मिक समाधान मिळत असल्याची भावना व्यक्त होत आहे. ग्रामदैवत मरिमाय माता ही परिसरातील नागरिकांच्या श्रद्धेचे महत्त्वाचे स्थान असल्याने मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची नेहमीच वर्दळ पाहायला मिळते.

# स्वरा भेलांडे हिची तलवारबाजीत राज्यस्तरावर निवड

**अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर**

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवा सेवा संचालनालय, जिल्हा क्रीडा परिषद तथा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय विभागीय तलवारबाजी (फेन्सिंग) क्रीडा स्पर्धा सन २०२६-२७नुकतीच अमरावती येथे पार पडली. या स्पर्धेत विभागातील पाच जिल्ह्यांमधून ग्रामीण भागातील विविध शाळांमधून अनेक मुला-मुलींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.विभागीय फेन्सिंग स्पर्धेत सीताबाई संगई कन्या शाळेच्या स्वरा भेलांडे हिने उल्लेखनीय कामगिरी करीत शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील यशाची परंपरा कायम राखली. फेन्सिंगमधील सेबर या प्रकारात उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले.



यामध्ये स्वरा हिने उत्कृष्ट कामगिरी करीत द्वितीय क्रमांक मिळविला.या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर तिची राज्यस्तरीय फेन्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.या यशाबद्दल सीताबाई संगई एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. उल्हास संगई, उपाध्यक्ष भरत संगई व विवेक संगई, सचिव प्रसाद संगई, सहसचिव प्रसन्न संगई, अजय संगई, कार्यकारिणी सदस्य अविनाश संगई व आशिष संगई तसेच सर्व संचालक मंडळाने यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका नीलिमा सांगोळे व पर्यवेक्षक अमोल डहाळे यांनी विद्यार्थिनींचे कौतुक करून विभागीय स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.या यशस्वी खेळाडूला सीताबाई संगई कन्या शाळेचे शारीरिक शिक्षण शिक्षक श्री. समाधान शेटफळकर व हायस्कूलचे शारीरिक शिक्षण शिक्षक विशाल भेलांडे यांचे मार्गदर्शन लाभले.

# जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या प्रवेशद्वारासमोर साचली दुर्गंधी

### महापालिका आयुक्तांना पत्र

**अमरावती/ का.प्र.**

जिल्हा स्त्री रुग्णालयाकडून महिला आणि गर्भवती मातांना चोवीस तास वैद्यकीय सेवा पुरवली जात असली, तरी रुग्णालयाच्या नवीन इमारतीच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ साचलेला कचरा आणि वाढलेली रानडुकरांची संख्या यामुळे स्वच्छतेच्या दर्जाबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.मुख्य प्रवेशद्वाराजवळ साचलेल्या कचऱ्यामुळे मोकाट डुकरांचा वावर वाढला आहे.




ज्यामुळे अस्वच्छता आणि दुर्गंधी वाढते आणि रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना मोठा त्रास सहन करावा लागतो.

या गंभीर समस्येच्या पार्श्वभूमीवर, रुग्णालय प्रशासनाने अमरावती महानगरपालिकेकडे तातडीने कारवाई करण्याची विनंती केली आहे. रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. संध्या खराटे यांनी महापालिका आयुक्तांना पत्र सादर केले. या पत्रात मुख्य प्रवेशद्वाराजवळील कचरा आणि रानडुकरांचा वाढता वावर यांकडे लक्ष वेधण्यात आले असून, या समस्येचे त्वरित निवारण करण्याची विनंती करण्यात आली आहे.रुग्णालया सारख्या संवेदनशील ठिकाणी अशी परिस्थिती असल्याने स्वच्छता व्यवस्थापनाबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. रुग्णालय परिसरात संसर्गाचा धोका रुग्णालय प्रशासनाच्या मते, रुग्णांच्या आरोग्याच्या सुरक्षेसाठी रुग्णालय परिसरातील स्वच्छता राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आता महापालिका प्रशासन या तक्रारीवर किती लवकर कार्यवाही करते आणि रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांची या त्रासातून कधी सुटका होते, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# बगाजी सागरमध्ये केवळ ८१ टक्के पाणीसाठा

### ४४ गावांना पाणीटंचाईचा फटका बसणार

**धामणगाव रेल्वे/ वार्ताहर**

वाढते तापमान आणि घटणारी पाणीपातळी यामुळे बगाजी सागर धरणातील पाणीसाठा सध्या त्याच्या एकूण क्षमतेच्या केवळ ८१ टक्के इतकाच आहे. परिणामी, पाण्याचा विवेकी वापर न केल्यास, नजीकच्या काळात सुमारे ४४ गावांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू शकतो. बगाजी सागर हे धरण 'लोअर वर्धा प्रकल्पा'चा भाग असून ते अमरावती आणि वर्धा जिल्ह्यांच्या सीमेवर स्थित आहे.

हे धरण धामणगाव शहर, जुने धामणगाव, पुलगाव, पुलगाव नगर परिषद कॅम्प परिसर आणि देवळी तालुक्यातील ४४ गावांना पाणीपुरवठा करते. या प्रकल्पाची पाणी साठवण क्षमता २८३.८० एमसीएम (दशलक्ष घनमीटर) इतकी आहे. गेल्या वर्षी हा प्रकल्प १०० टक्के भरला होता, तरीही मधल्या काळात त्यातून पाणी सोडण्यात आले होते. यावर्षी बगाजी सागर प्रकल्प क्षेत्रात पावसाचे प्रमाण अत्यंत कमी राहिले आहे. तसेच, वर्धा प्रकल्पाचा एकही दरवाजा उघडला न गेल्यामुळे प्रकल्पातील पाणीसाठ्यात वाढ झाली नाही. यावेळी प्रकल्प त्याच्या क्षमतेच्या केवळ८२ टक्क्यांपर्यंतच भरला; त्यामुळे पाणीसाठ्याची पातळी कमीच राहिली आहे.

हिवाळा असूनही उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत आहे. यावर्षी पावसाचे प्रमाण कमी होते आणि या भागाला पुढील नऊ महिने याच जलसाठ्यावर अवलंबून राहावे लागणार आहे. आगामी तीन महिन्यांत उन्हाळ्याची तीव्रता लक्षणीयरीत्या वाढणार असून त्याचा परिणाम प्रकल्पातील पाणीसाठ्यावर होईल. गेल्या आठवड्याभरात पाणीपातळीत वेगाने घट झाल्याचे दिसून आले आहे. बाष्पीभवनामुळे होणारा पाण्याचा ऱ्हास ही चिंतेची बाब आहे.



गेल्या १५ दिवसांपासून, हिवाळा असूनही उन्हाळ्यासारखी तीव्र उष्णता जाणवत आहे. या प्रकल्पातील पाण्याची मागणी वाढू लागली असून उपलब्ध पाणीसाठा वेगाने कमी होत आहे.

सध्या मुख्य साठ्यातून पाणी काढले जात आहे; एकूण साठवण क्षमतेपैकी ८१ टक्के पाणीसाठा अद्याप उपलब्ध आहे. आगामी काळात उष्णतेची तीव्रता वाढल्यास पाण्याचा वापर आणखी वाढण्याची शक्यता आहे.

# स्वमतान्धतेची संगती सोडा

**अहंकारी माणसांत ही स्वमतान्धता इतकी टोकाची असते की, प्राण गेला तरी मी बदलणार नाही, कितीही, कोणतेही नुकसान झाले तरी चालेल, असा अहंभाव केवळ विनाशाकडे घेऊन जातो.**

प्रत्येक माणसाला स्वतःची मते असतात, सभोवतालच्या वातावरणातून ती तयार झालेली असतात. काही वेळा ही मते पक्की झालेली असतात तर काही वेळा ती बदलत राहतात. कधी स्वतःच्या मतावर ठाम राहतो कधी इतरांच्या सांगण्यानुसार आपले मत बदलते. परिस्थितीनुसार, सद्हेतूपूर्तीसाठी किंवा अज्ञानातून बाहेर पडताना नवीन विचारांचा स्वीकार करणे आवश्यक ठरते. तो स्वीकार विवेकबुद्धीच्या तर्कावर व्हायला हवा. परिवर्तनातून काही विधायक गोष्टी घडत असतात त्या घडायला हव्यात. परंतु काही लोक असे असतात की, नवीन कोणतीही गोष्ट स्वीकारायला तयारच नसतात, यांनी स्वतःची एक विचारसरणी स्वतःच बनवलेली असते. काही प्रसंग यांच्या आयुष्यात घडून गेलेले असतात, अनुभव आलेले असतात. वाचनात आलेले असतात, काही समज किंवा गैरसमज करून घेतलेले असतात. त्यातून स्वतःची एक मतांची बैठक तयार होते. स्वतःबद्दल अहंकार इतका असतो की, या वैचारिकतेत ते कणभर सुद्धा बदल करायला तयार नसतात. मन विशिष्ट चाकोऱ्यांमधून जात असते, म्हणून कोणत्याही प्रकारचे नवीन विचार ग्रहण करणे त्यांना कठीण जाते.

काही वेळा ग्रंथांमधूनच मतमतांतरे उत्पन्न होतात अन् ते स्वमतान्धतेला जबाबदार होतात. कधी कधी अतिविश्वासामुळे स्वमतान्धता निर्माण होऊ शकते. स्वामी विवेकानंद म्हणतात,'स्वमतान्ध लोक काम करू शकत नसतात, त्यांची तीन चतुर्थांश शक्ती अशीच वाया जात असते. जो सतत ज्ञान ग्रहण करीत राहील तो नवविचारांना आपलेसे करील तोच विधायक काम करू शकेल. स्वमतान्ध लोक तिरस्कार करीत असतात. जेव्हा आपण अशा लोकांची संगती सोडू, तेव्हाच खरे प्रेम करायला शिकू, इतरांबद्दल सहानुभूती बाळगणे शक्य होईल.'

मी म्हणतो तेच बरोबर,'माझ्या मताव्यतिरिक्त कोणाचे बरोबर असूच शकत नाही' असे व्यक्ती केवळ स्वतःच्या मतांवर अंधभक्ती ठेवून जगतात. ती मते बरोबर की चूक याचा विवेकी विचार करीत नाहीत. तपासून पाहत नाहीत. त्यांच्या सोबतच अखंड आयुष्य काढतात. आयुष्याच्या कोणत्याही टप्प्यावर, कोणत्याही परिस्थितीत त्यांना स्वतःच्या विचारांचा वापर करून परिस्थिती हाताळायची असते. अहंभावी बुरसटलेली स्वमते वापरून सर्व परिस्थितीवर काबू मिळवून चुकीचे निर्णय घेतले जातात. त्यातून स्वतः सोबत दुसऱ्यांचे देखील नुकसान केले जाते. प्रत्येक गोष्ट जशीच्या तशी स्वीकारायला व तिच्यावर विश्वास ठेवायला कोणास भाग पाडले तर तो मानसिकदृष्ट्या दुर्बल बनतो.

अहंकारी माणसांत ही स्वमतान्धता इतकी टोकाची असते की, प्राण गेला तरी मी बदलणार नाही, कितीही, कोणतेही नुकसान झाले तरी चालेल, असा अहंभाव केवळ विनाशाकडे घेऊन जातो. दुसरे कोणी यांना आरसा दाखविण्याचा प्रयत्न केला तर त्यास वाईट ठरवून कायमचा दूर लोटले जाते. अशा लोकांच्या दृष्टीने त्यांचे मत बरोबर म्हणणारे किंवा त्यांच्याप्रमाणे वागणारे चांगले असतात. इतर सर्व वाईट, चुकीचे असतात. स्वमतात गुरफटलेले त्यातून बाहेर येणे कठीण असते. त्यांच्यावर कोणाच्या उपदेशाचा किंचितदेखील फरक पडत नाही. त्यामुळे अहितच घडते व दुःख तयार होते. दुःख देखील स्वीकारायला ते तयार होतात. परंतु आपला हेका सोडत नाहीत. आतून दुःखाने पोखरत राहतात, आजारी पडतात परंतु व्यक्त होत नाहीत, चूक कबूल करत नाहीत. माफी मागणे अहंपणामुळे शक्य होत नाही.

**दुष्टांचे चिंतन भिन्ने अंतरी।**
**जरी जन्मवरी उपदेशिला।**
**पालथे घागरी घातले जीवन ।**
**घरीच जाण तेही त्याला।।**

दुष्टांना जन्मभर चांगला उपदेश केला तरी त्यांच्या चित्तात सतत बदल होत असतात. पालथ्या घागरीवर पाणी टाकले तर ते आत शिरत नाही. तसेच हे समजावे. कशाला असे दुष्ट जन्माला आले ? पाण्यामध्ये दगड कल्पपर्यंत शिजवला तरी शिजत नाही आणि मुगामध्ये कुचर मूग असला तरी तो कायम टणक राहतो. सर्वांच्या सुधारणेचा काहीतरी उपाय मिळू शकतो. पण अशा माणसांचे मन वळविणे शक्य नाही. म्हणून त्यांच्या संगतीसच लागू नये. त्यांना टाळण्यातच आपले हित आहे. असे तुकाराम महाराज म्हणतात.

प्रमाण ग्रंथवाचनातून, महापुरुषांच्या उपदेशातून आपणास बोध होत असतो. अशावेळी आपल्या चुकीच्या विचारांतून बाहेर पडून योग्य विधायक विचारधारा स्वीकारणे कालानुरूप आवश्यक ठरते. आयुष्य ही सातत्याने शिकण्याची प्रक्रिया आहे. अद्ययावत राहत पुढे गेले तरच आयुष्याचा खरा अर्थ समजेल व खरा आनंद घेता येईल. त्यासाठी अहंकार सोडून स्वमते तपासून बघायला हवीत. विवेकाने वागायला हवे परिस्थिती, काळ व अनुभवानुसार सकारात्मक बदल घडवण्यासाठी लवचिकता आणावी लागेल.

'कदाचित मी चुकीचा असू शकतो ह भावना स्वमतांधतेपासून वाचवू शकते. आपले मन बदलणे म्हणजे पराभव नाही, नवीन तथ्य समोर आल्यानंतर आपले मत बदलण्याची तयारी म्हणजे बौद्धिक प्रामाणिकपणा असायला हवा. दुसऱ्याशी वाद घालण्यापेक्षा आधी स्वतःच्या मनाशी संवाद साधणे आवश्यक आहे.

**'आपुलाचि वाद आपणांसी।।'**

**डॉ. वर्षा खोत**
मो.९४२३५६५८८६

जागतिक हात धुणे दिवस

# 'बी अ हँडवॉशिंग हिरो, आजारांचे प्रमाण करा झिरो!'



आजच्या धकाधकीच्या आणि प्रदूषणाने भरलेल्या जगात स्वतःला आणि आपल्या कुटुंबाला निरोगी ठेवणे हे एक मोठे आव्हान बनले आहे. यावर सर्वात सोपा, स्वस्त आणि प्रभावी उपाय आपल्याच हाती आहे, तो म्हणजे 'हात धुणे'.आरोग्य रुपी संपत्तीचे रक्षण करण्याची पहिली पायरी आपल्याच हातात असते ती म्हणजे 'स्वच्छ हात'. योग्य वेळी आणि योग्य पद्धतीने हात धुवून आपण स्वतःचे अनेक आजारांपासून रक्षण करू शकतो आणि समाजात एक 'आरोग्य दूत' किंवा 'हिरो' बनू शकतो.आपण आपल्या हातांनी अनेक गोष्टींना स्पर्श करतो,ज्यामुळे असंख्य अदृश्य जंतू आपल्या हातांवर स्थिरावतात. हेच जंतू अन्नाद्वारे किंवा चेहऱ्याला स्पर्श केल्याने शरीरात प्रवेश करतात आणि विविध आजारांना आमंत्रण देतात. याच पार्श्वभूमीवर, जंतूंचा प्रसार रोखण्यासाठी आणि लोकांना जागरूक करण्यासाठी दरवर्षी १५ ऑक्टोबर रोजी जागतिक हात धुणे दिवस साजरा केला जातो.

वर्ष २०२६ साठी मध्यवर्ती थीम 'बी अ हँडवॉशिंग हिरो'म्हणजेच 'हात धुण्याचे आदर्श /अनुकरणीय व्यक्ती / नायक बना!'अशी निश्चित करण्यात आली आहे. ती एक आरोग्यदायी चळवळ आहे.या निमित्ताने हात धुण्याच्या सवयीला वैयक्तिक आरोग्यापुरते मर्यादित न ठेवता, प्रत्येकाने आपल्या समाजात स्वच्छतादूत किंवा 'हिरो' बनून इतरांना प्रेरित करावे,यावर भर देण्यात आला आहे.हँडवॉशिंग हिरो' तोच असतो जो:स्वतः नियमित आणि योग्य पद्धतीने हात धुतो,आपल्या घरातील लहान मुलांना आणि कुटुंबाला हात धुण्याचे महत्त्व पटवून देतो,आजूबाजूच्या परिसरात स्वच्छतेचा संदेश पसरवून आजारांचा प्रसार रोखण्यास मदत करतो.

हात धुण्याचे महत्त्व:- आजारांपासून बचाव.फक्त हातावर पाणी टाकणे म्हणजे हात धुणे नव्हे. यासाठी किमान २० सेकंद वेळ देणे गरजेचे आहे. हात धुण्याच्या पायऱ्या:-ङ १. हात ओले करा ड(़्):ङ सर्वात आधी हात स्वच्छ आणि वाहत्या पाण्याने ओले करा.२. साबण लावा ड(़्):ङ हाताला पुरेसा साबण किंवा हँडवॉश लावा.३. घासा हाताचे तळवे, पाठीमागचा भाग, बोटांमधील जागा आणि नखांच्या खालचा भाग व्यवस्थित किमान २० सेकंद घासा.४. धुवून टाका.वाहत्या स्वच्छ पाण्याने हात पूर्णपणे धुवून घ्या.५. कोरडे करा.हात स्वच्छ टॉवेलने/हवेत कोरडे करा.

'हँडवॉशिंग हिरो' असणे म्हणजे जागतिक आरोग्य संघटना आणि युनिसेफ सारख्या संस्था नेहमीच हात धुण्याच्या महत्त्वाला अधोरेखित करतात.'हँडवॉशिंग हिरो' तोच असतो जो नियमित आणि योग्य पद्धतीने हात धुतो.

लहान मुलांना 'हँडवॉशिंग हिरो' बनवण्यासाठी गाणे म्हणणे: मुलांना हात धुताना त्यांचे आवडते गाणे किंवा 'हॅपी बर्थडे' गाणे दोनदा म्हणायला सांगा, जेणेकरून २० सेकंदांचा वेळ सहज पूर्ण होईल.रोल मॉडेल बना: पालकांनी स्वतः आधी हात धुवून मुलांसमोर आदर्श ठेवावा. कौतुक करा: मुलांनी स्वतःहून हात धुतल्यास त्यांना 'सुपरहिरो' म्हणून दाद द्या. स्वच्छ हात, निरोगी आयुष्य' हाच 'हँडवॉशिंग हिरो'चा खरा मंत्र आहे.'हात धुणे' ही एक छोटीशी आणि सोपी सवय आपल्या आरोग्यासाठी आणि देशाच्या आरोग्यासाठी खूप मोठी भूमिका बजावू शकते. हात धुणे हीच खरी शक्ती, आजारांपासून मिळेल मुक्ती!

**डॉ विनोद पवार**
मो.९४२३४ ३३४५३



# वात्सल्यरुप-डॉ.कल्याणी मोहरीर(डहाळे)

### पाचवी माळ

रसिकांनो, स्त्रीशक्ती आपण सतत अनुभवत असतो. आज प्रत्येक क्षेत्रामध्ये स्त्री आघाडीवर आहे.आज मी ज्यांच्या कर्तृत्वाचा परिचय आपणास करून देणार आहे त्या आहेत नागपुरच्या डॉ. कल्याणी मोहरीर व पूर्वाश्रमीच्या कल्याणी डहाळे.त्या कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय,रामटेक येथे सहाय्यक प्राध्यापक म्हणून २०१८ पासून कार्यरत आहेत.रामटेकचे हे विश्वविद्यालय म्हणजे महाराष्ट्र राज्यात एकमेव असलेले संस्कृत विश्वविद्यालय आहे.ह्या विश्वविद्यालयात त्या विद्यार्थ्यांना ज्योतिष शास्त्र,वास्तुशास्त्र आणि सोबतच होरा शास्त्र सुद्धा शिकवीत आहेत.त्यांनी कॉम्प्युटर सायन्स मध्ये एमबीएम तसेच सॉफ्टवेअर टेस्टिंग सुध्दा केलेले आहे. केंब्रिज विद्यापीठातून बिझनेस कम्युनिकेशनही त्यांनी केलेले आहे. मुख्य म्हणजे त्यांनी वेदांग ज्योतिष्य.पीजी डिप्लोमा केलेला आहे. तसेच वेदांग ज्योतिषमध्ये एमए केलेले आहे व त्यात सुवर्णपदकही मिळविलेले आहे.सणवार, व्रतवैकल्ये धार्मिक विधी, यज्ञ यागांची विशेष आवड असल्याने त्यांनी विविध चॅनेल्स द्वारे भारतीय संस्कृती, सणवार, रूढी आणि परंपरा यांचा वैज्ञानिक-शास्त्रीय दृष्टिकोन त्याची जीवनशैलीतील आवश्यकता या विषयांवर उद्बोधन केलेले आहे.



डॉ.कल्याणी ह्यांना 'होरा मर्मज्ञ'..'वराहमिहीर' पुरस्कारही मिळालेला आहे.आणि त्यांच्या प्रश्नभूषणम् (अनुवाद) ह्या पुस्तकाचेही प्रकाशन झाले आहे.त्यांचे लेख विविध वर्तमानपत्र, जर्नल्स मधून छापून आलेले आहेत.शिस्तीचे पालन करणे हा त्यांचा स्वभावधर्म आहे. त्यामुळे कॉलेजमध्ये या कडकबाईच्या भूमिकेत असतात.बुद्धीचे दैवी वरदान लाभलेल्या कल्याणी खूप मेहनती आहेत.सासू-सासऱ्यांची सेवा करणं हाही त्यांच्या स्वभावाचा विशेष आहे. अतिशय कौतुकाने,हिरीरीने नि आनंदाने पितृतुल्य सास-यांचा अमृत महोत्सव सोहळा असो किंवा चतुर्थीचे उद्यापन सोहळा त्यांनी अतिशय दिमाखात साजरा केला आहे. ह्यातून संस्कार, कुटुंबाबद्दलचा लोभ आणि कर्तव्याची.. गृहिणीपदाच्या जबाबदारीची जाणीव आपल्याला दिसते.

**ॲड.सुलभा गोगरकर,** अमरावती
मो.९४२३६००४६८

# नवरात्रीत कन्यापूजन; गर्भातील कन्येचा जीव का घ्यावा?

नवरात्र म्हटले की सर्वत्र आईच्या भक्तीचा जागर, नऊ कन्यांच्या पूजनाचा थाट, त्यांना ओवाळण्याचा मान, भेटवस्तूंची बरसात आणि लाडाकोडांचा वर्षाव पण मनात एक प्रश्न मात्र वारंवार टोचतो ज्या कन्येमध्ये तुम्हाला नऊ दिवस देवी दिसते, तीच कन्या उर्वरित दिवस तुम्हाला नकोशी का वाटते?

ज्या हातांनी नऊ दिवस कन्येचे पाय धुऊन तिची पूजा केली जाते,त्याच समाजातील काही हात मुलगी जन्माला येण्याआधीच तिचा जीव घेण्यासाठी पुढे का सरसावतात? ज्या मुखाने 'जय माता दी'चा जयघोष होतो, त्याच घरात मुलगी जन्माला आली म्हणून नाराजी का व्यक्त केली जाते? ज्या देवीला शक्तीचे रूप मानले जाते, त्याच स्त्रीच्या अस्तित्वाला नाकारण्याची मानसिकता आजही का जिवंत आहे?

आपण स्वतःला सुशिक्षित म्हणवतो,आधुनिकतेच्या गप्पा मारतो; पण मुलगी झाली म्हणून आईचा छळ करणारे,तिला कमी लेखणारे आणि गर्भलिंगनिदानाच्या माध्यमातून स्त्रीभ्रूणहत्या करणारे लोक याच समाजात आहेत.शिक्षण वाढले, प्रगती झाली; पण स्त्रीकडे पाहण्याची विकृत मानसिकता अजूनही बदलली नाही, हीच खरी शोकांतिका आहे.प्रत्येकाला आई हवी, बहीण हवी, पत्नी हवी पण मुलगी नको?जरा विचार करा, तुमची मुलगीच उद्या दुसऱ्या घराचा संसार फुलवेल, एका कुटुंबाला आपलेपणा देईल, नात्यांना प्रेमाने जोडेल. मग तिच्या जन्माचाच तिरस्कार कशासाठी? ज्या मुलीच्या जन्माने घरात आनंद फुलू शकतो, तिच्याच अस्तित्वाला जन्माआधी संपवण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला?

एक गोष्ट लक्षात ठेवा गर्भातल्या कन्येला जन्मच दिला नाही, तर उद्या कन्यापूजनासाठी कन्या आणणार कुठून? नऊ दिवस देवीच्या चरणी नतमस्तक होण्यापेक्षा, आयुष्यभर स्त्रीच्या सन्मानासाठी उभे राहणे अधिक महत्त्वाचे नाही का?

'बेटी बचाओ, बेटी पढाओ'च्या घोषणा देऊन समाज बदलणार नाही. बदल हवा तो विचारांत, संस्कारांत आणि कृतीत! मुलगी जन्माला आली की घरात आनंद साजरा व्हायला हवा. तिला शिक्षण, स्वातंत्र्य, सुरक्षितता आणि समानतेचा अधिकार मिळायला हवा. तिच्या आईलाही मुलगी जन्माला घातल्याबद्दल अपराधी असल्यासारखे जगावे लागू नये.

या नवरात्रीत देवीसमोर एक दिवा लावताना स्वतःच्या मनातील स्त्रीद्वेषाचा अंधारही दूर करूया. कन्येच्या पायांवर डोके ठेवण्याआधी तिच्या अस्तित्वाचा आदर करायला शिकूया. कारण देवीची पूजा मंदिरात होते; पण स्त्रीचा खरा सन्मान



**श्रद्धा मंगेश कोल्हटकर,**
**डगवार,** अमरावती
मो८७६६५४०५१३




# वाचन प्रेरणा दिन : पुस्तकांच्या पलीकडे विवेकाचा शोध!

माहितीच्या महासागरात ज्ञानाचा दीप आणि मतांच्या कोलाहलात विवेकाचा आवाज बनण्याची क्षमता वाचनात आहे. म्हणून वाचन हा केवळ छंद नाही,तर व्यक्तीच्या बौद्धिक स्वातंत्र्याचा आणि समाजाच्या वैचारिक आरोग्याचा मूलाधार आहे.दरवर्षी १५ ऑक्टोबर रोजी भारताचे माजी राष्ट्रपती, थोर शास्त्रज्ञ आणि प्रेरणादायी विचारवंत डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्रात 'वाचन प्रेरणा दिन' साजरा केला जातो. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, वाचनसंस्कृतीचा विकास व्हावा आणि ज्ञानाच्या साधनेशी नव्या पिढीचे नाते अधिक दृढ व्हावे, या उद्देशाने या दिवसाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. मात्र या दिवसाचे खरे औचित्य भाषणांमध्ये, पुस्तक प्रदर्शनांमध्ये किंवा एक दिवसाच्या वाचन उपक्रमांमध्ये नसून, त्या निमित्ताने निर्माण होणाऱ्या दीर्घकालीन वाचनसंस्कृतीत आहे. वाचन प्रेरणा दिनाच्या औचित्याने आपण वाचनाचा उत्सव साजरा करतो आहोत, की वाचणारा समाज घडविण्याच्या दिशेने प्रत्यक्ष पावले टाकतो आहोत याचे चिंतन करणे गरजेचे आहे.



आज माणसाच्या हातात जग आले आहे. पण त्या जगाचा अर्थ समजून घेण्यासाठी आवश्यक असलेली विचारांची खोली त्याच्याकडे आहे का? एका स्पर्शात हजारो माहितीचे तुकडे उपलब्ध होतात. काही सेकंदांत बातम्या, मते, विश्लेषणे, छायाचित्रे आणि चित्रफिती आपल्या डोळ्यांसमोरून सरकतात. माहितीचा वेग अभूतपूर्व आहे.

डॉ.कलाम यांचे स्मरण करताना त्यांच्या ज्ञानकेंद्री जीवनदृष्टीला आपल्या दैनंदिन आचरणात स्थान देणे ही त्यांना वाहिलेली अधिक अर्थपूर्ण आदरांजली ठरेल. त्यांच्या जयंतीचा दिवस प्रत्येक विद्यार्थ्याच्या हातात पुस्तक, प्रत्येक शिक्षकाच्या अध्यापनात जिज्ञासा आणि प्रत्येक शैक्षणिक संस्थेच्या वातावरणात मुक्त विचार घेऊन आला, तर वाचन प्रेरणा दिनाचे प्रयोजन खऱ्या अर्थाने साध्य होईल.साहित्यवाचन माणसाला दुसऱ्याच्या जागी उभे राहून विचार करण्याची संधी देते. एखाद्या कथेतून वंचित व्यक्तीचे जगणे समजते, कवितेतून एखाद्या वेदनेला शब्द मिळतात, तर आत्मचरित्रातून संघर्षाचे अदृश्य पैलू समोर येतात. यामुळे सहानुभूती, संवेदनशीलता आणि मानवी संबंधांविषयीची समज विकसित होण्यास मदत होते. मात्र, वाचनामुळे पुस्तकात मांडलेला दावा कितपत विश्वासार्ह आहे, त्यामागे कोणते पुरावे आहेत, लेखक कोणत्या दृष्टिकोनातून लिहितो आणि त्याच्या युक्तिवादात कोणत्या मर्यादा आहेत, हे तपासणेही तितकेच आवश्यक आहे.

महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात ज्ञान, शिक्षण आणि विचारस्वातंत्र्य यांचा प्रश्न नेहमीच परिवर्तनाशी जोडलेला आहे. संतपरंपरेने लोकभाषेतून तत्त्वज्ञान आणि जीवनमूल्ये सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविली. आधुनिक काळातील समाजसुधारकांनी शिक्षण आणि ज्ञानप्राप्तीला सामाजिक विषमतेविरुद्धच्या संघर्षाचे महत्त्वाचे साधन बनविले.वाचनसंस्कृती समृद्ध व्हायची असेल, तर समाजातील विविध घटकांच्या अनुभवांना स्थान देणारे साहित्य वाचकांपर्यंत पोहोचले पाहिजे. दलित साहित्य, स्त्रीवादी लेखन, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य, लोकसाहित्य, विज्ञानलेखन आणि विविध भाषांतील अनुवादित साहित्य यांचे वाचन वाचकाला समाजाचे अधिक व्यापक आणि बहुआयामी चित्र समजून घेण्यास मदत करते.

आजच्या पिढीसमोर वाचनाचा प्रश्न एका नव्या स्वरूपात उभा आहे. पूर्वी पुस्तकांपर्यंत पोहोचण्याची अडचण मोठी होती, आज अनेकदा पुस्तकांसाठी वेळ आणि एकाग्रता मिळविणे हे आव्हान बनले आहे. स्मार्टफोन, समाजमाध्यमे, लघुचित्रफिती, सतत येणाऱ्या सूचना आणि वेगाने बदलणाऱ्या डिजिटल आशयामुळे आपले लक्ष अनेक दिशांनी खेचले जाते. या परिस्थितीचे विश्लेषण करताना तंत्रज्ञानाला सरसकट दोष देणे योग्य ठरणार नाही. डिजिटल माध्यमांमुळे दुर्मीळ पुस्तके उपलब्ध होऊ शकतात, ई-पुस्तकांच्या माध्यमातून दूरस्थ वाचकांपर्यंत साहित्य पोहोचू शकते, ध्वनिपुस्तकांमुळे वाचनाचे नवे मार्ग उपलब्ध होतात आणि ऑनलाइन ग्रंथालयांमुळे ज्ञानाच्या संधी वाढतात. समस्या तंत्रज्ञानाच्या अस्तित्वात नसून त्याच्या वापराच्या स्वरूपात आहे.डिजिटल युगात ही क्षमता विकसित करण्यासाठी सखोल वाचनाचे महत्त्व कमी झालेले नाही. उलट, चुकीची माहिती, दिशाभूल करणारे संदेश आणि अप्रमाणित दावे वेगाने पसरत असताना चिकित्सक वाचनाची गरज अधिक वाढली आहे.

एखादी माहिती वाचल्यावर तिचा स्रोत कोणता, तिच्या समर्थनार्थ पुरावे कोणते, इतर विश्वासार्ह स्रोत काय सांगतात आणि ती माहिती कोणत्या संदर्भात मांडली आहे, हे तपासण्याची सवय लावणे आवश्यक आहे. शालेय स्तरापासूनच विद्यार्थ्यांना तथ्य आणि मत यांतील फरक, माहितीची पडताळणी आणि तर्कशुद्ध विचार यांचे प्रशिक्षण दिले पाहिजे. मुलांना वाचनाची सवय लागावी, अशी अपेक्षा प्रत्येक पालक आणि शिक्षक व्यक्त करतो. मात्र एक महत्त्वाचा प्रश्न विचारायला हवा : मुलांच्या दैनंदिन जीवनात पुस्तकाला आनंददायी स्थान देणारे वातावरण आपण निर्माण केले आहे का? घरात अभ्यासासाठी वेळ ठरविला जातो, पण मुक्त वाचनासाठी वेळ राखून ठेवला जातोच असे नाही. पुस्तक वाचल्यानंतर त्यांना स्वतःचे मत मांडता येते का, की प्रत्येक वाचनाचा शेवट प्रश्नोत्तरांच्या सरावात होतो?

शाळांनीही ग्रंथालयाला केवळ पुस्तकसंग्रहाची जागा न मानता विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेचे केंद्र बनविले पाहिजे. दररोज काही वेळ मुक्त वाचनासाठी राखून ठेवणे, विद्यार्थ्यांना स्वतः पुस्तके निवडू देणे, पुस्तक परिचय आणि गटचर्चा आयोजित करणे, वाचलेल्या पुस्तकांविषयी लेखन करण्याच्या संधी देणे आणि शिक्षकांनी स्वतः वाचनाचा आदर्श निर्माण करणे, अशा उपायांनी शाळेतील वाचनसंस्कृती समृद्ध होऊ शकते.

समाजात वाचनसंस्कृती रुजविण्यासाठी सार्वजनिक आणि शालेय ग्रंथालयांची भूमिका अनन्यसाधारण आहे. ग्रंथालय म्हणजे शांतपणे बसून पुस्तक वाचण्याची जागा एवढाच त्याचा अर्थ नाही. ते ज्ञानापर्यंत समान प्रवेश मिळवून देणारे सार्वजनिक व्यासपीठ आहे. घरात पुस्तकांचा संग्रह नसलेल्या विद्यार्थ्याला ग्रंथालयातून अनेक विषयांचा परिचय होऊ शकतो. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या तरुणाला संदर्भसाहित्य मिळू शकते. ज्येष्ठ नागरिकाला नव्या विचारांशी जोडलेले राहता येते. महिलांना, कामगारांना, शेतकऱ्यांना आणि विविध सामाजिक घटकांना त्यांच्या गरजांनुसार ज्ञान मिळविण्याची संधी उपलब्ध होऊ शकते.

वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने शाळा-महाविद्यालयांमध्ये पुस्तक प्रदर्शन, सामूहिक वाचन, पुस्तक परिचय, वाचन स्पर्धा आणि लेखकांशी संवाद असे विविध उपक्रम आयोजित केले जातात. डॉ. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त साजरा होणारा वाचन प्रेरणा दिन आपण केवळ औपचारिकतेत घालवू नये. या दिवशी ग्रंथालयाकडे पावले वळवूया आणि वाचलेल्या विचारांवर संवाद साधूया.

**डॉ.राजेश ओं. पाटील,**
सहाय्यक ग्रंथालय संचालक,
अमरावती विभाग,
अमरावती.

## प्रासंगिक

### अंधांचे आवाहन ..!

अरे डोळस बांधवांनो -
अंधाच्या समस्यांची
ठेवा थोडी जाणिव
बंद डोळ्यांनी चालून पहा
समजेल तुम्हाला उणिव ...

दिवस असो की रात्र
आम्हाला काय त्याचे
परावलंबी जीवन
प्रारब्ध असे आमचे ...

बंधुत्वाची ठेवूनी जाण
नोकरीत द्या आम्हा स्थान
परावलंबित्व कमी करण्या
घ्याल का तुम्ही पुढाकार ...

डोळे जपा,प्राणाहून
पलीकडे
रात्रंदिन नका पाहू ,
मोबाईल गडे
मरावे परी, नेत्ररुपी उरावे
नेत्रदानाने, प्रातःस्मरणीय
ठरावे..!



**प्रा.अशोक सारडा,**
मेहकर
९४२१३९४३३९

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सखा

अकोला
जिल्हा विशेष

# पाण्याचा अपव्यय केल्यास नळजोडणी खंडित!

## काटेपूर्णा प्रकल्पात अत्यल्प जलसाठा ; मनपाचा कडक कारवाईचा इशारा

■ प्रतिनिधी | अकोला ■

यंदाच्या पावसाळ्यात अकोला जिल्ह्यासह काटेपूर्णा प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात अत्यल्प पाऊस झाल्याने प्रकल्पातील जलसाठा खालावला आहे. त्यातच शहरातील भूजल पातळीतही मोठी घट झाल्याने संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर अकोला महानगरपालिका प्रशासनाने पाणी वापराबाबत कठोर भूमिका घेतली आहे. पिण्याच्या पाण्याचा अपव्यय करताना आढळल्यास संबंधितांची नळजोडणी कोणतीही पूर्वसूचना न देता खंडित करण्यात येणार आहे.



काटेपूर्णा प्रकल्प हा अकोला शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रमुख स्रोत आहे. मात्र, यंदा पाणलोट क्षेत्रात कमी पाऊस झाल्याने महान येथील प्रकल्पात अत्यल्प पाणीसाठा शिल्लक आहे. शहरातील भूजल पातळीही नेहमीच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात खाली गेली आहे. त्यामुळे नागरिकांनी महापालिकेच्या नळाच्या पाण्यासह बोअरवेल आणि विहिरींच्या पाण्याचाही काटकसरीने वापर करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### या प्रकारांवर होणार कारवाई

नळाला तोटी नसणे, तोटी असूनही पाणी वाया घालविणे, नळाच्या पाण्याने वाहने व जनावरे धुणे तसेच घरातील अंतर्गत जलवाहिनीची गळती दुरुस्त न करणे, अशा प्रकारांची महापालिकेकडून गंभीर दखल घेतली जाणार आहे. संबंधित प्रकार आढळल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता नळजोडणी खंडित करण्याची कारवाई केली जाईल. पाणीटंचाईच्या काळात शहरातील प्रत्येक नागरिकाला पाणी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे निर्बंध लागू करण्यात येणार आहेत.

### गळतीची माहिती देण्याचे आवाहन

शहरात कुठेही जलवाहिनी फुटली असेल, नळातून पाणी गळत असेल किंवा बांधकामासाठी नळाच्या पाण्याचा वापर होत असल्याचे आढळल्यास नागरिकांनी तातडीने महापालिकेला माहिती द्यावी. यासाठी ०७२४-२४३४४१२ हा दूरध्वनी क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला आहे. माहिती देणाऱ्या नागरिकाचे नाव गोपनीय ठेवण्यात येणार असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे. संभाव्य पाणीटंचाईची तीव्रता लक्षात घेता नागरिकांनी पाण्याचा अपव्यय टाळून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

# अकोल्याच्या करण रणपिसेची शरीर सौष्ठव स्पर्धेत बाजी

■ प्रतिनिधी | अकोला ■

येथील युवा शरीरसौष्ठवपटू करण रणपिसे याने पीटीसी पोलीस प्रशिक्षण केंद्र, अकोला येथे आयोजित शरीरसौष्ठव स्पर्धेत दमदार कामगिरी करत 'ओव्हरऑल चॅम्पियन'चा किताब पटकावला. त्याच्या या यशामुळे अकोल्याच्या क्रीडा क्षेत्रात आनंद व्यक्त होत असून, करणवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

शरीरसौष्ठव स्पर्धेत यश मिळविण्यासाठी कठोर मेहनत, नियमित सराव, शिस्तबद्ध दिनचर्या आणि योग्य आहार महत्त्वाचा असतो. करणने या सर्व बाबींची सांगड घालत स्पर्धेसाठी तयारी केली. त्याच्या सातत्यपूर्ण मेहनतीचे फळ या यशाच्या रूपाने मिळाले. करणच्या या यशात प्रशिक्षक व आहारतज्ज्ञ राज मिश्रा यांचे मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरले. प्रशिक्षणासोबतच आहार नियोजन, शरीराची पुनर्प्राप्ती आणि रंगमंचावरील सादरीकरणावर विशेष लक्ष देण्यात आले. नियोजनबद्ध तयारीच्या बळावर करणने स्पर्धेत आपली छाप पाडली.



'ओव्हरऑल चॅम्पियन'चा किताब पटकावला; प्रशिक्षक राज मिश्रा यांच्या मार्गदर्शनाचा ठसा

करणच्या यशाबद्दल प्रशिक्षक राज मिश्रा यांनी समाधान व्यक्त केले. खेळाडूच्या मेहनतीला यश मिळताना पाहणे ही प्रशिक्षकासाठी अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. करणच्या या कामगिरीमुळे अकोल्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, त्याच्या यशातून नवोदित शरीरसौष्ठवपटूंना प्रेरणा मिळणार आहे. आगामी स्पर्धांमध्येही करण अशीच उल्लेखनीय कामगिरी करेल, अशी अपेक्षा क्रीडाप्रेमींकडून व्यक्त होत आहे.

# अ भा मराठी नाट्य परिषद, अकोला शाखेची निवडणूक बिनविरोध संपन्न



■ प्रतिनिधी | अकोला ■

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, अकोला शाखेची पंचवार्षिक निवडणूक सीताबाई कला महाविद्यालय येथे उत्साहपूर्ण वातावरणात बिनविरोध संपन्न झाली. शाखेची १९ सदस्यीय कार्यकारिणी गठित करण्यात आली. एकूण १९ अर्ज प्राप्त झाल्याने सर्व उमेदवारांची बिनविरोध निवड झाली. नवनिर्वाचित कार्यकारिणी पुढील पाच वर्षे अकोला शाखेचे कामकाज पाहणार आहे.या निवडणुकीसाठी प्रायोगिक रंगभूमी, मुंबईचे अध्यक्ष तसेच नियामक मंडळ सदस्य दिलीप दळवी यांनी निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहिले तर गोपाल सुरे यांनी सहायक निवडणूक अधिकारी म्हणून संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पार पाडली. निवडणुकीनंतर सर्व नवनिर्वाचित सदस्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली.नवनिर्वाचित कार्यकारिणीत सदस्य म्हणतात रमाकांत खेतान,शशी जोशी,अभिजीत परांजपे,डॉ. दिलीप इंगोले,विजय देशमुख, आदींचा समावेश आहे.

# कोठ्याच्या रोशन अहेरकर यांना राज्यस्तरीय युवा जीवन गौरव पुरस्कार

**आधुनिक शेती, जैविक खतनिर्मिती आणि शेतकऱ्यांना मोफत मार्गदर्शनाची दखल**

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

आधुनिक शेतीत नवनवीन प्रयोग, जैविक खतनिर्मिती, शेळीपालन आणि डिजिटल माध्यमातून शेतकऱ्यांना मोफत मार्गदर्शन करणारे कोठा येथील युवा शेतकरी रोशन अरविंद अहेरकर यांना राज्यस्तरीय युवा जीवन गौरव पुरस्कार २०२६ प्रदान करण्यात आला. त्यांच्या कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत गाडगे बाबा सामाजिक प्रतिष्ठान (महाराष्ट्र राज्य) यांच्या वतीने त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.



शेतीला सुरुवात केल्यानंतर शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने अहेरकर यांनी यूट्यूब चॅनल सुरू केले. पेरणीपासून काढणीपर्यंतचे नियोजन, खत व्यवस्थापन, कीड-रोग नियंत्रण आणि आधुनिक शेती पद्धतींची माहिती ते मोफत देतात. तसेच गांडूळखत, जीवामृत आदी जैविक निविष्ठांचा वापर आणि शेतीपूरक शेळीपालनातून त्यांनी प्रयोगशील शेतीचा आदर्श निर्माण केला आहे.

६ ऑक्टोबर रोजी अकोला येथील आय.एम.ए. हॉलमध्ये झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते होते. माजी उपमहापौर निखिल दिवेकर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. या सन्मानाबद्दल रोशन अहेरकर यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# गरबा स्पर्धेत विजेत्यांचा सत्कार

**अकोला :** तुषार डान्स इन्स्टिट्यूट अँड झुंबा फिटनेस अकोला यांच्या वतीने आयोजित गरबा कॉम्पिटिशन २०२६ चा बक्षीस वितरण समारंभ मंगळवार, दि. १३ ऑक्टोबर २०२६ रोजी मोठ्या उत्साहात पार पडला.संघवी वाडी, अंकित बॅग हाऊसच्या मागे, न्यू राधाकिसन प्लॉट, अकोला येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे आयोजन तुषार इचे यांनी केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राप्ती शर्मा यांनी केले.

# जिल्ह्याबाहेरील पशुधनाला चराईसाठी संपूर्ण बंदी

**उल्लंघन केल्यास फौजदारी कारवाई; जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश**

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला जिल्ह्याबाहेरील किंवा इतर राज्यातील कोणत्याही पशुधनाला अकोला जिल्ह्यातील वनक्षेत्र, गायरान किंवा सार्वजनिक जमिनीवर चराईसाठी आणण्यास तातडीने आणि संपूर्ण प्रतिबंध (बंदी) घालण्यात आला आहे. तसे होत असल्याचे आढळल्यास फौजदारी कारवाई करण्याचा इशारा जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिला आहे.

यासंबंधीचा आदेश जिल्हाधिका-यांनी आज निर्गमित केला. चालू वर्षाच्या खरीप हंगामात कमी पर्जन्यमानामुळे अकोला जिल्ह्यातील सर्व सातही तालुक्यांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील स्थानिक पशुधनाचा चारा वाचवण्यासाठी जिल्हा प्रशासनाने मोठा निर्णय घेतला आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाने प्रसिद्ध केलेल्या अधिकृत आदेशानुसार, अकोला जिल्ह्यात सध्या एकूण ३ लाख ८४ हजार ८३ स्थानिक पशुधन उपलब्ध आहे. खरीप पेरा, पशुसंवर्धन विभागाचे वैरण वाटप आणि वन विभागाकडून मिळणारा सध्याचा एकूण चारा लक्षात घेता, हा उपलब्ध साठा जिल्ह्यातील स्थानिक जनावरांना केवळ माहे जानेवारी २०२७ पर्यंतच पुरण्याची शक्यता पशुसंवर्धन विभागाच्या अहवालात वर्तवण्यात आली आहे. यामुळे भविष्यात तीव्र चारा टंचाई निर्माण होऊ नये म्हणून ही बंदी घालण्यात आली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी जारी केलेल्या आदेशानुसार, जिल्ह्याच्या सीमाक्षेत्रातील सर्व तालुक्यातील वनक्षेत्र आणि गायरान जमिनीवर बाहेरील जिल्ह्यातील किंवा इतर राज्यातील शेळ्या, मेंढ्या, गायी, म्हशी, उंट, घोडे व इतर कोणत्याही पशुधनाला चराईसाठी आणता येणार नाही. याशिवाय अकोला जिल्ह्यातील स्थानिक शेतकऱ्यांनी देखील इतर जिल्ह्यातील पशुधनाला चारा उपलब्ध करून देऊ नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

हा आदेश आज, दिनांक १४ ऑक्टोबरपासून ते पुढील टंचाई कालावधी संपेपर्यंत संपूर्ण जिल्ह्यात लागू राहील. या आदेशाचे उल्लंघन करून बाहेरील जिल्ह्यातील पशुधन चराईसाठी अकोला जिल्ह्यात आणल्यास संबंधित पशुपालकाविरुद्ध थेट कायदेशीर कारवाई केली जाईल.

# प्रतिबंधित मार्गावरील अतिक्रमणांवर मनपाचा हातोडा!

**हुतात्मा स्मारक ते संत तुकाराम चौकादरम्यान हातगाड्या, बॅनर, फलके आणि शेड हटविले**



■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील प्रतिबंधित मार्गांवरील अतिक्रमण हटविण्याची मोहीम अकोला महानगरपालिकेने सुरू ठेवली आहे. बुधवारी (१४ ऑक्टोबर) दक्षिण झोनअंतर्गत हुतात्मा स्मारक चौक ते संत तुकाराम चौकादरम्यानच्या रस्त्यावरील अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली. या मोहिमेत हातगाड्या, बॅनर, फलके आणि शेड हटविण्यात आले.

मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशानुसार आणि उपायुक्त गणेश शहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. प्रतिबंधित मार्गांवरील अतिक्रमणांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाकडून ही मोहीम राबविण्यात येत आहे.

या कारवाईत सहायक अतिक्रमण अधिकारी प्रवीण मिश्रा, चंद्रशेखर इंगळे, पथकप्रमुख मनीष भोबळे, स्वप्नील पवार, कुणाल शाहू, योगेश देवकते, आदित्य माहूलकर, निलेश तायडे, सै. अजहर, तुषार गांधे आणि यश घोडे यांच्यासह अतिक्रमण निर्मूलन पथकातील कर्मचारी सहभागी झाले होते.

# 'सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज २०२६'

## उत्कृष्ट संकल्पनांना भरघोस बक्षीसे

■ प्रतिनिधी | अकोला ■

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागातर्फे 'सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज २०२६' या नवोपक्रम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, विविध १० क्षेत्रांतील नाविन्यपूर्ण कल्पना सुचवणाऱ्या ५० विजेत्यांना तब्बल ५ कोटी रुपयांची एकूण बक्षीस रक्कम दिली जाणार आहे.

सेवा संकल्प अभियानात नवनवे उपक्रम हाती घेण्यात आले असून, या स्पर्धेत अधिकाधिक युवकांनी सहभागी होण्याचे आवाहन सहायक आयुक्त प्रफुल्ल शेळके यांनी केले आहे. राज्यातील प्रत्यक्ष सामाजिक आणि प्रशासकीय समस्यांवर तंत्रज्ञानाधारित व्यावहारिक उपाय व नवकल्पना शोधणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश असून, राज्यातील सर्व शालेय विद्यार्थ्यांनीही यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. या स्पर्धेमध्ये प्रामुख्याने कृषी क्षेत्र, आरोग्य आणि वैद्यकीय सेवा, कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक वाहतूक आणि वाहतूक कोंडी, शिक्षण आणि कौशल्य विकास, सायबर सुरक्षा आणि महिला सुरक्षा, पाणी पुरवठा आणि जलसंधारण, ऊर्जा आणि नवीकरणीय ऊर्जा, सुशासन आणि डिजिटल नागरिक सेवा तसेच पर्यटन, संस्कृती आणि स्थानिक हस्तकला अशा १० महत्त्वाच्या क्षेत्रांचा समावेश करण्यात आला असून प्रत्येक क्षेत्रात ५ उपविषय देण्यात आले आहेत.

या सर्व क्षेत्रांमधून एकूण ५० सर्वोत्तम विजेत्यांची निवड केली जाणार असून, प्रत्येक विजेत्याला प्रत्येकी १० लाख रुपयांचे आकर्षक पारितोषिक देऊन गौरविण्यात येणार आहे. या अभिनव स्पर्धेत नाविन्यपूर्ण कल्पना किंवा प्रोटोटाईप असणारे विद्यार्थी आणि तरुण संशोधक, महाराष्ट्रातील नोंदणीकृत प्राथमिक टप्प्यातील स्टार्टअप्स, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग म्हणजेच एमएसएमई आणि समाजोपयोगी शोध लावणारे वैयक्तिक नागरिक सहभागी होऊ शकतात. या संपूर्ण स्पर्धेमध्ये राज्यातील महिला आणि युवा नवोन्मेषकांच्या स्टार्टअप परिसंस्थेला पुढे आणण्यासाठी प्रशासनाकडून विशेष प्राधान्य दिले जाणार आहे.

# सराफ बाजार नवदुर्गा मंडळात हरसिद्धी माता झाकी

**अकोला :** गेल्या ४८ वर्षांत पोहोचलेल्या स्थानिक सराफ बाजार नवदुर्गा उत्सव मंडळात स्थापन करण्यात आलेल्या बावन शक्तीपीठांपैकी एक असलेल्या उज्जैनच्या हरसिद्धी मातेच्या दर्शनासाठी भक्तांची गर्दी वाढत आहे. यावेळी उज्जैनच्या महाकाळाची विहंगम झाकीही निर्माण करण्यात आली असून ती पाहण्यासाठीही भक्तांची गर्दी होत आहे. महानगरात प्रथमच या देवीच्या झाकीची मंडळात स्थापना करण्यात आली आहे.नवरात्रोत्सवात दररोज रात्री ७:३० वाजता मंडळाच्या वतीने अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सव उपक्रमात नुकतेच माहेश्वरी सुंदरकांड समितीच्यावतीने भक्तिमय सामूहिक सुंदरकांड सादर करण्यात आले. मंडळाचा हा १२८३ वा सुंदरकांड कार्यक्रम आहे.

# मुंगीलालच्या गरबा महोत्सवात साकारली कृष्ण रास ची भक्तीमय ऊर्जा

**अकोला :** श्री गुजराती सेवा समितीचा मुंगीलाल बाजोरिया विद्यालय प्रांगणात सुरू असलेल्या गरबा महोत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.यातील कुटुंबातील सदस्य समवेत खेळला जाणारा सामूहिक कपल गरबा प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत आहे.या उत्सवात एका महीला भक्ताने आकर्षक अशी कृष्णमूर्ती आणून गरब्याचे वातावरणात भक्तिमय केले.कृष्णमूर्तीची समितीच्या वतीने पूजा अर्चना करीत कृष्णमूर्ती समवेत जल्लोषपूर्ण गरबा खेळण्यात आला.महिला व समितीचे अध्यक्ष वालजीभाई पटेल,वरिष्ठ उपाध्यक्ष हरीश लाखाणी,हेमेन्द्र राजगुरू,मनोज भीमजियानी, दीनूभाई सोनी,आशीष वखारिया,अरविंद पटेल,कपिल ठक्कर,शीतलबेन रुपारेल,अनिशाबेन वखारिया आदींनी कृष्ण प्रतिमेला समोर ठेवून फेर धरीत सामूहिक गरबा उत्सव साजरा केला.या उपक्रमामुळे गरबा प्रांगणात महीला पुरुषात भक्तिमय ऊर्जा व चैतन्य निर्माण होऊन वातावरण भक्तिमय झाले.

**जाहीर सुचना**

दि. १४.१०.२०२६

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते कि, आमचे पक्षकार, हे साहेबराव गणपत अहिर यांचे मालकीचे व ताब्यातील मौजे हिंगणा, म्हैसपुर, ता. जि अकोला येथील शेत सर्व्हे/गट क्र ८, मधील, ०.८७ हे आर, सालीम जमीन, ज्यास चतु:सिमा पूर्वेस :- म्हैसने यांचे लेआऊट व शुभम अग्रवाल यांचे लेआऊट, पश्चिमेस:- श्री. दिलीप गणपत अहिर यांचे शेत, उत्तरेस:- संतोष सदाशिव शेगोकर यांचे शेत, दक्षिणेस:- बाजोरीया यांचे लेआऊट, अशी मालमत्ता विकत घेत आहेत, व तसा करार झालेला आहे.

तरी सदरच्या वर उल्लेखीत मालमत्ते बाबत कोणाचा कोणत्याहि प्रकारचा हक्क, संबंध, गहाण, अगर बोजा असल्यास, किंवा काही हीतसंबंध असल्यास, खालील पत्त्यावर कागद पत्रा सहित, आज पासुन सात (७) दिवसांचे आत भेटावे, अन्यथा कोणाचा कोणत्याहि प्रकारचा उजर चालणार नाहि याचि कृपया नोंद घ्यावि.

**शिशिर अरविंद देशपांडे**
अधिवक्ता, दिवाणी न्यायालयासमोर,
स्टेशन रोड, अकोला
मोबाईल क्र ९८२३०९१३७७

जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३०३**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

**चौकशीची जाहिर नोटीस**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- ६०३/२०२६ कलम २२ — नेमता तारिख :- १६/११/२०२६

**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक:-** श्रीराम संस्थान माळी पंच मंडळ, वाडेगाव, ता.बाळापुर जि.अकोला.
नोदणी क्रमांक. ए. १७५३
**अर्जदार :** श्री. अरूण तुकाराम हुसे मु.पो. वाडेगाव, ता. बाळापुर जि. अकोला.

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, धर्मादाय उपआयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम २२/ अन्वये खालील मुद्द्यावर चौकशी करणार आहेत.

२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
अ) जंगम मिळकत (वर्णन) :- **काहि नाहि**
आ) स्थावर मिळकत (वर्णन):- १) दि.२४/०७/२०२५ रोजीच्या खरेदीखतादवारे प्राप्त स्थावर मालमत्तेची नोंद करण्यात बाबत. सर्व्हे नं. ३६९ / ३ गट न. १३६६ क्षेत्र हे आर २.५६ पो.ख. ००२, हिस्सा हे आर ०.४०, भो-वर्ग १.
चतुः सिमा :- पुर्वेस :- नाला. पश्चिमेस :- विष्णु मानकर यांची जमिन उत्तरेस :- रोड.
दक्षिणेस :- शांताबाई वक्टे यांची जमिन सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.ही नोटिस माझे सहीनिशी व मा.धर्मादाय उप आयुक्त अकोला यांचे शिक्कयानीशी आज दिनांक १३.१०.२०२६ रोजी दिली.

शिक्का
**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

**जाहीर नोटीस**
**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६८५/२०२६ — प्रोसेस नं.१२६७५/२०२६
चौ.ता. २१/११/२०२६ — दिनांक : ०५/१०/२०२६

**अर्जदार :** १. जयश्री कमलेश पंचमिया रा. २०२, रेगल पॅलेस, २२/१४, वाय.एन. रोड, इंदौर, वल्लभनगर. इंदौर एम. पी. २. अवनी प्रशांत कोठारी रा. प्लॉट नं. ९७, सीएचएमएस हॉस्पिटल जवळ, बजाज नगर, नागपूर. ता. जि. नागपूर. ३. अमरिश तनसुख पारेख रा. दमयंती निवास, पहिला माळा, अमृतवाडी जवळ, न्यु राधाकिसन प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला. ४. अमी क्षितीज मोदी रा. डी—२३२–२३४, मोदी- छाया, सेक्टर ५, देवेंद्र नगर, रायपूर, ता. जि. रायपूर, छत्तीसगढ.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : तनसुख हिम्मतलाल पारेख
**पत्ता :-** रा. अमृतवाडी जवळ, न्यु राधाकिसन प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत तनसुख हिम्मतलाल पारेख यांचे दि. २४/०४/२०२६ रोजी अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २१/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**
**वि.०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १७०८/२०२६ — प्रोसेस नं.१३०५०/२०२६
चौ.ता. २१/११/२०२६ — दिनांक : १२/१०/२०२६

**अर्जदार :** १. विजय प्रकाश निधाने रा. शिवाजी नगर, जुने शहर, वाल्मीकी चौक, अकोला. ता. जि. अकोला. २. अरूणा कन्हैय्या करोसिया लग्नाआधीचे नाव - अरूणा प्रकाश निधाने रा. पोलीस मुख्यालय, जळगाव. ३. लता राम टाक लग्नाआधीचे नाव लता प्रकाश निधाने रा. मुनिसिपल पार्क जवळ, मेथाजी मडा, भुसावळ, जळगाव ४. लक्ष्मी विनोद टाक लग्नाआधीचे नाव लक्ष्मी प्रकाश निधाने रा. सावकार रोड, टी. एस. झोप शाळेजवळ, मुनिसिपल पार्क, भुसावळ, ता. भुसावळ, जि. जळगाव. ५. नरेश प्रकाश निधाने रा. शिवाजी नगर, जुने शहर, वाल्मीकी चौक, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : पार्वती प्रकाश निधाने
**पत्ता :-** रा. शिवाजी नगर, जुने शहर, वाल्मीकी चौक, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत पार्वती प्रकाश निधाने यांचे दि. २७/१०/२०२० रोजी न्यु ग्लोबल हॉस्पिटल व क्रिटीकल केअर सेंटर, सिव्हिल लाइन, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २१/११/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १२/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# शेतकऱ्यांचे पाण्यासाठी आंदोलन, कालव्यातून मात्र पाण्याची नासाडी

## बोरधरणाच्या कालव्यांची दुरवस्था चव्हाट्यावर;नादुरुस्त गेट्समुळे पाणी थेट नाल्यात पाटबंधारे विभागाच्या कारभारावर शेतकऱ्यांचे प्रश्नचिन्ह

**सेलू /अभय बेदमोहता**

एकीकडे पाण्याच्या प्रत्येक थेंबासाठी शेतकऱ्यांना संघर्ष करावा लागत आहे. पिके वाचवण्यासाठी आंदोलनाचा इशारा द्यावा लागत आहे. दुसरीकडे बोरधरणाच्या कालव्यातून सोडलेले पाणी नादुरुस्त गेट्स आणि देखभालीअभावी थेट नाल्यात वाहून जात असल्याची गंभीर बाब सेलू तालुक्यात समोर आली आहे. पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन करणाऱ्या प्रशासनाच्या यंत्रणेलाच पाण्याची नासाडी रोखता येत नसेल, तर पाणी नियोजनाचे नेमके चालले तरी काय, असा प्रश्न शेतकरी उपस्थित करीत आहेत.

बोरधरणातून सेलू तालुक्यातील शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहोचविणाऱ्या पाटचाऱ्या आणि मायनरची अवस्था अत्यंत खराब झाल्याचा शेतकऱ्यांचा आरोप आहे. अनेक ठिकाणी कालव्यांमध्ये गवत,



झाडेझुडपे वाढली आहेत. नियमित देखभाल आणि स्वच्छतेअभावी पाण्याचा प्रवाह अडथळ्यांतून मार्ग काढत पुढे सरकत आहे. त्यातच कालव्यांवरील पाणी नियंत्रित करणारे गेट्स नादुरुस्त झाल्याने पाण्याचा विसर्ग नियंत्रणाबाहेर जात असल्याचे चित्र आहे.

काही ठिकाणी गेट्सचे खांब आणि लोखंडी फळ्या खराब झाल्यामुळे पाणी योग्य दिशेने वळविण्यात अडचणी निर्माण होत आहेत. परिणामी, शेतात पोहोचायला हवे असलेले पाणी नाल्यात वाहून जात असल्याचा आरोप होत आहे. ही परिस्थिती कायम राहिली, तर कालव्याच्या सुरुवातीच्या भागातील शेतकऱ्यांना पाणी मिळेल; मात्र शेवटच्या टोकावरील शेतकऱ्यांच्या वाट्याला प्रतीक्षाच येईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

कुमारअप्पा पाणीपुरवठा वापर संस्थेचे अध्यक्ष मुकिंदा खोडे यांच्या म्हणण्यानुसार, कालव्यातून सोडलेले पाणी सेलडोहपर्यंत पोहोचण्यासाठी आठ दिवसांचा कालावधी लागू शकतो. एवढा वेळ लागूनही शेवटच्या टोकावरील शेतकऱ्यांना पुरेसे पाणी मिळेलच, याची खात्री नसल्याचे त्यांनी नमूद केले.पाण्याची गरज असताना वितरणासाठी आठ दिवस प्रतीक्षा करावी लागत असेल, तर पीक जगविण्याचे नियोजन शेतकऱ्यांनी करायचे तरी कसे? कालव्यातील अडथळे दूर करणे, गेट्सची दुरुस्ती करणे आणि पाण्याचे योग्य नियोजन करणे ही जबाबदारी नेमकी कोणाची, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

दरवर्षी पाटचाऱ्या आणि मायनरच्या दुरुस्ती व देखभालीसाठी लाखो रुपये खर्च होत असल्याचे सांगितले जाते. मात्र, प्रत्यक्षात कालव्यांची दुरवस्था कायम असेल, गेट्स नादुरुस्त असतील आणि पाणी नाल्यात वाहून जात असेल, तर या कामांच्या गुणवत्तेची तपासणी होणे आवश्यक आहे. दुरुस्तीसाठी खर्च झालेल्या निधीचा तपशील,करण्यात आलेल्या कामांची माहिती आणि त्यांची सद्यस्थिती प्रशासनाने जाहीर करावी, अशी मागणी शेतकरी करीत आहेत.केवळ कागदोपत्री दुरुस्ती दाखवून प्रश्न सुटणार नाही. प्रत्यक्ष कालव्यांमध्ये पाणी सुरळीत वाहते का, गेट्स व्यवस्थित काम करतात का आणि शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत पाणी पोहोचते का, याची जबाबदारी निश्चित करावी लागेल.

सेलू, केळकर, सेलडोह आणि परिसरातील शेतकऱ्यांसमोर पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. पिके वाचविण्यासाठी शेतकऱ्यांना पाण्याची मागणी करावी लागत असताना उपलब्ध पाण्याची नासाडी होणे ही चिंतेची बाब आहे. एका बाजूला पाणीटंचाईची भीती आणि दुसऱ्या बाजूला वितरण व्यवस्थेतील त्रुटींमुळे होणारा अपव्यय, या विरोधाभासामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढत आहे.

पाटबंधारे विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने प्रत्यक्ष पाहणी करावी. नादुरुस्त गेट्सची दुरुस्ती करावी, पाटचाऱ्यांतील गवत व झाडेझुडपे काढावीत आणि पाणी शेवटच्या टोकापर्यंत पोहोचेल, असे नियोजन करावे. तसेच दुरुस्तीच्या कामांची चौकशी करून पाण्याची नासाडी रोखण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे. अन्यथा, पाण्यासाठी आधीच संघर्ष करणाऱ्या शेतकऱ्यांचा रोष तीव्र होण्याची शक्यता आहे. प्रशासनाने वेळीच लक्ष न दिल्यास शेतकऱ्यांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. प्रश्न पाण्याच्या उपलब्धतेचा नाही, तर उपलब्ध पाणी योग्य पद्धतीने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचा आहे. कालव्यातून पाणी नाल्यात वाहत असेल, तर पाणी नियोजनाच्या दाव्यांचा उपयोग काय याचे उत्तर पाटबंधारे विभागाने द्यावे.

# गुन्हेगारांवर वचक ठेवा, तपासात दिरंगाई नको

## वर्धा पोलिसांच्या मासिक गुन्हे आढावा बैठकीत अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांचे स्पष्ट निर्देश



**वर्धा/जनमाध्यम**

जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासोबतच गुन्हेगारांवर कठोर कारवाई करा, गंभीर गुन्ह्यांच्या तपासात दिरंगाई खपवून घेऊ नका आणि दोषारोपपत्रे विहित मुदतीत न्यायालयात सादर करा, असे स्पष्ट निर्देश पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी दिले. अपघाती मृत्यूंचे प्रमाण कमी करण्यासाठी शास्त्रीय पद्धतीने तपास करण्यासह अवैध धंदे, वाहन चोरी, चेन स्नॅचिंग आणि अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात प्रभावी कारवाई करण्यावरही त्यांनी भर दिला.

वर्धा जिल्हा पोलीस दलाची सप्टेंबर महिन्याची मासिक गुन्हे आढावा बैठक १३ ऑक्टोबर रोजी पोलीस अधीक्षक कार्यालयात पार पडली. अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत जिल्ह्यातील गुन्हेगारी परिस्थिती, आगामी सण-उत्सव, राजकीय व सामाजिक आंदोलने, सायबर गुन्हे आणि पोलीस प्रशासनाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर वर्धा शहरचे पोलीस निरीक्षक चतरकर यांनी सादरीकरणातून सुरक्षा व्यवस्थेची माहिती दिली. जिल्ह्यात एकूण १,२५६ देवींची प्रतिष्ठापना करण्यात आली असून, उत्सव काळात कायदा व सुव्यवस्था राखण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर होते. वाहतूक नियोजन, ध्वनिप्रदूषण नियंत्रण आणि देवी मंडळांमधील संभाव्य गैरसमज टाळण्यासाठी विशेष खबरदारी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या.प्रत्येक मंडळाशी समन्वय राखण्यासाठी जबाबदार पोलीस अधिकारी नियुक्त करून विशेष व्हॉट्सॲप समूह तयार करण्यात आला आहे. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस अंमलदारांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्याचेही नियोजन आहे.

**ऑक्टोबर महिन्यात १ ते ३१ तारखेपर्यंत सायबर जनजागृती महिना राबविण्यात येत आहे.**

गुन्ह्यांचा तपास आणि न्यायालयीन प्रक्रिया प्रभावी करण्यासाठी पोलीस अधीक्षक अग्रवाल यांनी महत्त्वाच्या सूचना दिल्या. दोषारोपपत्रे विहित मुदतीत न्यायालयात दाखल करावीत.गुन्हे नियंत्रणासोबतच पोलीस दलातील अंतर्गत वातावरण आणि कर्मचाऱ्यांच्या कल्याणावरही बैठकीत भर देण्यात आला. पोलीस ठाण्यांमधील वातावरण तणावमुक्त आणि सकारात्मक ठेवावे. अधिकाऱ्यांनी पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांशी नियमित संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी समजून घ्याव्यात, अशा सूचना देण्यात आल्या.बैठकीला जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा, सायबर पोलीस ठाणे, विशेष शाखा आणि इतर संबंधित शाखांचे अधिकारी उपस्थित होते. आढावा बैठकीनंतर पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल आणि अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांनी उपस्थित अधिकारी व अंमलदारांसोबत स्नेहभोजन केले.

# वर्धा येथील आकाशात जैवविविधतेचा रंगोत्सव

## ‘वाईल्ड बर्ड डे’ निमित्त ९५ पक्षी प्रजातींची नोंद; दुर्मिळ आणि स्थलांतरित पक्ष्यांचे दर्शन

**वर्धा/जनमाध्यम**



निसर्गाचा समतोल राखणाऱ्या पक्ष्यांच्या वैविध्याने वर्धा जिल्हा समृद्ध असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. जागतिक ‘वाईल्ड बर्ड डे’ निमित्त १० ऑक्टोबर रोजी जिल्ह्यात विविध ठिकाणी करण्यात आलेल्या पक्षी सर्वेक्षणात तब्बल ९५ प्रजातींची नोंद झाली. पक्षी अभ्यासक आणि वन्यजीव छायाचित्रकार राहुल वकारे यांनी या उपक्रमात सहभाग घेतला. सर्वेक्षणातील माहिती आंतरराष्ट्रीय पक्षी निरीक्षण मंच ई-बर्डवर अपलोड करण्यात आली.

नवीन मोहन नगर, येळाकेळी, जामणी, मदन धरण, बोरखेडी तलाव, माळेगाव ठेका, आमगाव, रायपूर, रिधोरा धरण, सोंडी, सालई आणि बोरधरण परिसरात पक्षी निरीक्षण करण्यात आले. यात नदी सुरय या असुरक्षित श्रेणीतील, तर भारतीय नीलपंख, तांबूस शेपटीचा चंडोल आणि पांढऱ्या मानेचा करकोचा या संकटसमीप श्रेणीतील पक्ष्यांची नोंद झाली.तपकिरी खाटिक, काळा थिरथिरा, हिरवट वटवट्या यांसारख्या स्थलांतरित पक्ष्यांसह युरोपियन नीलपंख आणि सामान्य कोकीळ यांचेही दर्शन झाले. राष्ट्रीय पक्षी मोर आणि महाराष्ट्राचा राज्यपक्षी पिवळ्या पायाची हरोळी यांची नोंदही लक्षवेधी ठरली.

अधिवास वाचवा, पक्षी जगवा जलस्त्रोतांचे प्रदूषण,वृक्षतोड आणि गवताळ प्रदेशांचा ऱ्हास यामुळे पक्ष्यांच्या अस्तित्वापुढे आव्हाने उभी राहत आहेत. पक्ष्यांचे नैसर्गिक अधिवास जपणे,जैवविविधतेचे संरक्षण करणे आणि नागरिकांनी पक्षी निरीक्षणात सहभागी होणे, ही काळाची गरज असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

# महिलांना सवलतीऐवजी अडचणींचा प्रवास

## एनसीएमसी कार्डाऐवजी थेट सवलतीची मागणी

**वर्धा/जनमाध्यम**

महिलांना आणि दिव्यांगांना एसटी प्रवासात सवलत मिळावी, यासाठी सुरू केलेली एनसीएमसी कार्ड व्यवस्था ग्रामीण भागातील प्रवाशांसाठी त्रासदायक ठरत असल्याचा मुद्दा महाराष्ट्र स्त्रीमुक्ती परिषदेने उपस्थित केला आहे. या समस्यांसह बसस्थानकांवरील सुविधांच्या प्रश्नांबाबत १३ ऑक्टोबर रोजी संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

परिषदेने २०२४-२५ मध्ये राज्यातील बसस्थानकांचे सुरक्षा परीक्षण केले होते. मात्र, अनेक ठिकाणी रात्रीच्या वेळी अंधार, पिण्याच्या पाण्याचा अभाव, स्वच्छतागृहांची दुरवस्था, दिव्यांगांसाठी अपुऱ्या सुविधा आणि बंद अवस्थेतील हिरकणी कक्ष अशा समस्या कायम असल्याचे निवेदनात नमूद केले. महिला प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी रात्रीच्या वेळी महिला पोलिसांची नियुक्ती करण्याची मागणीही करण्यात आली.



एनसीएमसी कार्ड काढताना ग्रामीण महिला, वृद्ध आणि दिव्यांगांना अडचणी येत आहेत. सर्व्हर बंद, मशीनमधील बिघाड आणि कार्ड असूनही सवलत नाकारण्याच्या प्रकारांमुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे. त्यामुळे कार्डाची सक्ती थांबवून महिलांना व दिव्यांगांना थेट सवलत द्यावी, अशी मागणी करण्यात आली.दरम्यान, दिल्लीतील जंतर-मंतर येथे निवडणूक आयुक्त आणि मतचोरीच्या मुद्द्यावर सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान होणाऱ्या हिंसेच्या निषेधार्थही निवेदन देण्यात आले. यावेळी प्रा. नूतन माळवी, पद्मा तायडे, मीना नेवारे आणि शाळकरी विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

## संगीता खापर्डे यांचे निधन



**वर्धा** - म्हाडा कॉलनी, सेवाग्राम रोड येथील रहिवासी तथा कस्तुरबा गांधी रुग्णालयात स्टाफ नर्स म्हणून कार्यरत संगीता ˊ हर्षवर्धन खापर्डे (वय ४५) यांचे १३ ऑक्टोबर रोजी हृदयविकाराने आकस्मिक निधन झाले. त्या सामाजिक क्षेत्रासह आंबेडकरी चळवळीत सक्रिय होत्या. त्यांच्या पश्चात पती हर्षवर्धन खापर्डे मुलगा तनिष रशियात एमबीबीएसचे शिक्षण घेत आहे. १५ ऑक्टोबर रोजी अंत्ययात्रा निघणार आहे.

## संक्षिप्त

### आनंदनगरमधील वृद्ध बेपत्ता

**वर्धा** - शहरातील आनंदनगर परिसरातील ६३ वर्षीय वृद्ध बेपत्ता झाल्याची तक्रार वर्धा शहर पोलिसांत दाखल करण्यात आली आहे. वृद्धाच्या मुलाने अज्ञात व्यक्तीने त्यांना नेले असावे, असा संशय व्यक्त केला आहे.तक्रारीनुसार, १३ ऑक्टोबर रोजी सकाळी वृद्ध घरातून बाहेर पडले. ते पटेल चौक परिसरात जात असत; मात्र सायंकाळपर्यंत घरी परतले नाहीत. नातेवाइकांनी परिसरात शोध घेतला, परंतु त्यांचा ठावठिकाणा लागला नाही. यापूर्वी ते कोणालाही न सांगता बाहेर गेले नव्हते, असे तक्रारीत नमूद आहे.वर्धा शहर पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम १४०(३) अन्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

### फरशीच्या तुकड्याने डोक्यावर वार

**पुलगाव** - येथील आठवडी बाजार परिसरात झालेल्या वादातून तरुणाला शिवीगाळ करून मारहाण करण्यात आली. यावेळी फरशीच्या तुकड्याने डोक्यावर वार केल्याने तो जखमी झाला. याप्रकरणी पुलगाव पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला.स्वप्नील ताराचंद वाघमारे यांच्या तक्रारीनुसार, १२ ऑक्टोबर रोजी रात्री अकराच्या सुमारास ते मित्रासोबत आठवडी बाजारातील स्तंभाजवळ बसले होते. त्यावेळी आदेश मेश्राम आणि आशीष मेश्राम तेथे आले. आदेशने शिवीगाळ सुरू केली. त्याला विरोध केला असता हाताने मारहाण करण्यात आली. त्यानंतर आशीषने फरशीच्या तुकड्याने डोक्यावर वार केला. यात स्वप्नील जखमी झाला.मित्र आणि भावाने मध्यस्थी करून त्याला सोडविले. त्यानंतर स्वप्नीलने पोलिसांत तक्रार दिली. पुलगाव पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.

### हिंगणघाटमध्ये मुख्याध्यापकाचा मृत्यू

**हिंगणघाट** - शहरातील संत ज्ञानेश्वर वार्डात एका खासगी शाळेच्या मुख्याध्यापकाचा बाथरूममध्ये मृतावस्थेत आढळून आल्याने खळबळ उडाली. राजू भरणोरकर (वय ५८) असे मृतकाचे नाव आहे. ते समुद्रपूर तालुक्यातील डोंगरगाव येथील रहिवासी असून सध्या हिंगणघाट येथे वास्तव्यास होते.१३ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास ते बाथरूममध्ये गेले होते. बराच वेळ होऊनही दरवाजा उघडत नसल्याने कुटुंबीयांनी आवाज दिला. प्रतिसाद न मिळाल्याने दरवाजा तोडून पाहिले असता ते आत पडलेल्या अवस्थेत आढळले. त्यांना प्रथम खासगी रुग्णालयात आणि त्यानंतर ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. त्यांना मधुमेहाचा त्रास होता. मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट झालेले नसून हिंगणघाट पोलिसांनी मर्ग दाखल करून तपास सुरू केला आहे.

**नवरात्र पाचवा दिवस आजचा रंग पिवळा**

# शक्तीभक्तीचा जागर! आर्वीच्या श्री यंत्र मंदिरात अश्विन नवरात्रोत्सवाचा मंगलमय प्रारंभ

## महाराष्ट्रातील पहिले जगदंबा श्री रेणुका देवीच्या दर्शनासाठी भाविकांमध्ये उत्साह



**आर्वी/जनमाध्यम**

आदिशक्तीच्या आराधनेचा पवित्र सोहळा, मंत्रोच्चारांचा मंगल नाद, देवीच्या जयघोषाने भारावलेले वातावरण आणि भक्तांच्या मनात दाटलेली श्रद्धा अशा भक्तिमय वातावरणात आर्वी येथील श्री यंत्र मंदिर श्री रेणुका देवी मंदिरात अश्विन नवरात्रोत्सवाला प्रारंभ झाला आहे. नवरात्रोत्सवाच्या पहिल्याच दिवसापासून मंदिर परिसरात धार्मिक चैतन्य निर्माण झाले असून, जगदंबा श्री रेणुका देवीच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. देवीच्या आराधनेतून मनःशांती, आत्मिक समाधान आणि सकारात्मक ऊर्जेचा अनुभव घेण्यासाठी भाविक या पवित्र देवस्थानात दर्शनासाठी येत आहेत.

नवरात्र म्हणजे केवळ नऊ दिवसांचा धार्मिक उत्सव नव्हे, तर स्त्रीशक्तीचा गौरव, भक्तीचा जागर आणि श्रद्धेच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणणारा संस्कृतीचा उत्सव आहे.आदिशक्तीच्या नऊ रूपांची आराधना करताना प्रत्येक घरात सुख, शांती, समृद्धी आणि आनंद नांदावा, अशी प्रार्थना केली जाते. याच भक्तिभावाने श्री यंत्र मंदिर श्री रेणुका देवी मंदिरात अश्विन नवरात्रोत्सवाची सुरुवात करण्यात आली आहे.

**विधिवत घटस्थापना; मंत्रोच्चारांनी मंदिर परिसर दुमदुमला**

अश्विन नवरात्रोत्सवाच्या शुभारंभानिमित्त मंदिरात पूजेचे यजमान सौ. शुभदा सव्वालाखे आणि श्री. प्रशांत सव्वालाखे यांच्या हस्ते विधिवत घटस्थापना करण्यात आली. धार्मिक परंपरेनुसार पूजा-अर्चा आणि मंत्रोच्चारांच्या सान्निध्यात घटस्थापनेचा सोहळा पार पडला. देवीच्या जयघोषाने आणि भक्तिमय वातावरणाने मंदिर परिसर भारावून गेला.

नवरात्रोत्सवानिमित्त श्री यंत्र मंदिरात नऊ दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज पहाटे जगदंबा श्री रेणुका देवीची महापूजा, महावस्त्र परिधान आणि आकर्षक शृंगार करण्यात येणार आहे. त्यानंतर प्रातःकालीन आरतीने दिवसाची सुरुवात होईल. दुपारच्या सत्रात महिलांच्या सामूहिक भजनाचे आयोजन करण्यात आले असून, शप्तशती पाठातून देवीच्या महात्म्याचे स्मरण केले जाणार आहे.

महिलांच्या सामूहिक भजनातून भक्तीबरोबरच सामाजिक एकोपा आणि सांस्कृतिक परंपरेचे जतन होणार आहे. धार्मिक कार्यक्रमांच्या निमित्ताने महिला, ज्येष्ठ नागरिक आणि युवकांना एकत्र येऊन देवीची आराधना करण्याची संधी मिळत आहे. पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या धार्मिक परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीनेही अशा उत्सवांना विशेष महत्त्व आहे.

आर्वी येथील श्री यंत्र मंदिर हे आपल्या वैशिष्ट्यपूर्ण रचनेमुळे धार्मिक आणि आध्यात्मिक क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण करणारे देवस्थान आहे. हे मंदिर जगातील सातवे, भारतातील चौथे आणि महाराष्ट्रातील पहिले श्री यंत्राच्या आकारातील मंदिर असल्याचे मंदिर व्यवस्थापनाकडून सांगण्यात येते. श्री यंत्राच्या आकारातील मंदिराची रचना हे या देवस्थानाचे प्रमुख आकर्षण आहे.

श्री यंत्राला हिंदू धर्मपरंपरेत अत्यंत पवित्र आणि आध्यात्मिक महत्त्वाचे प्रतीक मानले जाते. देवीच्या शक्तीचे प्रतीक म्हणून त्याची पूजा केली जाते. श्री यंत्रातील भौमितिक रचना, एकमेकांत गुंफलेले त्रिकोण आणि त्यातून व्यक्त होणारी आध्यात्मिक संकल्पना भाविकांसाठी विशेष श्रद्धेचा विषय आहे.धार्मिक मान्यतेनुसार श्री यंत्र हे देवी महालक्ष्मीच्या शक्तीचे आणि समृद्धीचे प्रतीक मानले जाते. श्री यंत्राची विधिवत पूजा केल्याने घरात सुख, शांती आणि समृद्धी नांदते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. धनधान्याची वृद्धी, कौटुंबिक समाधान आणि जीवनातील सकारात्मकतेसाठी अनेक भक्त श्री यंत्राची आराधना करतात.

श्री यंत्रातील नऊ त्रिकोणांना देवीच्या विविध शक्तिरूपांशी जोडले जाते. या प्रतीकात्मक रचनेतून सृष्टीतील शक्ती, संतुलन आणि आध्यात्मिक एकात्मतेचा विचार व्यक्त होतो. यंत्राचे शुद्धीकरण, पंचामृत स्नान, मंत्रोच्चार आणि विधिवत पूजा अशा धार्मिक पद्धतींनी आराधना केली जाते.नवरात्रोत्सवाच्या काळात श्री यंत्राच्या सान्निध्यात होणारी देवीची पूजा भाविकांसाठी विशेष महत्त्वाची ठरते. दैनंदिन जीवनातील धावपळीतून काही क्षण बाजूला काढून देवीसमोर ध्यानधारणा करणे, प्रार्थना करणे आणि आत्मपरीक्षण करणे यामुळे मनाला शांतता मिळते, अशी भाविकांची भावना आहे.

मंदिरातील दैनंदिन पूजा प्रकाश देऊळकर आणि पुष्पा देऊळकर करतात, तर जगदंबा श्री रेणुका देवीचा आकर्षक शृंगार वैभव देऊळकर करतात. देवीची नित्य पूजा, मंदिरातील स्वच्छता, धार्मिक विधींची व्यवस्था आणि भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सेवाभावी वृत्तीने कार्य केले जात आहे.धार्मिक स्थळांचे महत्त्व केवळ पूजाअर्चेपुरते मर्यादित नसते. श्रद्धेच्या माध्यमातून समाजात एकोपा निर्माण करणे, सेवाभाव वाढविणे आणि सांस्कृतिक वारसा जतन करणे हीदेखील मंदिरांची महत्त्वाची भूमिका असते. श्री यंत्र मंदिरातील नवरात्रोत्सवातून भक्ती आणि सेवाभावाची ही परंपरा पुढे नेण्याचा प्रयत्न केला जात आहे.

श्री यंत्र श्री रेणुका देवी मंदिर भक्त मंडळाच्या वतीने सर्व भाविकांना नवरात्रोत्सवात सहभागी होऊन जगदंबा श्री रेणुका देवीचे दर्शन घेण्याचे आणि धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नऊ दिवस देवीच्या आराधनेत सहभागी होत भक्ती, श्रद्धा आणि सद्भावनेचा अनुभव घ्यावा, असे आवाहन मंडळाने केले आहे. या भक्त मंडळात प्रशांत सव्वालाखे, पुंडलिक अवथले, प्रकाश देऊळकर, सुधीर भांडे, सुरेश सरोदे,मोरेश्वर देशमुख,नंदू ईरावार, पंडित भोंगाडे, वैभव सव्वालाखे, ताराचंद नेहारे, अनिल मोरे, सूरज देऊळकर, बाळा कोंडलकर, गजानन कोंडलकर, प्रमोद कोंडलकर, नाना देशमुख,शुभदा सव्वालाखे, पुष्पा देऊळकर,प्रियंका सव्वालाखे,वैशाली भांडे, राधिका भारती, दर्शिका अरबट, पूजा मांडवकर, रंजना अरबट आणि वर्षा चोरे यांचा सहभाग आहे.

नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने आर्वीतील श्री यंत्र मंदिरात भक्ती, श्रद्धा आणि आध्यात्मिकतेचा संगम अनुभवायला मिळत आहे. जगदंबा श्री रेणुका देवीच्या चरणी नतमस्तक होत भाविकांकडून सुख, शांती, समृद्धी आणि सर्वांच्या कल्याणासाठी प्रार्थना केली जात आहे. देवीच्या भक्तीने उजळलेले मंदिर परिसरातील वातावरण नवरात्रोत्सवाच्या धार्मिक महात्म्याची अनुभूती देत आहे.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ३१८**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

किरकोळ (RMJC) अर्ज क्र.१८९/२०२६ ने.ता.१६.११.२०२६

१. **स्वाती दत्तात्रय चव्हाण**
रा.गावडेवाडी, पो. कांडलगाव, दक्षिण सोलापूर,
जि.सोलापूर

// वि //
निरंक

ज्याअर्थी **मयत सागर सुभाषराव सोळंके** यांचा **मृत्यू दि.२५.०४.२०२६** मध्ये हिवरा बु.,ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला.मयताचे **अर्जदार क्र.१ ही बहिण आहे.** मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत.करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०३ जुलै २०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

# अमरावतीत पहिल्यांदाच पारंपारिक 'ढोलीडा फेस्ट' गरबा उत्सवाचे भव्य आयोजन

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहराच्या सांस्कृतिक इतिहासात पहिल्यांदाच गरब्याच्या मूळ परंपरेला आणि सनातन धर्माच्या भावनेला समर्पित असा भव्य 'ढोलीडा फेस्ट' गरबा उत्सव आयोजित करण्यात येत आहे. बडनेरा रोडवरील भव्य नैवेद्यम रिसॉर्टमध्ये हा उत्सव होणार असून, शहरवासीयांना एका सुरक्षित, पवित्र आणि सांस्कृतिक वातावरणात गरबा खेळण्याची संधी मिळणार आहे.

सध्याच्या अनेक गरबा उत्सवांमध्ये बॉलिवूड आणि फिल्मी गाण्यांचा दणदणाट पाहायला मिळतो. मात्र, 'ढोलीडा फेस्ट'मध्ये हा प्रकार पूर्णपणे टाळण्यात आला आहे. गरब्याच्या मूळ सांस्कृतिक भावनेला आणि परंपरेला अबाधित ठेवण्यासाठी येथे केवळ पारंपारिक गरबा संगीत वाद्यांच्या तालावर गरबाप्रेमींना थिरकता येणार आहे. यासाठी संपूर्ण परिसर अत्यंत भव्य आणि आकर्षक पद्धतीने सजवण्यात येत आहे.

महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आणि सर्व भाविकांच्या सोयीसाठी आयोजकांनी चोख व्यवस्था केली आहे. प्रत्येक सहभागी आपल्या परिवार आणि मित्रांसह सुरक्षित व आनंदमय वातावरणात या सांस्कृतिक सोहळ्याचा अनुभव



घेऊ शकेल, असा आयोजकांचा प्रयत्न आहे.

**युवा उद्योजकांचा पुढाकार**

हा गरबा उत्सव अमरावतीतील दोन युवा उद्योजक आणि सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रात सक्रिय असलेले व्यक्तिमत्व यांच्या पुढाकाराने होत आहे. डागा डेकोरेटर्सचे संचालक यशवर्धन विनोद डागा आणि सलोनी कॅटरर्सचे संचालक नवनीत संजय साहू हे या उत्सवाचे मुख्य आयोजक आहेत. अमरावतीतील गरबा संस्कृतीला एक नवा आयाम देणे आणि आजच्या युवा पिढीमध्ये पारंपारिक उत्सवांबद्दल गोडी निर्माण करणे, हा त्यांचा मुख्य उद्देश आहे. या आयोजनाला प्रसारमाध्यमांचेही सहकार्य लाभत आहे. या संदर्भात काल सायंकाळी ६ वाजता नैवेद्यम रिसॉर्ट येथे आयोजित पत्रकार परिषदेत नगरसेवक अधिवक्ता प्रशांत देशपांडे, नगरसेवक दिनेश बूब यांच्यासह घनश्याम सेठ खंडेलवाल यांनी आयोजनासंबंधी सविस्तर माहिती दिली.

या उत्सवाचे मुख्य प्रायोजक खंडेलवाल मीनाक्षी ज्वेलर्स असून, मीडिया पार्टनर म्हणून दैनिक प्रतिदिन - वृत्तकेसरी हे आहेत. आयोजक मंडळाने समस्त अमरावतीकर गरबा प्रेमींना आवाहन केले आहे की, त्यांनी मोठ्या संख्येने 'ढोलीडा फेस्ट'मध्ये सहभागी होऊन पारंपारिक गरबा संस्कृतीचा आनंद घ्यावा आणि हा सांस्कृतिक उत्सव यशस्वी करण्यासाठी आपले योगदान द्यावे. उपक्रमाची तयारी अंतिम टप्प्यात असून शहरात उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

तीन शासकीय रुग्णालयातील मेस कर्मचाऱ्यांचे आर्थिक शोषण

# प्रहारचे सिलेंडर डोक्यावर ठेवून आंदोलन

**अमरावती/प्रतिनिधीः-** येथील जिल्हा सामान्य रुग्णालय, डफरीन आणि सुपर स्पेशालिटी रुग्णालय या तीनही शासकीय रुग्णालयांच्या मेसमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी कंत्राटदारावर आर्थिक आणि मानसिक शोषणाचा गंभीर आरोप केला आहे.

या कर्मचाऱ्यांनी प्रहार संघटनेच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयावर आज बुधवार १४ ऑक्टोंबर रोजी डोक्यावर सिलेंडर ठेवून प्रशासनाचे लक्ष वेधले.किमान



वेतन लागू करणे, पीएफ आणि ईएसआयसीचा लाभ देणे, पगार बँक खात्यात जमा करणे अशा मागण्या जिल्हाधिका-यांकडे निवेदनात केल्या आहेत.

२ ते ३ दिवसात मागण्या मान्य न झाल्यास संपावर जाण्याचा इशाराही देण्यात आला आहे. आम्हाला महिन्याला फक्त ७५०० रुपये वेतन दिले जाते. ते किमान वेतन कायद्यानुसार नाही. चौकशी करून ठेकेदारावर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. यावेळी प्रहारचे छोटू महाराज वसू, बंटी रामटेके, गोलू पाटील, प्रशांत शिरभाते, गणेश मारोडकर, गौरव ठाकरे शेषराव धुले, इमरान खान, विजय जाधव, नितीन शिरभाते, इमरान शहा, दिनेश कुरेकर, मधुकर भूले, आकाश गजभिये, समीप तायडे, चेतन बरडे, कुणाल खंडारे आदि उपस्थित होते.

## CHANGE IN NAME

(OLD NAME)
PUSHPATAI RAMBHAU LOKHANDE
(NEW NAME)
PUSHPA VINAYAK WALKHADE
ADDRESS
MIRAKUNJ, 11 SURAJ COLONY,
V.M.V. AMRAVATI
S.O., DIST : AMRAVATI
MAHARASHTRA - 444604

## फ्लॅट विकणे आहे

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.
**संपर्क : ९४२२८५७१६९
९४२२१२०४०६**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार हे खालील नमूद मालमत्ता/शेतजमिनीचा सौदा **रवी रामराव खोपडकर,रा.हिवरा** यांच्या सोबत करणार आहे. सदर स्थावर मालमत्तेचे वर्णन येणेप्रमाणे.

**नोंदणी पोट तुकडी अकोला ग्रामीण वि.कचेरीचे कक्षेतील व अकोला जि.प.चे हददीतील मौजे-हयातपूर, ता.मूर्तिजापुर, जि.अकोला येथील भूमापक क्रमांक व उपविभाग क्र. ९, भोगवटदार-१, क्षेत्रफळ ०.८१ हे.आर., आकार रु.१.९५/- पैसे,** याची चर्तुःसिमा खालीलप्रमाणे आहे.

**पुर्वेस :- पाणदंन, पश्चिमेस :- तागडे यांचे शेत,**
**उत्तरेस :- साबळे यांचे शेत, दक्षिणेस :- प्रभाकर रामराव खोपडकर यांचे शेत**

उपरोक्त नमुद शेतजमिनीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, गहाण, बोजा, वारसाहक्क, जप्ती, कर्ज, ताबा, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र, सरकारी, निमसरकारी कर्ज, न्यायालयीन प्रकरण, वादविवाद, लिज पेंड्स अथवा कोणत्याही कुठलाही प्रकारचा अधिकार असल्यास सदर नोटीस प्रकाशित झाल्यापासून ०७ दिवसाचे आत पूर्ण लेखी पुराव्यासह कागदोपत्री वरील नमुद पत्यावर संपर्क साधावा. मुदती नंतर माझे पक्षकार सदर्हू शेतजमीनीचा सौदा करण्यास स्वतंत्र राहतील व त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा उजर चालणार नाही याची नोंद घ्यावी.

याकरिता सदर जाहीर नोटीस.

**ठिकाण :- अमरावती**
**दिनांक :- १३/१०/२०२६**

**सही/-
(ॲड.एम.के.भंडारी)
अमरावती
मो.नं.- ९३७२९६४८१०**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार हे खालील नमूद मालमत्ता/शेतजमिनीचा सौदा **सुनिल लक्ष्मण खोपडकर व प्रभाकर रामरावजी खोपडकर, दोन्ही रा.हिवरा** यांच्या सोबत करणार आहे. सदर स्थावर मालमत्तेचे वर्णन येणेप्रमाणे.

**नोंदणी पोट तुकडी अकोला ग्रामीण वि.कचेरीचे कक्षेतील व अकोला जि.प.चे हददीतील मौजे-हयातपूर, ता.मूर्तिजापुर, जि.अकोला येथील भूमापन क्रमांक व उपविभाग क्र.१०,भोगवटदार-१,सुनिल लक्ष्मण खोपडकर यांच्या मालकीचे क्षेत्रफळ १.९४ हे.आर., आकार रु.४.६८/- पैसे, पो.ख.०.०२.०० हे.आर.**

**तसेच प्रभाकर रामरावजी खोपडकर यांच्या मालकीचे क्षेत्रफळ १.६९ हे.आर, आकार रु.४.०८/- पैसे,पो.ख. ०.०१.०० हे.आर.**याची चर्तुःसिमा खालीलप्रमाणे आहे.

**पुर्वेस :- धम्मानंद कढाणे यांचे शेत, पश्चिमेस :- दुस-याचे शेत,**
**उत्तरेस :- रवी रामराव खोपडकर यांचे शेत,**
**दक्षिणेस :- सुधाकर हांडे यांचे शेत.**

उपरोक्त नमुद शेतजमिनीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, गहाण, बोजा, वारसाहक्क, जप्ती, कर्ज, ताबा, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र, सरकारी, निमसरकारी कर्ज, न्यायालयीन प्रकरण, वादविवाद, लिज पेंड्स अथवा कोणत्याही कुठलाही प्रकारचा अधिकार असल्यास सदर नोटीस प्रकाशित झाल्यापासून ०७ दिवसाचे आत पूर्ण लेखी पुराव्यासह कागदोपत्री वरील नमुद पत्यावर संपर्क साधावा. मुदती नंतर माझे पक्षकार सदर्हू शेतजमीनीचा सौदा करण्यास स्वतंत्र राहतील व त्यानंतर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा उजर चालणार नाही याची नोंद घ्यावी.

याकरिता सदर जाहीर नोटीस.

**ठिकाण :- अमरावती**
**दिनांक :- १३/१०/२०२६**

**सही/-
(ॲड.एम.के.भंडारी)
अमरावती
मो.नं.- ९३७२९६४८१०**

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज क्र.९७२/२०२६**
**जाहीरनामा/सायटेशन** **श्रीमती अर्चना अरुण धिनमिने व इतर वि.निरंक**
**पुढील ता.०५.११.२०२६**

अर्जदार :-
१. **श्रीमती अर्चना अरुण घिनमिने,** वय ७५ वर्षे, धंदा- घरकाम
रा.जी-१, मॉ भगवती अपार्टमेंट, श्री कॉलनी, गाणुवाडी जवळ,
जूनाबाय रोड, अमरावती, ता.जि.अमरावती- ४४४ ६०७
२. **अनुराधा अरुण घिनमिने, (लग्नाआधीचे नांव)**
**सौ.अनुराधा हनुमंतराव हवालदार, (लग्नानंतरचे नांव)**
वय ५१ वर्षे,कामधंदा-नोकरी, रा.व्दारा श्री हेमंत हवालदार, क्वॉटर नंबर २५ टाईप ४, बंगला नंबर १०, मनोरा मंगज गिता भवन चौक जवळ,
इंदौर, ४५० ००१ (मध्यप्रदेश)
३. **श्री आनंद अरुण घिनमिने,** वय ४९ वर्षे, कामधंदा-नोकरी
रा.जी-१, मॉ भगवती अपार्टमेंट, श्री कॉलनी, गाणुवाडी जवळ,
जूना बायपास रोड, अमरावती, ता.जि.अमरावती- ४४४ ६०७

-- विरुध्द --

**गैरअर्जदार- निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की **मयत अरुण जनार्धन घिनमिने** हे दिनांक **०२.११.२०२५** रोजी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार श्रीमती अर्चना अरुण घिनमिने व इतर वि निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती अर्चना अरुण घिनमिने व इतर वि निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१२.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज क्र.२०९५/२०२६**
**जाहीरनामा/सायटेशन** **शकील अहमद व सहा वि.निरंक**
**पुढील ता.३०.१०.२०२६**

अर्जदार
1. **Shakeel Ahmad s/o Abdul Hameed,** Aged 66 yrs. Occ.- Retired
R/o. Bhupesh Nagar, Katol Road, Nagpur
2. **Bilkies Jahan wd/o Salim Khan,** Aged 79 yrs. Occ.- Homemaker
R/o. Inamadar Pura, Karajgaon, Chandur Bazar
3. **Niyaz Begam w/o. Zafeeruddin,** Age 68 yrs. Occ.- Homemaker
R/o. Kumbhar Pura, Shirajgaon, Chandur Bazar
4. **Noorjahan Begum wd/o. Mateen Ahmad,**
Age 58 yrs. Occ.- Homemaker
R/o. Zam Zam Nagar, Walgaon Road, Amravati
5. **Saima Saher w/o. Syed Niyazuddin,** Age 36 yrs. Occ.- Homemaker
R/o. Chandni Chowk, Walgaon Road, Amravati
6. **Saquib Ahmad s/o. Mateen Ahmad,** Age 34 yrs. Occ.- Doctor
R/o. Zam Zam Nagar, Walgaon Road, Amravati
7. **Arma Saher w/o. Imran Ahmad,** Age 30 yrs. Occ.- Homemaker
R/o. Jamdarpura, Post.- Mana, Dist. Akola

-- विरुध्द --

**गैरअर्जदार- NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Mehrunnissa w/o. Abdul Hameed** या दिनांक **१०.१०.२०२१** रोजी मयत झाल्या.अर्जदार **Shakeel Ahmad s/o. Abdul Hameed + 6** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Shakeel Ahmad s/o. Abdul Hameed + 6** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१२.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

## जाहीर नोटीस

तमाम लोकांचे माहितीकरिता सदरचे जाहीर नोटीसीने प्रसिद्ध करणेत येते की, मिळकतीचे वर्णन. जिल्हा अमरावती ता. अंजनगाव सुर्जी मौजे. समशेरपुर येथील भू-मापन गट क्र. ५ याचे एकूण क्षेत्र ३ हे. ८९ आर यापैकी लिहून देणार १) अक्षय दिलीपराव नागे व पवन दिलीपराव वाकोडे यांचे मालकीचे सामाईक क्षेत्र १ हे. २१ आर ही या नोटीसीची विषयांकित मिळकत असून यापुढे त्यास सोईकरिता व संक्षिपाचे कारणास्तव सदर मिळकत असे संबोधलेले आहे. सदर मिळकतीपैकी काही मिळकतीबाबत त्यांचे मालकांनी पूर्णपणे निर्वेध, निष्कर्जी व सोक्त असल्याची हमी व निर्वाळा देऊन आमचे अशीलांना सदर मिळकत भाडेपट्टा / योग्य त्या कराराने देणेचे मान्य व कबूल केलेले आहे. तसेच सदर नोटीस प्रसारीत करणेसाठी संमती पत्र लिहून दिले आहे. सबब, सदर मिळकतीबाबत, त्यांचे मालकी हक्काबाबत, वहिवाटीबाबत कोणाही बँका, पतसंस्था, खाजगी व्यक्ती, सावकार, शासकीय, निमशासकीय कार्यालये, इतर वित्तीय संस्था इत्यादी अगर अन्य कोणाचेही कसल्याही प्रकारचे कर्ज, बोजा, पीक कर्ज, लिज, तारण गहाण, मुदत खरेदी, बक्षीस, मृत्यूपत्र, वारसाहक्क, इजमेंट, शेजा-याशी वाद, भाडेपट्टा, वहिवाट, पोटगी, कुळ, ॲक्विजीशन, रिक्विजिशन, न्यायालयीन वाद, कोर्ट डिक्री इ. संबंधीचे कसल्याही प्रकारचे हक्कसंबंध वा अधिकार असलेस किंवा हरकत असलेस, तक्रार असलेस त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ सात दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्यावर सर्व कागदोपत्री पुराव्यानिशी येवून हरकती नोंदवाव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जी व सोक्त आहेत असे समजून आमचे अशील जागा मालकांशी पुढील व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत वा तक्रार आलेस ती सदर मिळकतींवर, आमचे अशीलांचेवर व त्यांचे कायदेशीर हक्कांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. म्हणून दिली जाहीर नोटीस.
अमरावती
दिनांक. १५/१०/२०२६

उपरोक्त अशिलातर्फे
**ॲडव्होकेट के. डी. शिराळे**
पत्ता. ऑफिस नं. डी-३, दुसरा मजला,
शुभम अपार्टमेंट, नागाळा पार्क, २५२/१क/२.
शाहु ब्लड बँकेजवळ, कोल्हापूर
संपर्क क. ०२३१-२६६८८४७

शिक्का

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज क्र.२१००/२०२६**
**Sunanda Sureshrao Tayade + 5 Versus NIL**
**जाहीरनामा/सायटेशन**
**पुढील ता.२०.११.२०२६**

Applicants :-
1. **Sunanda Sureshrao Tayade,** Age 65 yrs. Occ.- Household
2. **Jayprakash Sureshrao Tayade,** Age 49 yrs. Occ.- Labour
3. **Mamta Pradip Khandare,** Age 45 yrs. Occ.- Household
R/o. Rampuri Camp, Siddhartha Nagar, Shivaji Nagar, Amravati
Tq. & Dist. Amravati
4. **Rahul Sureshrao Tayade,** Aged 43 yrs. Occ.- Labour
5. **Nilesh Sureshrao Tayade,** Aged 42 yrs. Occ.- Labour
6. **Sandip Sureshrao Tayade,** Aged 40 yrs. Occ.- Labour
Applicant No.1,2 & 4 to 6 All R/o. Front of Central Excise office,
Mahatma Fule Nagar, Navsari, VMV Amravati, Tq. & Dist. Amravati

-- Versus --

Non-Applicant - NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Sureshrao Raybhanji Tayde** हे दिनांक ०८.०५.२०२४ रोजी **अमरावती** येथे मयत झाले. **Sunanda Sureshrao Tayde +5 Versus NIL** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Sunanda Sureshrao Tayde +5 Versus NIL** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०९.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज क्र.२०७४/२०२६**
**Aafreen Bano Shaikh Azharuddin + 2 Versus NIL**
**जाहीरनामा/सायटेशन**
**पुढील ता.१७.११.२०२६**

Applicants :-
1. **Aafreen Bano Shaikh Azharuddin,** Aged 31 yrs. Occ.- Housewife
2. **Areeba Tamkeen Shaikh Azharuddin,** Age 9 yrs. Occ.- Education
3. **Filza Aayat Shaikh Azharuddin,** Age 5 yrs. Occ.- Education
R/o. Kamunja, Tq. & Dist. Amravati, Residing at c/o. Ghulam Murtuza Ghulam Husain At Govindpur, Post: Karajgaon, Tq. Chandur Bazar, Dist. Amravati

-- Versus --

Non-Applicant - NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Shaikh Azharuddin Shaikh Rajjak** हे दिनांक **१९.०६.२०२३** रोजी **अमरावती** येथे मयत झाले.**Aafreen Bano Shaikh Azharuddin+2 Versus NIL** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Aafreen Bano Shaikh Azharuddin+2 Versus NIL** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०६.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

## जाहीर सुचना

या जाहीर सुचने द्वारे सुचित करतो की, माझे पक्षकार सतिश वामनराव डहाके व प्रगती सतिश डहाके, रा. अमरावती, ता. जि. अमरावती यांनी केलेल्या ईसारचिठ्ठी नुसार मौजे नवसारी, ता., जि. अमरावती येथील सर्व्हे नं. ४७/२/ए मधील, प्लॉट नं. १६ एकूण क्षेत्र २७८.०० चौ. मी. यातील सबडीव्हीजन प्लॉट नं. १६-ए (जुन्या खरेदी प्रमाणे प्लॉट नं १६ पश्चिमेकडील भाग) याचे क्षेत्र १३९.०० चौ. मी. (१५००.०० चौ. फु) ह्या मिळकतीचा शेखर नरेशकुमार आहूजा यांचे कडून विकत घेण्याचा सौदा केलेला आहे आणि त्यापुर्वी सदर मिळकत म्हणजेच प्लॉट नं. १६-ए ज्याचे क्षेत्र १३९.०० चौ. मी. (१५०० चौ. फु) ही शेखर नरेशकुमार आहूजा यांनी भगवान रामजी लखतारीया यांचे कडून दि. ०६/०१/२०२६ रोजीचे रजि. खरेदी दस्त क्र. २०२ नुसार खरेदी केलेली होती, व त्या पुर्वी सदर मिळकत म्हणजेच प्लॉट नं १६ पश्चिमेकडील भाग ज्याचे क्षेत्र १३९.०० चौ. मी. (१५०० चौ. फु) ही भगवान रामजी लखतारीया यांनी महादेवराव नामदेवराव कुबडे यांचे कडून दि. ०६/०३/१९७७ रोजीचे रजि. खरेदी दस्त क्र. ५१२२ नुसार खरेदी केलेली होती.

परंतु वर नमुद, खरेदी दस्तां पैकी, दि. ०६/०३/१९७७ रोजीचे रजि. खरेदी दस्त क्र. ५१२२ चे मुळ रजि. दस्त माझे पक्षकाराचे वरील नामे विक्रेते यांचे कडून गहाळ झालेले आहेत, व ईतर मुळ खरेदी दस्त त्यांच्याकडे आहेत.

तरी याबाबत कोणाचेही, कोणत्याही प्रकारचे कर्ज, गहाण, बोजा, हक्क, हितंसंबंध व इतर कोणतीही भानगड, कायदेशीर वाद, लवाद, दावा असल्यास किंवा त्याबाबत कोणतीही हरकत असल्यास जाहीर सुचनेपासून ०७ दिवसांचे आंत खालील पत्त्यावर लेखी स्वरुपात संपर्क साधावा, त्यानंतर आक्षेप आल्यास याची नोंद घेतली जाणार नाही.

अमरावती.
दिनांकः १४/१०/२०२६

**ॲडव्होकेट राहूल व्ही. मोहोड**
प्रेरणा कॉलनी, राधा नगर, अमरावती-४४४६०३. मो.९०९६४६०६७०.

शिक्का

दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती
वि. श्री. एस.एस. भिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्रमांक :- २०३१/२०२६ Nandkishor Panjabrao Deshmukh+ 4 Versus NIL
पुढील तारीख :- ०७.११.२०२६

**जाहिरनामा / सायटेशन**

**Applicants1) Nandkishor Panjabrao Deshmukh,** Age 57 years, Occ Agriculturist, R/o Khatalegaon, Bhatkuli, Tq Bhatkuli, Dist. Amravati **2) Sunil Panjabrao Deshmukh,** Age 50 years, Occ - Agriculturist R/o Near Pattiya Pustak, Kishor Colony, VMV Amravati Tq. and Dist. Amravati **3) Santosh Panjabrao Deshmukh,** Age 48 years, Occ-Agriculturist, R/o near Pathya Pustak Mandal, Kishor Nagar, VMV Amravati, Tq and Dist. Amravat. **4) Vaishali Diwakar Deshmukh,** Age 46 years, Oc-Household, R/o Near Pathya Pustak Mandal, Kishor Nagar, VMV Amravati, Tq and Dist. Amravati. **5) Ashwini Prasad Deshmukh,** Age 44 years, Occ-Household, R/o Riddhi Siddhi Apartment, Flat No. 1, Sudhir Colony, Near Auto Stand, Akola Tq & Dist. Akola

**==Versus== Non- Applicant NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत **Panjabrao Nanasaheb Deshmukh** हे दि. २०. ०५.२०२५ रोजी अमरावती येथे मयत झाले **Nandkishor Panjabrao Deshmukh+ 4 Versus NIL** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. त्यापेक्षा Nandkishor Panjabrao Deshmukh+ 4 Versus NIL वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदर्हू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दि. ०५.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अमरावती**

दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती
वि. श्री. एस.एस. भिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज कमांकः २०५५/२०२६ पुढील तारीख २०.११.२०२६

**Smt. Shobha Chudaman @ Subhash Tale + 2 Versus NIL**

**जाहिरनामा / सायटेशन**

**Applicants 1) Smt. Shobha Chudaman** @ Subhash Tale Aged about 70 yrs Occ-Household, R/o Near Datta Mandir, Radha Nagar, Amravati TQ & Dist. Amravati **2) Atish Chudaman @ Subhash Tale** Aged about 43 yrs, Occ: Service, R/o Vinayak Nagar, Near Datta Mandir, Radha Nagar, Amravati Tq & Dist. Amravati **3) Sau. Surwana w/o Kamlesh** Lahane, Aged about 46 yr, Occ: Household R/o Yash House No. 40, Lane No. 2, Madhuvan Society Old Sanghvi Pune

**Non- Applicant NIL ==Versus==**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत **Chudaman @ Subhash Ganpatrao Tale** हे दि. ०३.०१.२०२६ रोजी अमरावती येथे मयत झाले. **Smt. Shobha Chudaman @ Subhash Tale + 2 Versus NIL** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्छु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.त्यापेक्षा **Smt. Shobha Chudaman @ Subhash Tale + 2 Versus NIL** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदई कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.आज दि. ०९.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

शिक्का

**आदेशानुसार
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती.**

दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती
वि. श्री. एस.एस. भिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्रमांक :- २०६९/२०२६ पुढील तारीख :- २३.११.२०२६

**Hemangi Sanjay Shedmake + 2 Versus NIL**

**जाहिरनामा / सायटेशन**

**Applicants 1) Hemangi Sanjay Shedmake,** Age 52 years, Occ Housewife, R/o H 22/704, Indrapastha, Near Pratiksha Nagar, Bus Depot, Sion, Mumbai, Maharashtra, **2) Ajay Mahadeorao Kamble,** Age 50 years, Occ, Business, R/o 103, Sai Utsav Building No. 4, Gokhivare, Madhuban Township, Gokhivare, Vasai East, Thane. **3) Shekhar Mahadeorao Kamble,** Age 45 years, Occ Business, R/o Benoda Road, Shanti Nagar, Rukhmini Nagar, Amravati,Tq & Dist. Amravati.

**==Versus== Non- Applicant NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की मयत **Usha Mahadeo Kamble** हे दि. १८.११.२०२२ रोजी अमरावती येथे मयत झाले. **Hemangi Sanjay Shedmake + 2 Versus NIL** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.त्यापेक्षा **Hemangi Sanjay Shedmake + 2 Versus NIL** वरीलप्रमाणे सदर्छु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणांस समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिल्यास त्यांना सदहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.आज दि. ०९.१०.२०२६ रोजी माध्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले

शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, अमरावती.**

## जाहीर नोटीस
विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)
चांदूर बाजार, जि. अमरावती

आर.एम.जे.सी. ४९१/२०२६ ने. ता. २४/११/२०२६

**अर्जदार :-१. रत्नकला रावसाहेब राऊत,** वय - ६१ वर्ष व्यवसाय - घरकाम रा. तळेगाव मोहणा ता. चांदुर बाजार जि. अमरावती

**...विरूध्द........गैरअर्जदार :-निरंक**
**बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे**
**वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठीकाणी राहतात. **मृतक नरेंद्र रावसाहेब राऊत** यांचा **मृत्यु दि. २०/११/२०१६** रोजी तसेच **मृतक रावसाहेब रामभाऊजी राऊत** यांचा **मृत्यु दि. १०/०७/२०१६** रोजी रा. तळेगाव मोहना ता. चांदुर बाजार जि. अमरावती येथे झालेला आहे.यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराव्यतीरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना मय्यताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) चांदुर बाजार येथील न्यायालयात आर.एम.जे.सी.नं. ४९१/२०२६ नुसार अर्ज दाखल केला आहे.त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दि. १२/१०/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदुर बाजार**

महाराष्ट्र शासन
**तालुका दंडाधिकरी तथा तहसिलदार, अंजनगांव सुर्जी यांचे कार्यालय**
**अकोट रोड, अंजनगांव सुर्जी, ४४४७०५**
दुरध्वणी क्रमांक : ०७२२४-२४२०७४ **E-mail: tah.anjangaon @gmail.com**
क्रमांक.स.म. अ/कुळ/कावि ४८/२०२६ दिनांक. ०९/१०/२०२६

## जाहीरनामा

प्रस्तुत प्रकरण **अर्जदार नरेश नामदेवराव किचंबरे** व इतर १० रा.प्रागतिक विद्यालय समोर बारीपुरा सुर्जी ता. अंजनगांव सुर्जी जि. अमरावती यांचे प्राप्त अर्जानुसार मौजे खेलकोकाट येथील शेत गट नं.५२/१/क क्षेत्र १.१५ हे. आर आ.रु.६.५० पै. या शेत जमीनीच्या गाव नमुना ७/१२ चे इतर अधिकारात साधे कुळ म्हणुन सिताराम रामजी यांचे नावे समाविष्ठ असुन सदहुं नोंद कमी करुन अद्यावत ७/१२ मिळणे बाबत अर्जदार यांनी अर्ज सादर केले आहे. त्याअनुषंगाने उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे अर्जदार यांचे अर्जावर कोणाचा काही आक्षेप/ हरकत असल्यास **दिनांक-२६/१०/२०२६** पुर्वी माझे समक्ष सादर कराव्यात. मुदतीनंतर आक्षेप अथवा हरकत स्वीकारल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी. सदर जाहीरनामा आज दिनांक. **१४/१०/२०२६ रोजी** माझे स्वाक्षरीसह प्रसिध्द करण्यात येत आहे.

शिक्का

**तहसिलदार, अंजनगाव सुर्जी**

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.
संपादक- प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ४१
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025
मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# धारणी पोलिसांची अवैध रेती वाहतुकीवर धडक कारवाई

## २१.४८ लाखांचा मुद्देमाल जप्त; सहा ब्रास रेतीसह डंपर ताब्यात

**मेळघाट/वार्ताहर**

अवैध रेती वाहतुकीविरुद्ध धारणी पोलिसांनी धडक कारवाई करत सहा ब्रास रेतीसह टाटा कंपनीचा डंपर असा एकूण २१ लाख ४८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई बुधवारी सकाळी सुमारे ७ ते ७.३० वाजताच्या दरम्यान हरिसाल गावाजवळ करण्यात आली. याप्रकरणी डंपर चालक नामदेव गजानन शनवारे (वय ३८, रा. खमला, ता. भैंसदेही, जि. बैतूल, मध्य प्रदेश) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास सुरू आहे.

पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी अमरावती ग्रामीण जिल्ह्यातील अवैध धंदे आणि अवैध रेती वाहतुकीवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश धारणी पोलिसांना दिले आहेत. त्यानुसार पोलीस निरीक्षक अवतारसिंग चव्हाण यांना १४ ऑक्टोबर रोजी गुप्त बातमीदारामार्फत टाटा कंपनीच्या डंपरमधून मांगीया मार्गे हरिसाल येथे अवैधरीत्या रेतीची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली.

या माहितीच्या आधारे धारणी पोलिसांच्या पथकाने सापळा रचला. सकाळी मांगीया गावाकडून हरिसालच्या दिशेने



येणारा एमपी ४८ झेडएच १९६२ क्रमांकाचा संशयित डंपर पोलिसांनी हरिसाल येथे थांबविला. पंचांच्या उपस्थितीत वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये सहा ब्रास रेती आढळून आली. रेती वाहतुकीचा परवाना मागितला असता चालकाकडे कोणताही वैध परवाना नसल्याचे समोर आले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जप्त करण्यात आलेल्या सहा ब्रास रेतीची अंदाजे किंमत ४८ हजार रुपये असून रेती वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या डंपरची किंमत २१ लाख रुपये आहे. अशा प्रकारे एकूण २१ लाख ४८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चालक नामदेव शनवारे याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड आणि उपविभागीय पोलीस अधिकारी माधवराव गरुड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अवतारसिंग चव्हाण यांच्या पथकाने केली.

या पथकात सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील, पोलीस कॉन्स्टेबल जगत तेलगोटे, आदित्य सुरनर, सागर कुरळकर आणि पोलीस हेड कॉन्स्टेबल तथा चालक नितीन लोहगपुरे यांचा समावेश होता.

धारणी पोलिसांच्या या कारवाईमुळे परिसरातील अवैध रेती वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून, अशा बेकायदेशीर प्रकारांविरुद्ध कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे पोलिसांच्या सांगितले आहे.

## सावंगा आसरा येथे शारदीय नवरात्रोत्सव

# २५ ऑक्टोबरला होमहवन व महाप्रसादाचे आयोजन

**टाकरखेडा संभू/ वार्ताहर**

अमरावती तालुक्यातील सावंगा (आसरा) येथील श्री आसरा देवी मंदिर संस्थानच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही शारदीय नवरात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. ११ ऑक्टोबरपासून ते २५ ऑक्टोबरपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार असल्याची माहिती मंदिर संस्थानच्या वतीने देण्यात आली.

सोमवार, १९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ४ ते ६ या वेळेत होमहवन आयोजित करण्यात आले असून, त्यानंतर कुलस्वामिनीची महाआरती होईल. त्याच दिवशी सायंकाळी ७.३० वाजेपर्यंत घटविसर्जन करण्यात येणार आहे.यानंतर बुधवार, २१ ऑक्टोबर रोजी सकाळी ७.३० वाजता आसरा देवी पंचरात्रोत्सवाला प्रारंभ होईल. २५ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ ते ११ या



वेळेत होमहवन, तर दुपारी १२ ते ३ या वेळेत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.श्री आसरा देवी मंदिराचे बांधकाम भाविकांच्या सहकार्यातून सुरू असून, उर्वरित बांधकाम पूर्ण करण्यासाठी भक्तांनी सढळ हाताने आर्थिक मदत करावी, असे आवाहन मंदिर संस्थानने केले आहे.

देणगी दिल्यानंतर अधिकृत पावती घेण्याचेही आवाहन करण्यात आले आहे. धार्मिक कार्यक्रमांचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे मंदिर संस्थानच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# खरवाडीत ७० वर्षांपासून देवीच्या सप्त्यांची परंपरा कायम

**ब्राह्मणवाडा थडी/ वार्ताहर**

चांदूरबाजार तालुक्यातील खरवाडी येथील ग्रामीण भागातील परंपरा, श्रद्धा आणि सामाजिक एकतेचे दर्शन घडविणारी देवीच्या सप्त्यांची परंपरा अमरावती जिल्ह्यातील चांदूर बाजार तालुक्यात असलेल्या खरवाडी गावात आजही मोठ्या श्रद्धेने आणि उत्साहाने जोपासली जात आहे. सुमारे ७० वर्षांपूर्वीपासून सुरू असलेली ही परंपरा आजही गावकऱ्यांनी जपली असून, ती गावाच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहे.

खरवाडी गावाचे वैशिष्ट्य म्हणजे येथे विविध जाती-धर्मांचे नागरिक गुण्यागोविंदाने एकत्र राहतात.श्रद्धा, परस्पर सन्मान आणि बंधुभावाच्या माध्यमातून गावातील सामाजिक एकतेचे सुंदर



दर्शन या उत्सवातून घडते.सप्त्याच्यां शेवटच्या दिवशी होणाऱ्या महापूजेला विशेष महत्त्व आहे. या दिवशी संपूर्ण गावात पारंपरिक पद्धतीने रोडगे आणि वांग्याची भाजी तयार केली जाते. गावातील नागरिक एकत्र येऊन गावाचे आराध्य दैवत असलेल्या देवीची पूजा-अर्चना करतात आणि अनेक वर्षांपासून चालत आलेल्या या परंपरेचे जतन करतात.

काळ बदलला, पिढ्या बदलल्या; मात्र खरवाडीकरांनी आपल्या श्रद्धेचा आणि परंपरेचा वारसा आजही तितक्याच आपुलकीने जपला आहे. देवीच्या सप्त्यांची ही परंपरा केवळ धार्मिक श्रद्धेपुरती मर्यादित नसून, ती सर्वधर्मीयांना एकत्र आणणारी, सामाजिक सलोखा वाढविणारी आणि गावाच्या एकतेची ओळख जपणारी परंपरा ठरत आहे.अशा प्रकारे खरवाडी गावाने सुमारे सात दशकांपासून चालत आलेल्या या परंपरेच्या माध्यमातून सामाजिक ऐक्य, बंधुभाव आणि सांस्कृतिक वारसा जपण्याचा आदर्श निर्माण केला आहे.



सार्वजनिक नवदुर्गा उत्सव मंडळ, खल्लार वर्ष ३८ वे



आदीशक्ती शारदादेवी महिला मंडळ, खल्लार वर्ष २ रे

# परिसरात कृषी वीज पुरवठ्याचा प्रश्न ऐरणीवर

## फॉल्ट दुरुस्तीसाठी परमिट प्रक्रियेत वेळेचा अपव्यय; १२ तासांच्या वीजपुरवठ्यात खंड पडत असल्याने शेतकरी त्रस्त

**अंजनगाव बारी/ वार्ताहर**

येथील परिसरातील कृषी वीजवाहिन्यांमध्ये फॉल्ट निर्माण झाल्यास तो दुरुस्त करण्यासाठी लाईनमनला परमिट घेण्याकरिता उपकेंद्रात जावे लागते. त्यानंतर फॉल्ट असलेल्या ठिकाणी जाऊन काम करणे आणि काम पूर्ण झाल्यावर पुन्हा संबंधित प्रक्रिया पार पाडणे, यामध्ये बराच वेळ खर्च होत असल्याने कृषी वीजपुरवठ्यावर परिणाम होत असल्याची समस्या समोर येत आहे.

सातरगावसह परिसरातील कृषी वाहिनीमध्ये फॉल्ट निर्माण झाल्यास लाईनमनला अंजनगाव बारी येथील उपकेंद्रातून परमिट घेऊन संबंधित ठिकाणी जावे लागते. ही प्रक्रिया वेळखाऊ ठरत असल्याने फॉल्ट दुरुस्त होण्यास विलंब होतो आणि शेतकऱ्यांना निर्धारित १२ तासांच्या कृषी



वीजपुरवठ्यात खंड सहन करावा लागतो. त्यामुळे शेतीच्या कामांचे नियोजन बिघडत असल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे.

यापूर्वी ऑपरेटर सलग तीन दिवस ड्युटी करून चौथ्या दिवशी विश्रांती घेत असल्याची कार्यपद्धती होती. मात्र, आता अधिकृत निर्देशानुसार प्रत्येक ऑपरेटरला आठ तासांची ड्युटी करण्यास सांगण्यात आले आहे. त्यानुसार ऑपरेटर मंडळींनी आठ तासांच्या ड्युटीचे धोरण स्वीकारले आहे. त्यामुळे ड्युटीच्या वेळापत्रकात बदल झाला असून, वीजपुरवठ्यातील तांत्रिक बिघाड तातडीने दूर करण्यासाठी पर्यायी व्यवस्था आणि समन्वयाची गरज व्यक्त होत आहे.

कृषी वीजवाहिनीतील फॉल्ट तातडीने दुरुस्त व्हावेत, परमिट प्रक्रियेत होणारा वेळेचा अपव्यय कमी व्हावा आणि शेतकऱ्यांना निर्धारित वेळेत सुरळीत वीजपुरवठा मिळावा, यासाठी वीज वितरण कंपनीच्या स्थानिक व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालावे, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. तसेच जनप्रतिनिधींनीही या प्रश्नात हस्तक्षेप करून तोडगा काढावा. अन्यथा शेतकऱ्यांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# यु.डी.आर.एफ.प्रमाणेच राष्ट्रीय मूल्यांकनासाठी मेहनत करा - कुलगुरू

**अमरावती/ का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत करण्यात आलेल्या विभागांतर्गत मूल्यांकनामध्ये (यूडीआरएफ) विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाने प्रथम क्रमांक मिळविला, तर बायोटेक्नॉलॉजी विभाग द्वितीय, संगणशास्त्र विभागाने तृतीय क्रमांकाचे स्थान मिळविले आहे. अन्य २९ विभागाने मागील वर्षीपेक्षा उल्लेखनीय कामगिरी केल्याचे मूल्यांकनाव्दारे स्पष्ट झाले आहे. मूल्यांकनात प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक मिळविणा-या भौतिकशास्त्र, बायोटेक्नॉलॉजी आणि संगणकशास्त्र विभागप्रमुखांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले, त्यावेळी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून जी.एच. रायसोनी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे, विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे व नवोपक्रम नवसंशोधन व साहचर्य मंडळाच्या संचालक प्रा. स्वाती शेरेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते पुढे बोलतांना म्हणाले, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठांतर्गत जाहीर करण्यात आलेल्या युडीआरएफ रँकिंगमध्ये सर्व विभागांच्या



कामगिरीत उल्लेखनीय सुधारणा झाली असून प्रत्येकाचा सहभाग यामध्ये महत्वाचा आहे.युडीआरएफ रँकिंगला सकारात्मकतेने घेऊन आता राष्ट्रीय मूल्यांकनामध्ये विद्यापीठाचे नाव आणण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे. विद्यापीठाने शैक्षणिक क्षेत्रात मोठी मजल मारली असून नुकत्याच जाहीर झालेल्या 'क्यूएस' आणि 'सायमॅगो' या प्रतिष्ठित संस्थांच्या इन्स्टिटुशनल रँकिंगमध्ये अमरावती विद्यापीठाने मानाचे स्थान मिळवले आहे.

प्रमुख अतिथी जी.एच. रायसोनी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे म्हणाले, युडीआरएफ अंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणा-या विभागांची संख्या दुप्पट झाली आहे. विद्यापीठांमध्ये पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि सातत्यपूर्ण सुधारणांना चालना देण्यासाठी 'युडीआरएफ' ही केवळ गुणांकन प्रणाली नसून एक धोरणात्मक उपक्रम आहे. २०२६ च्या 'युडीआरएफ' रँकिंगमध्ये भौतिकशास्त्र, बायोटेक्नॉलॉजी आणि संगणकशास्त्र या विभागांसह शारीरिक शिक्षण, रासायनिक तंत्रज्ञान आणि आजीवन अध्ययन व विस्तार विभाग या विभागांनी उत्कृष्ट कामगिरी करत तीनशे पेक्षा अधिक गुण प्राप्त केले आहेत.

सदर मूल्यांकन प्रक्रिया १ जुलै, २०२५ ते ३० जुन, २०२६ या कालावधीकरिता शासन निर्णय क्रमांक ई-१०१८३७२/विशी-३,७ मार्च, २०२५ मधील तरतुदीनुसार कालबध्द पध्दतीने राबविण्यात आली.

विकास विभागाच्या उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील यांच्या मार्गदर्शनात गजानन माकोडे, उदय कुलकर्णी, संजय ठाकरे, मेश्राम, कोमल पाटील, काळबांडे, ऋषिकेश लोखंडे, पांडे यांनी शासनाने दिलेल्या कालमर्यादेत ही संपूर्ण प्रक्रिया शिस्तब्ध पध्दतीने पार पाडली. बक्षीस वितरण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार विकास विभागाच्या उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील यांनी केले.

# नवरात्र म्हणजे शक्तीरूप, 'स्त्री देवीची खरी भक्ती व उपासना होय

**चांदूर बाजार/ वार्ताहर**

आश्विन शुक्ल प्रतिपदेपासून नवरात्रोत्सव म्हणजेच शक्तीरूप देवीचा उत्सव साजरा करतात.आज या नवरात्राचा प्रारंभ होत आहे.देवीला वेगवेगळ्या नावांनी व रूपांनी ओळखल्या जाते. देवीची भक्ती, पूजा, उत्सव नऊ दिवस साजरा केला जातो.भक्तांच्या रक्षणार्थ राक्षस रुपी दुर्जनांचा निर्दालन करण्यासाठी देवी अनेक रूपात प्रगट झालीआहे. महिषासुर मर्दिनी, दुर्गा, भवानी, महालक्ष्मी, शारदा, सरस्वती, अंबा, महाकाली अशा अनेक नावांनी आणि अनेक रूपांनी देवी नटलेली आहे.स्त्रीयांमधील भक्ती - शक्तीचा संगम म्हणजे देवी होय.या देवीच्या भक्ती-शक्तीचा जागर म्हणजे नवरात्र.अर्थात 'शक्तीरूप स्त्री देवीची खरी भक्ती व उपासना होय'.

महिषासुरमर्दिनी म्हटले की उग्र स्वरूपातील देवीची प्रतिमा आपल्या समोर येते.महिषासुराच्या असुरी बळा पुढे कोणाचाच टिकाव लागत नव्हता.त्याने सामान्य जणांना नव्हे तर देवा दिकांनाही भयंकर त्रास दिला.या असुरा पासून सुटका करण्यासाठी सर्वांनी देवीची प्रार्थना केली.देवी प्रसन्न झाली.देवीने शस्त्र हाती घेतले. महिषासुरासोबत तुंबळ युध्द करुन त्याला ठार मारले.सज्जनांना त्यांच्या त्रासा पासून मुक्त केले.देवीने अशा अनेक राक्षस रुपी दुर्जनांचा ठार करून सज्जनांचे रक्षण



केले.यातुन देवीने त्रिखंडला स्त्री च्या शक्तीरूपाचा परीचय करून दिला.तसेच याच नवरात्रात शारदा उत्सव ही साजरा करतात.शुभ्र वस्त्र परिधारण केलेली व हातात विणा घेतलेली सुंदर, सौम्य, शांत अशी ममत्वाची मुर्ती म्हणजे शारदा देवी.देवी शारदा सरस्वती ही विद्येची देवता आहे.त्यामुळेच नवरात्र उत्सवात व्याख्याने वगैरे बौध्दिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन केल्या जाते. महालक्ष्मी किंवा लक्ष्मी ही धनाची देवता.ती जर प्रसन्न झाली तर माणसाला कधीच धनाची कमतरता भासत नाही.जिथे नम्रता, सत्यता, सात्विकता असेल तेथेच लक्ष्मी वास करते.लक्ष्मी आणि सरस्वतीचा एकत्र वास असेल अशा ठिकाणी अलौकीक आनंदाचा व प्रसन्नतेचा लाभ होतो.लक्ष्मी विष्णू पत्नी तर पार्वती ही शिवपत्नी होय.तिलाच आपण आई भवानी व अंबामाता असे म्हणतो.देवी ही वरदायिनी आहे.तसेच आपल्या भक्तांवर माते प्रमाणे प्रेम व कृपा दृष्टी ठेवणारी आहे.

अहिल्या, द्रोपदी, सीता, तारा, मंदोदरी या आणि अशा प्रांत:समयी स्मरणीय देवी रूपी स्त्रिया सुध्दा आदिशक्तीच्याच अंशाचा अवतार रूप आहेत.एवढेच नव्हे तर अहिल्याबाई होळकर, जिजाऊ माँसाहेब, सावित्रीबाई फुले, यांच्या सारख्या आदरणीय स्त्रिया सुध्दा आदिशक्तीच्याच अंश होत्या.म्हणूनच स्त्री हिच खरी शक्ती आहे.त्यासाठीच स्त्री शक्तीचा जागर म्हणून, देवीच्या उपासनेव्दारे आपण नवरात्र उत्सव साजरा करतो.

आजही स्त्री शक्ती ही खरी दैवी आणि सामाजिक शक्ती आहे.ती सदैव पावन, सन्माननीय, आदरणीय अशीच आहे.संस्कारक्षम, सात्विक व कणखर पिढी घडविण्याची शक्ती आजही फक्त स्त्रियांमध्येच आहे.त्यासाठी समाजातील इतर घटकांनी त्यांना योग्य ती मदत, मानसन्मान, आदर देण्याची गरज आहे.उद्याचा सुसंस्कृत, कणखर व सक्षम समाज फक्त आणि फक्त स्त्री शक्तीच घडवू शकते.हे सत्य नाकारता येणार नाही.खर्या अर्थाने स्त्री शक्ती हीच शक्तीरुपी देवीची खरी भक्ती व उपासना होय. म्हणूनच स्त्रियांनी नवरात्रीच्या नऊ दिवसांत आपल्यातील आदिशक्तीची ओळख करून घ्यावी.ती शक्ती समाजसुधारने कडे वळवावी.तर एका सृजनशील समाजाची निर्मिती होऊन, खर्या अर्थाने नवरात्रोत्सव साजरा केल्याचा आनंद आपल्याला मिळेल.

*आदी शक्ती तू आदी देवता।*
*तसीच तू गे आदी माता ॥*
*सकळ जगाची विश्व जननी।*
*परी तू आमुची जन्मजननी॥*

# संक्षिप्त

## जिल्हास्तरीय टेनिकॉइट स्पर्धेत सनराईज इंग्लिश स्कूलचे यश

**तिवसा** - जिल्हास्तरीय टेनिकॉइट स्पर्धेमध्ये सनराईज इंग्लिश स्कूल, तिवसा येथील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत घवघवीत यश संपादन करून विभागीय स्तरावर निवड झालेली आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या खेळातील कौशल्य, जिद्द, चिकाटी आणि



सांघिक भावना यांच्या जोरावर शाळेचा नावलौकिक वाढविला.विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थेच्या सदस्या छायाताई दंडाळे, शाळेचे व्यवस्थापक, विश्वजीत दंडाळे, प्रशासकीय अधिकारी कोमल दंडाळे, मुख्याध्यापिका सरिता अळसपुर, नवले, तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच या खेळासाठी १४ वर्षे आतील रुद्रादित्य तायवाडे, सोहम धोटे, आरव वानखडे, श्रीजित दीपते, प्रेम शिंदे तसेच १७ वर्षे वयोगट आदित्य आंबुलकर, ओम बोके, सानिध्य कपिले, अर्पण चौधरी, मनीष घुरडे तर १९ वर्ष वयोगट कृष्णा सुरजुसे, अथर्व लांडगे, देवांश फुलझेले, प्रसन्न गहुकर, सार्थक चौधरी हे विद्यार्थी सहभागी होते.सनराईज इंग्लिश स्कूलच्या या यशामुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

## विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांची मध्यवर्ती कारागृह येथे शैक्षणिक भेट

**अमरावती** - संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या पदव्युत्तर विधी विभागातील एलएल.एम. प्रथम वर्ष आणि द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी अमरावती



येथील अमरावती मध्यवर्ती कारागृहाला शैक्षणिक भेट दिली.विद्यार्थ्यांमध्ये कायदेविषयक जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि त्यांना या क्षेत्रातील विविध संधींची तसेच व्यावहारिक पैलूंची माहिती देण्यासाठी या विशेष अभ्यास भेटीचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी प्रदीप इंगळे यांनी विद्यार्थ्यांना पॅरोल, फरलो, गुड कंडक्ट रिमिशन, कारागृह मॅन्युअल, कैद्यांचे केस स्टेटस बघण्याची व्यवस्था, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग, कैद्यांचे वर्गीकरण, दूरध्वनी सुविधा आणि बालक संगोपन योजना यांसारख्या विविध कायदेशीर व प्रशासकीय बाबींची सविस्तर माहिती दिली.कारागृह अधीक्षक किर्ती राजेश चिंतामणी, मुंडे, संजय घोगरे आणि प्रदीप इंगळे यांनी उपस्थितांशी संवाद साधला.सुतारकाम निर्देशकांनी सुतारकाम विभागाची माहिती दिली, यासोबतच विद्यार्थ्यांनी धोबीकाम विभाग, शिवणकाम विभाग आणि इतर कारखान्यांची पाहणी करून प्रत्यक्ष कामकाज समजून घेतले.सदर उपक्रम विधी विभागप्रमुख डॉ. विजयकुमार चौबे, कार्यक्रम समन्वयक डॉ.कल्पना जावळे आणि मुरलीधर खोपडे यांच्या मार्गदर्शनात यशस्वीरीत्या पार पडला.यावेळी विधी विभागाचे प्रा.राजकुमार कटकतलवारे, प्रा.तेजस्विनी काळे, प्रा.हेमलता आत्राम, प्रा.अजय वानखडे यांच्यासह एलएल.एम.चे सर्व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

## विद्यानिकेतनच्या खेळाडूंचा विभागीय स्तरासाठी निवड



**कुऱ्हा** - जिल्हास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत कुऱ्हा येथील विद्यानिकेतन व विज्ञान उच्च माध्यमिक विद्यालयाच्या खेळाडूंनी घवघवीत यश संपादन करत विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. विशेष म्हणजे, विद्यालयाचा विद्यार्थी कृष्णनाथ शंकरनाथ योगी याने १५०० मीटर, ३००० मीटर आणि क्रॉस कंट्री या तिन्ही धावण्याच्या प्रकारांत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावून अनोखी 'ट्रिपल हॅटट्रिक' साधली. त्याच्या या देदीप्यमान कामगिरीसह विद्यालयातील एकूण सहा खेळाडूंनी विभागीय स्तरावर आगेकूच केली आहे. महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागांतर्गत जिल्हा क्रीडा परिषद आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.याच स्पर्धेत साक्षी रवींद्र देशमुख हिने ८०० मीटर धावण्याच्या शर्यतीत द्वितीय क्रमांक, तसेच व्हॉलीबॉल चाचणीसाठी नैतिक बाबाराव तेटू, महेक विष्णू पासरे, सानिका अमोल कडू आणि प्रथमेश संजयराव इंगोले या चार खेळाडूंची निवड झाली आहे.या यशाबद्दल विद्यालयाचे पालक संचालक प्रकाशदादा मक्रमपूरे, शाळा समिती सदस्य सुरेंद्र सोहळे, मुख्याध्यापक दिनेश सवाई तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले आणि आगामी विभागीय स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.

## हेल्मेटमुळे महिलेचे प्राण वाचले



**खल्लार** - येथिल महिला नायलॉन मांजाने जखमी झाल्याची घटना १३ ऑक्टोबर ला सायंकाळी दर्यापूर येथिल शिवर नाका परिसरात घडली. सुदैवाने हेल्मेटमुळे महिलेचे प्राण वाचले.पूजा डिके रा. खल्लार ही महिला काल दुचाकीवरुन प्रवास करीत असताना नायलॉन मांजाने जखमी झाली. महिलेच्या डोक्यात हेल्मेट असल्यामुळे प्राण वाचलेत या घटनेनंतर भाजपा युवा मोर्चाचे दर्यापूरचे शहर सचिव विजय चव्हाण यांनी तत्परता दाखवित जखमी महिलेला तातडीने उपजिल्हा रुग्णालय, दर्यापूर येथे दाखल केले. सध्या जखमी महिलेची प्रकृती चांगली असल्याची आहे.शिवर नाका परिसरात घडलेल्या या घटनेमुळे नायलॉन मांजाचा धोका पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे. दुचाकीवरून प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या गळ्याला किंवा चेहऱ्याला मांजा लागल्यास गंभीर दुखापत होण्याची शक्यता असते. त्यामुळे नायलॉन मांजाचा वापर नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी गंभीर धोका ठरत आहे.घटनेच्या वेळी विजय चव्हाण यांनी प्रसंगावधान राखत जखमी महिलेला रुग्णालयात पोहोचवून मदतीचा हात दिला. घडलेल्या घटनेतून दुचाकी चालविताना हेल्मेट वापरण्याचे महत्त्व पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. नायलॉन मांजाची विक्री आणि वापर रोखण्यासाठी प्रशासनाने कठोर कारवाई करावी.अशी मागणी केल्या जात आहे.

# अमरावती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या जागेची एडीबी अधिकाऱ्यांकडून पाहणी

### -आशियाई विकास बँकेचे आर्थिक साहाय्य

### -निविदा प्रक्रियेला गती, २७ महिन्यांत रुग्णालय व कॉलेज साकारणार!

**अमरावती/प्रतिनिधीः-** आलियाबाद येथे प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि ४३० खाटांच्या संलग्नित रुग्णालयाच्या उभारणीच्या दिशेने महत्त्वपूर्ण हालचाली सुरू झाल्यात. या प्रकल्पासाठी राज्य शासनाने ४७६.९७ कोटींचा निधी मंजूर केला असून, आशियाई विकास बँकेच्या आर्थिक साहाय्याने हा प्रकल्प साकारण्याचे नियोजन आहे. या पार्श्वभूमीवर बँकेच्या अधिकाऱ्यांनी नुकतीच नियोजित जागेची पाहणी करून आवश्यक कागदपत्रांची तपासणी केली. बांधकामासाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट म्हणून नियुक्त राइट्स संस्थेकडे पाच निविदा प्राप्त झाल्या आहेत. निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन कंत्राटदाराची नियुक्ती झाल्यानंतर प्रत्यक्ष बांधकामाला गती मिळण्याची अपेक्षा आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या उभारणीसाठी आशियाई विकास बँकेकडून आर्थिक साहाय्य मिळणार असल्याने बँकेच्या अधिकाऱ्यांनी आलियाबाद येथील नियोजित प्रकल्पस्थळाला भेट दिली. यावेळी एडीबीचे अधिकारी रायल्हाल्दा ससुलान आणि हॅना अरिएसगाडो यांनी सल्लागार अंगद कारंडे यांच्यासह जागेची पाहणी केली. प्रकल्पासाठी प्रस्तावित जागेची सद्यस्थिती जाणून घेण्याबरोबरच संबंधित आवश्यक (पान २ वर)



# निंभी फाट्याजवळ मजीप्राची मुख्य पाईपलाईन फुटली

### हजारो लिटर पाणी वाया, पाणीपुरवठा विस्कळीत



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती आणि बडनेरा शहराला पाणीपुरवठा करणारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची मुख्य जलवाहिनी फुटल्याने दोन्ही शहरांवर मोठे जलसंकट ओढावले आहे. निंभी फाटा परिसरात शेताच्या मधोमध ही पाईपलाईन फुटल्याने हजारो लिटर पाणी वाया गेले आहे. या घटनेमुळे बुधवारी दोन्ही शहरांचा पाणीपुरवठा पूर्णपणे ठप्प राहिला असून गुरुवार १५ ऑक्टोबर रोजी ही पाणीपुरवठा प्रभावित राहण्याची शक्यता आहे.

शहराला अप्पर वर्धा धरणातून पाणीपुरवठा केला जातो. या मुख्य जलवाहिनीला निंभी फाटा परिसरात अचानक मोठी गळती लागली. पाण्याचा दाब प्रचंड असल्याने पाण्याचा फवारा थेट ४० ते ५० फूट उंच उडाला. यामुळे आजूबाजूच्या शेतात पाणीच पाणी झाले. हजारो लिटर पिण्याच्या पाण्याचा अपव्यय झाला आहे.घटनेची माहिती मिळताच मजीप्रा प्रशासनाचे (पान २ वर)

# पाच हजार रुपयांची दुष्काळी मदत म्हणजे शेतकऱ्यांची चेष्टा!

### पीक विमा संरक्षित रकमेइतकी पीक नुकसानभरपाई द्या - किसान सभा

**चांदुर रेल्वे/प्रतिनिधीः-** महाराष्ट्रातील ३०५ तालुक्यांत दुष्काळ घोषित करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यावर रुपये ५ हजार अग्रिम मदत जमा केली जाईल, अशी घोषणा केली आहे. मात्र ही मदत दुष्काळ संकटाच्या तुलनेत अत्यंत तुटपुंजी आहे. पिके उभी करण्यासाठी शेतकऱ्यांनी खते, बियाणे, औषधे, मशागत आणि मजुरीवर मोठ्या प्रमाणात खर्च केला आहे. आता पिकांचे नुकसान झाल्याने कृषी सेवा केंद्रांचे दुकानदार उधारी वसूल करण्यासाठी तगादा लावत आहेत. दिवाळीपूर्वी ही उधारी फेडण्याचा दबाव शेतकऱ्यांवर आहे. अशा परिस्थितीत पाच हजार रुपयांत उत्पादन खर्चही भरून निघणार नाही. अनुभव पाहता, अग्रिम मदत म्हणून जाहीर केलेली रक्कमच अंतिम मदत ठरण्याची शक्यता (पान २ वर)

### मुख्यमंत्र्यांनी पाच हजारात दिवाळी करून दाखवावी



जगाचा पोशिंदा शेतकऱ्यांना पाच हजारात दिवाळी करायला सांगणारे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी स्वतः हा ५००० दिवाळी करून दाखवावी यापूर्वी कधीही काँग्रेस पक्षाने शेतकऱ्यांसोबत अशी हीन आणि अपमानास्पद वागणूक दिली नाही. काँग्रेसने नेहमीच शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत भरीव आणि सन्मानजनक मदत दिली आहे. मात्र, आजचे सरकार केवळ घोषणांचा पाऊस पाडत असून प्रत्यक्ष मदतीच्या वेळी मात्र शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम करत आहे.

**- बबलु देशमुख,अध्यक्ष, अमरावती जिल्हा काँग्रेस**

# अवैध शस्त्र बाळगणाऱ्यासह गांजाचे सेवन करणाऱ्या तिघांवर कारवाई!

### गुन्हे शाखेची विशेष मोहीम

### तडीपार आरोपीकडून चाकू जप्त




**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी अमरावती शहर गुन्हे शाखेने विशेष मोहीम राबवित अवैधरीत्या शस्त्र बाळगणाऱ्या एका तडीपार आरोपीसह सार्वजनिक ठिकाणी गांजाचे सेवन करणाऱ्या तिघांवर कारवाई केली. या कारवाईत तडीपार आरोपीकडून लोखंडी चाकू जप्त करण्यात आला असून, संबंधितांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत ही विशेष मोहीम राबविण्यात आली. अवैध शस्त्रे बाळगणारे तसेच सार्वजनिक ठिकाणी अमली पदार्थांचे सेवन करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याच्या उद्देशाने गुन्हे शाखेने ही मोहीम हाती घेतली. राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चिंचफैल परिसरात युवराज ऊर्फ जय विजय कुरवाणे (वय २६, रा. चिंचफैल, अमरावती) हा तडीपार आरोपी हातात लोखंडी चाकू घेऊन लोकांना धाक दाखवत उभा (पान २ वर)

# अंजनगाव सुर्जीत दुष्काळात शेतकऱ्यांना कर्जवसुलीच्या नोटिस

### शिवसैनिकांनी बँक मॅनेजरला धरले धारेवर

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी येथील HDFC बँकेच्या वतीने कर्जधारक शेतकऱ्यांना कर्ज भरण्याच्या नोटिसा पाठविण्यात येत असल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर, शिवसेना माजी जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट यांच्या नेतृत्वात शिवसैनिकांनी अंजनगाव सुर्जी येथील HDFC बँक मॅनेजरला धारेवर धरत जाब विचारला. धनेगाव येथील शेतकरी श्रीकांत भुयार व टाकरखेडा मोरे येथील शेतकरी रामकृष्ण डांगे यांना बँकेकडून (पान २ वर)



# दुर्गोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अमरावतीत ३३१ जण तडीपार!

### ६२४ सार्वजनिक मंडळांकडून दुर्गा-शारदा देवींची स्थापना

### ६७ गुन्हेगार दोन वर्षासाठी हद्दपार

**अमरावती/प्रतिनिधीः-** दुर्गोत्सव २०२६ शांततेत पार पडावा आणि शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाने प्रतिबंधात्मक कारवाईचा बडगा उगारला आहे. परिमंडळ क्रमांक १ अंतर्गत सहा पोलीस ठाण्यांच्या हद्दीतील गंभीर गुन्ह्यांत सहभागी असलेल्या तसेच जातीय तेढ निर्माण करणाऱ्या प्रवृत्तीच्या एकूण ३३१ इसमांना दुर्गोत्सवाच्या संपूर्ण कालावधीसाठी अमरावती शहर व परिसरातून तडीपार करण्यात आले आहे. याशिवाय, महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील तरतुदींनुसार ६७ आरोपींना दोन वर्षासाठी अमरावती शहर व जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले आहे.

महाराष्ट्रात सर्वत्र दुर्गोत्सव उत्साहात साजरा होत असून, अमरावती शहरातही सार्वजनिक मंडळांकडून दुर्गा व शारदा (पान २ वर)

# फ्लिपकार्टमधील १.०४ लाखांच्या मालाची हेराफेरी

### महागड्या पार्सलवरील लेबल बदलून ३९ वस्तू लंपास



### कर्मचारी पोलिसांच्या ताब्यात!

**अमरावती/प्रतिनिधीः-** फ्लिपकार्ट कंपनीच्या हबमध्ये महागड्या वस्तूंच्या पार्सलवरील लेबलची अदलाबदल करून कमी किमतीच्या वस्तूंच्या नावाखाली मालाची हेराफेरी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात १ लाख ४ हजार ३०७ रुपये किमतीच्या एकूण ३९ वस्तूंची चोरी झाल्याची तक्रार प्राप्त झाल्यानंतर राजापेठ पोलिसांनी (पान २ वर)

# लुंबिनी नगरात चोरी

### सोने, चांदी व दहा हजार रोख लंपास



**तिवसा/प्रतिनिधीः-** शहरातील लुबिनी नगरात बंद घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यानी कपाटातुन पाच ग्रॅम सोने, दहा ग्रॅम चांदी व दहा हजार रुपये रोख रक्कम चोरी केल्याची घटना आज (दि.१४) दुपारी १२वाजता दरम्यान उघडकीस आली. प्रतिम माणिकराव यावले असे चोरी झालेल्या घर मालकाचे नाव आहे.

प्रतिम यावले हे लुबिनी नगरातील नानोटकर यांच्या घरी भाड्याने राहतात. पत्नीची प्रसुती असल्यामुळे ते दोन दिवसापासून अमरावती (पान २ वर)

# दुचाकी चोर जेरबंद!

### फ्रेजरपुरा पोलिसांची कारवाई



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील वाहन चोरीच्या घटनांचा तपास करताना फ्रेजरपुरा पोलिसांनी एका संशयित आरोपीला ताब्यात घेऊन चार दुचाकी जप्त केल्या आहेत. कमलेश रमेशराव सर्वटकर (वय ४०, रा. संजय गांधी नगर, अमरावती) असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून सुमारे १ लाख १० हजार रुपये किमतीच्या चार दुचाकी जप्त करण्यात आल्या असून, फ्रेजरपुरा आणि राजापेठ पोलीस ठाण्यांतील वाहनचोरीचे गुन्हे उघडकीस आणल्याची माहिती पोलिसांनी दिली. राजेश्री कॉलनी, दस्तूरनगर येथील रहिवासी नीरज रवींद्र घोंगडे (वय ३९) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांनी २६ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री दहाच्या सुमारास स्वतःची काळ्या-करड्या रंगाची (पान २ वर)

# सफाई कर्मचाऱ्यांचे मानधन थकीत

### निविदा प्रक्रिया रखडली

**चांदुर रेल्वे/प्रतिनिधीः-** शहरातील स्वच्छता राखण्यासाठी राबणाऱ्या घंटा गाडी, नाली सफाई आणि ट्रॅक्टर वरील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मागील दोन महिन्यापासून मानधन थकीत आहे. सणासुदीच्या काळात आर्थिक अडचणीना सामना करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या प्रश्नामुळे नगरपरिषदेच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, भाजपचे गटनेते निलेश भालेराव यांनी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नावर पुढाकार घेतला आहे. शहरातील कचरा उचलणे,नाल्यांची सफाई करणे आणि स्वच्छता करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वेतन मिळत नसल्याने घरखर्च,किराणा, मुलांचे शिक्षण व औषधपचाराचा खर्च भगवायचा कसा असा प्रश्न निर्माण झाला आहे. शहर स्वच्छ ठेवणाऱ्या कर्मचाऱ्यांच्याच कुटुंबावर (पान २ वर)

# डिप्टी ग्राउंडवर पिस्तूल घेऊन फिरणारा ताब्यात

### मॅगझीनसह २५ हजारांचे अग्निशस्त्र जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील डिप्टी ग्राउंड परिसरात पिस्तूल घेऊन संशयास्पदरीत्या फिरणाऱ्या एका इसमाला अमरावती शहर गुन्हे शाखेच्या पथकाने बुधवारी १४ ऑक्टोबर रोजी ताब्यात घेतले. शोएब परवेज शेख अहमद (वय ३०, रा. उमर मस्जिदीमागे, हबीब नगर क्रमांक २, अमरावती) असे ताब्यात घेतलेल्या इसमाचे नाव आहे. त्याच्याकडून मॅगझीनसह अंदाजे २५ हजार रुपये किमतीचे पिस्तूल (पान २ वर)






# अमरावती विभागात आंबिया बहार हवामान आधारित फळपीक विमा योजनेचे पोर्टल सुरू

### अर्ज करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

**अमरावती/प्रतिनिधीः-** पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेअंतर्गत आंबिया बहार सन २०२६-२७ साठी अमरावती विभागातील सर्व पाच जिल्ह्यांमध्ये विमा पोर्टल सुरू झाले असून, २ ऑक्टोबर २०२६ पासून ऑनलाईन अर्जाची सोय उपलब्ध झाली आहे. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी होण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

या योजनेमध्ये संत्रा, मोसंबी, डाळिंब, आंबा, केळी, द्राक्ष आणि पपई या ७ प्रमुख फळपिकांचा समावेश करण्यात आला आहे. विभागातील सर्व ५ जिल्ह्यांची जबाबदारी दोन विमा कंपन्यांकडे सोपवण्यात आली आहे. अकोला आणि वाशिम जिल्ह्यासाठी भारतीय कृषि विमा कंपनी लिमिटेड (एआयसी), मुंबई ला देण्यात आली आहे. याशिवाय अमरावती, यवतमाळ आणि बुलढाणा जिल्ह्याची जबाबदारी इफ्को टोकिओ जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, पुणे ला देण्यात आली आहे.

फळपीकनिहाय विमा संरक्षित रक्कम आणि अर्ज करण्याची अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे. यानुसार मोसंबी पिकासाठी एक एक लाख प्रती हेक्टरी विमा संरक्षित रक्कम निश्चित करण्यात आली असून अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर २०२६ (पान २

# ज्येष्ठ पत्रकार मिलिंद किर्ती यांचे अपघाती निधन



**अमरावती/प्रतिनिधीः-** प्रसिद्ध पत्रकार, साहित्यिक मिलिंद कीर्ती (गायधने) यांचे नागपूर येथे एका अपघातात दुर्दैवी निधन झाले आहे. त्यांच्या निधनाने वृत्तपत्र व साहित्य वर्तुळात शोककळा पसरली आहे.

दिनांक १३ ऑक्टोबर २०२६ रोजी वाडी फ्लायओव्हरवर झालेल्या एका अपघातात मिलिंद कीर्ती यांच्या डोक्याला (ब्रेनला) गंभीर दुखापत झाली होती. त्यांना तातडीने नागपूरच्या रामदासपेठ येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. परंतु, ब्रेनला झालेल्या गंभीर दुखापतीमुळे उपचारादरम्यान रात्री तीन वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

'लोकमत', 'देशोन्नती' आणि 'लोकशाही वार्ता' वृत्तपत्रात त्यांनी पत्रकारिता केली. मिलिंद किर्ती हे पत्रकारितेसोबत साहित्य आणि वैचारिक क्षेत्रातील योगदानासाठी ओळखल्या जात होते. तंत्रज्ञान, तत्वज्ञान, कृत्रिम बुद्धीमत्तेचा वाढता प्रभाव आणि त्याचा समाजावर होणारा परिणाम यासारख्या विविध विषयांवर भाष्य करणारी पुस्तके लिहिली होती. त्यातील कृत्रिम बुद्धीमत्तेचे मायाजाल युग, तंत्रज्ञानाची सत्ता, आणि कृत्रिम बुद्धीमत्तेचे मायाजाल युग : सहमतीची हुकूमशाही ॲरिस्टोक्रसी टू टेक्नोक्रसी ही दोन पुस्तके लोकप्रिय ठरली आहेत. त्यांच्यावर (दि.१४) मानेवाडा घाट, नागरपूर येथे अंत्यसंस्कार पार पडला. कीर्ती यांच्या निधनाने सर्वत्र शोक व्यक्त होत आहे.